अल्पावधीत
लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला वाहिलेले
दर्जेदार मासिक

# मेहता मराठी ग्रंथजगत


एप्रिल २०१० | किंमत १५ रू.












कल्पित–अकल्पित या पुस्तकाबद्दल राज्य सरकारचा पुरस्कार स्वीकारताना
सौ. सुधा रिसबूड, उजवीकडे गिरिजा कीर

न.चि. केळकर ग्रंथालयाचा 'साहित्य साधना पुरस्कार' प्रा. मोहन आपटे
यांच्या हस्ते स्वीकारताना मध्यभागी डॉ. संजय ढोले



मेहता पब्लिशिंग हाऊस

◆ एप्रिल २०१०
◆ वर्ष दहावे
◆ अंक चौथा

# मेहता मराठी ग्रंथजगत

## — अनुक्रमणिका —


| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **साहित्यवार्ता** | १६ |
| **पुस्तक परिचय** | |
| **कोल्ड स्टील :** अनु. सुभाष जोशी | ५४ |
| **आवरण :** अनु. उमा कुलकर्णी | ६४ |
| **विज्ञान पोलीस कथा :** व. कृ. जोशी | ७४ |
| **जादूचा अंगरखा :** संस्मिता गुप्ते | ८२ |
| **पुरस्कार** | ८६ |
| **वाचकांचा प्रतिसाद** | ९८ |
| **श्रद्धांजली** | १०१ |
| **बालनगरी** | १०३ |


संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन साहाय्य :
वंदना घाटगे

अंकाची किंमत १५ रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी
*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर, पुणे-४११ ०३०.
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
**Email -** info@mehtapublishinghouse.com
**Website - www.mehtapublishinghouse.com**

**वार्षिक वर्गणी १५० रु. तीन वर्षांची ३५०रु. पाच वर्षांची ५००रु. ३ किंवा ५ वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*

# संपादकीय

## अरब देशातील ग्रंथव्यवहाराची चढती कमान

दुबई येथे दुसरे विश्व मराठी साहित्य संमेलन झाले. त्याच वेळी, पर्शियन आखातातील अबु धाबी येथे आंतरराष्ट्रीय ग्रंथ जत्रेची गजबज चालू होती. इजिप्त, जॉर्डन, सीरिया, लेबानन, संयुक्त अरब अमिरात वगैरे २२ देशांतील १० कोटी अरब भाषक वाचकांची श्रीमंत बाजारपेठ सध्या जगभरच्या प्रकाशन संस्थांना खुणावत आहे, साद देत आहे. यंदाच्या अबुधाबी जागतिक ग्रंथ प्रदर्शनात ६३ देशातील ८४० प्रकाशन संस्थांचा भरभक्कम सहभाग असल्याने आणि अरबी भाषेत पुस्तकांचे अनुवादाचे आणि प्रकाशनाचे हक्क विकण्याचे व्यवहार मोठ्या प्रमाणावर झाल्यामुळे, अरब देशातील पुस्तकांच्या पायरसीने हैराण आणि हवालदिल झालेल्या परदेशी प्रकाशकांनाही थोडाफार दिलासा मिळाला आहे. फ्रँकफर्ट बुक फेअर आणि अबुधाबी ॲथारिटी फॉर कल्चर अँड हेरिटेज यांच्या संयुक्त विद्यमाने अबुधाबी येथे दर वर्षी मार्चमध्ये होणाऱ्या ग्रंथजत्रेतील ग्रंथव्यवहारांची व्याप्ती सालोसाल वाढत असल्याने अग्रगण्य पाश्चात्य प्रकाशन संस्थांना अबुधाबीला उपस्थित राहणे क्रमप्राप्त ठरत आहे. जपान, चीन, भारत या देशांच्या बाजारपेठाही पाश्चात्य देशांना महत्त्वाच्या वाटत असल्याने टोकयो, बीजिंग, नवी दिल्ली येथील ग्रंथजत्रांच्या आयोजनात आणि पुस्तकांचे अनुवाद आणि मुद्रण-वितरण सुकर करण्यात फ्रँकफर्ट बुक फेअर, लंडन बुक फेअर, वॉशिंग्टन बुक फेअर या रस घेत आहेत. अबुधाबीच्या बुक फेअरलाही त्यामुळे आता बाळसे येत आहे. मध्य आशियातील सर्वात मोठी ग्रंथजत्रा असा अबुधाबी ग्रंथजत्रेचा उल्लेख आता केला जातो आणि या जत्रेत आपला स्टॉल असायलाच हवा अशी व्यावसायिक गरज पाश्चात्य प्रकाशकांना भासू लागली आहे. यंदाच्या जत्रेत गेल्या वर्षापेक्षा भाग घेणाऱ्या प्रकाशकांच्या संख्येत ३२ टक्के वाढ झाल्याचे मोठ्या अभिमानाने 'किताब' या आयोजक संस्थेच्या जनरल मॅनेजर मोनिका क्राउस यांनी जाहीर केले. अबुधाबीच्या या जत्रेने अरब प्रकाशन व्यवसायाला एकदम जागतिक ग्रंथव्यवहाराच्या मुख्य प्रवाहात आणून सोडले आहे. अरब देशात परदेशी पुस्तकांना मोठी बाजारपेठ उपलब्ध आहे याबद्दल आयोजकांना आणि सहभागी होणाऱ्या प्रकाशन संस्थांना कसलीही साशंकता नाही. या वाढत्या बाजारपेठेतील

प्रचंड उलाढालीचा अंदाज आल्याने या ग्रंथजत्रेत चर्चासत्रांमध्ये पुस्तकांचा कॉपीराइट, पायरसी यासारख्या विषयांना प्राधान्य देण्यात आले होते. अरबी भाषेतील पुस्तकांचे इतर भाषांतले अनुवाद करण्याचे किंवा इतर भाषांतील पुस्तकांचे अरबीमध्ये अनुवाद करण्याचे करार या ग्रंथजत्रेत अधिकाधिक व्हावेत म्हणून अशा प्रत्येक करारासाठी एक हजार डॉलर्सचे प्रोत्साहन अनुदान देण्याची योजनाही यंदा राबविण्यात आली.

या ग्रंथजत्रेच्या माध्यमातून मुस्लीम देश आणि इतर जग यांच्यातील संपर्क-संवादालाही चालना मिळणार आहे. 'अरेबियन नाईट्स' ने मध्ययुगात मौखिक पातळीवरून अरब जीवनाची झलक दाखवणाऱ्या अद्भुत कथा जगभर पोचल्या. मध्यपूर्वेतील कथांचा प्रचंड खजिना अरेबियन नाईट्समुळे एका सूत्रात गोवला गेला आणि त्यातील विलक्षण तपशीलांमधून अरब देशांच्या वैभवाचे, समाज जीवनाचे, नीतिमूल्याचे, चालीरीतीचे, उद्योगव्यवसायचे, सर्व दूर होणाऱ्या संचाराचे आणि प्रवास साधनांचे वस्तुनिष्ठ तपशील जसे वाचकांपुढे आले तसेच अरब देशातील कल्पनाशक्तीच्या अद्भुत जादूचे रोमहर्षक तपशीलही वास्तवात रंग भरून जीवनाबद्दलची आसक्ती दृढ करणारे ठरले. अरबी भाषेतील या सुरस आणि चमत्कारिक कथा जगभरच्या मुलामुलींच्या कल्पकतेला चालना देणाऱ्या ठरल्या. कुराण-शरीयतच्या चौकटीच्या आश्रयाने इस्लाम धर्माची जीवनपद्धती नियंत्रित होत राहिली.

अरेबियन नाइटसच्या अनेक कथांमध्ये इस्लामी कर्मकांडाचे आणि आचारप्रणालीचे बारीकसारीक पैलू प्रकट करण्यात आले आहेत. एकीकडे जग जागतिकीकरण आणि उदारीकरण यांच्या लाटेमुळे अधिकाधिक परस्परावलंबी होत आहे तर दुसरीकडे मूलतत्त्ववादी विचारसरणीशी एकनिष्ठता दाखवत मध्ययुगीन काळातील आचार धर्मालाच चिकटून राहून आणि धर्मविषयक बंदिस्त कल्पनांना उराशी कवटाळत इस्लामी देश संपूर्ण जगाला आपल्या दहशतवादाने वेठीला धरून सर्वांनाच भयभीत करीत आहेत. मध्ययुगीन मुस्लीम मानसिकता आधुनिकतेकडे वळणार असेल तर त्यासाठी शिक्षण, विज्ञान आणि उदारमतवाद यांची गरज आहे आणि ग्रंथांच्या माध्यमातूनच या मानसिकतेत परिवर्तन घडून येऊ शकेल. पेट्रोलच्या प्रचंड साठ्यांमुळे मध्यपूर्वेतील अनेक देश आज सर्वात संपन्न झाले आहेत. जोडीला अफसारख्या मादक पदार्थांची लागवड आणि विक्री करून दहशतवाद्यांना मोठ्या प्रमाणावर निधी सढळपणे उपलब्ध करून दिला जात आहे, अनेक इस्लामी राष्ट्रांची अण्वस्त्रांचे साठे करण्यासाठी स्पर्धा चालू आहे. अशा काळात समकालीन युगधर्माचा अंगीकार करण्याच्या दृष्टीने अंत:प्रेरणा होणे ही गोष्ट शिक्षण, विज्ञाननिष्ठा आणि उदारमतवाद यांच्याच प्रभावाने घडण्याची शक्यता आहे. अरब देशातील मुलामुलींच्या हाती उत्तमोत्तम विश्वसाहित्य बालवयापासूनच दिले गेले तर या प्रक्रियेला गती येईल. इस्लामी देशात शिक्षणाचे प्रमाण फार कमी आहे, पुस्तकेही कमी निघतात, कमी

खपतात. वाचनाची सवय तेथे फारशी नाही. शिक्षणोपयोगी आणि धार्मिक पुस्तकांचीच तेथे निर्मिती-विक्री होते. अरेबियन नाइटससारखी रजनात्मक पुस्तके तेथे चालतात. पण युरोपात विद्येचे पुनरुत्थान झाले तसे अरब राष्ट्रात फारसे काही घडले नाही. तेथील मानसिकता कुराण-शरीयत यांच्या शिकवणीतील कडव्या नीतिनियमांच्याच प्रभावाखाली घडत राहिली.

या वर्षीच्या अबुधाबी ग्रंथजत्रेत एक हजार एक शोध: आपल्या जगातील मुस्लीम परंपरेचा शोध (दुसरी आवृत्ती) (1001 Inventions:Discover the Muslim Heritage in our world) हे पुस्तक प्रसिद्ध झाले. त्यात कॉफी, साबण, शांपू, जगाचा नकाशा बनवणे, रुग्णालय व्यवस्थापन, फाउंटनपेन, कमर्शियल पेपर, कॅमेरा, अग्निबाण (रॉकेट), क्रँक शॅफ्ट वगैरे शोध इस्लामने लावल्याची नोंद करण्यात आली आहे. इस्लामी अभ्यासकांना आम्हाला विज्ञानाबद्दल आस्था आहे हे दाखवण्याची गरज भासली हे यावरून लक्षात येते.

या पुस्तकाची पहिली आवृत्ती दोन वर्षापूर्वी या ग्रंथजत्रेतच प्रसिद्ध झाली होती. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला.

शारजाचे राजे डॉ. शेख सुलतान बिन मोहमद अल-काझीमी यांच्या सहकार्यामुळे या ग्रंथजत्रांचे आयोजन नेटकेपणाने होत आहे. त्यांचा या ग्रंथजत्रेत सत्कार करण्यात आला.

काइस सेदकी या संयुक्त अरब अमिरातीतील लेखक-चित्रकाराचा जपानमधील मंगा चित्रशैलीचा व्यासंग वाखाणण्यासारखा आहे. जपानी मंगा कलाकार अकिरा हिमेकावा यांच्या चित्रांनी सजलेले गोल्ड रिंग भाग १ हे अरब कुटुंबजीवनातील सांस्कृतिक आणि नैतिक मूल्यांचे दर्शन घडविणारे पुस्तक प्रसिद्ध केले आहे. त्याला यावर्षी पुरस्कार देण्यात आला.

डॉ. मोहमद मल्लाख या मोरोक्कन तरुणाला 'टाइम इन अॅरेबिक लँग्वेज' या पुस्तकाबद्दल युवा लेखक पुरस्काराने गौरविण्यात आले.

कॅनडा आणि अमेरिका यात शिक्षण झालेल्या, बैरूत व लेबॅनिझ विद्यापीठात अध्यापन करणाऱ्या अल्बर्ट हबीब मुतलाग या प्राध्यापकाने 'दि ॲनिमल एनसायक्लोपीडिया' हा कोश सिद्ध केला आहे.

हाफनाओवी बाली या अल्जीरियातील अभ्यासकाचा कंपॅरेटिव्ह कल्चरल क्रिटिसिझम हा प्रबंधही या ग्रंथजत्रेत पुरस्कारप्राप्त ठरला.

दि पोलिटिकल एस्टॉब्लिशमेंट ऑफ सुफीझम इन इजिप्त हा ग्रंथ अबुधाबी येथील अमर अली हसन यांनी लिहिला असून इजिप्तमधील सुफी कवींचा तेथील राजकीय व्यवस्थेवरील प्रभाव तपासला आहे.

नाहदेल मिस्र पब्लिशिंग हाऊसतर्फे बालसाहित्य आणि मासिके यांचे प्रकाशन

होते. शी थ्रोज् स्पार्क्स (सौदी कादंबरीकार अबदी खाल यांची कादंबरी), व्हेन द वोल्व्हज् ग्रो ओल्ड, ए क्लाउडी हे ऑफ वेस्ट साइड (इजिप्शियन कादंबरीकार मोहमद अल मन्सी किनदिल), दि लेडी फ्रॉम तेल (अव्हिव पत्रकार रबाई मदहौज - कादंबरी), दि टेस्ट ऑफ सेपरेशन (कादंबरी) ही पुस्तके अनुवादाच्या करारासाठी आघाडीवर होती.

नबी मारक (अल इंतिशार अल अरबी एस्ट), अहमद नझीफ (दार अल किताब अल अरब), मोहमद रशद (इजिप्शिअन लेबॅनीझ पब्लिशिंग हाऊस) अल दार अल (अरेबिया बुक शॉपी), अहमद कामेल (टिबा एस्ट), माझेन अल झरबा (ओबेकान बुक शॉप) वगैरे प्रकाशकांचे आंतरराष्ट्रीय मनसुबे मोठे आहेत. अरब कल्चरल सेंटरचे हसन याधी यांचा ग्रंथजत्रेच्या आयोजनात पुढाकार असतो. जुम्माअल कुबेझी हे ग्रंथजत्रेचे डायरेक्टर एकूण आयोजन नेटके व्हावे यासाठी जागरूक असतात.

भारतीय प्रकाशन संस्थांची उपस्थिती कमी असते. उर्दू-पर्शियन भाषांमधील पुस्तके काढणाऱ्या प्रकाशकांची इस्लामवरील पुस्तके अनुवादासाठी करारबद्ध करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. ई-बिझनेस, बालसाहित्य, शैक्षणिक पुस्तके, इंग्रजीची पाठ्यपुस्तके, डिक्शनरी, सचित्र शब्दकोश यांना उत्तम प्रतिसाद मिळतो. २५ टक्के लोकसंख्या मुलांची आहे. बालसाहित्याला प्रचंड मागणी असल्याने बालसाहित्यासाठी स्वतंत्र ग्रंथजत्रा भरविण्याची मागणी होत आहे. व्यवहारात खुलेपणा येत आहे. संयुक्त अरब अमिरातीतील दरडोई क्रयशक्ती जगात सर्वांत जास्त आहे. जर्मनीतील पुस्तकांची येथे मोठ्या प्रमाणावर आयात होते. अरब देशातील ग्रंथव्यवहाराचे मध्यवर्ती केंद्र म्हणून अबुधाबीची प्रतिमा जनमानसात रुजावी अशी महत्त्वाकांक्षा येथील राज्यकर्त्यांना प्रेरणादायी ठरत आहे.



## सभासदांना सूचना

भारतीय टपाल खात्याच्या नवीन अधिनियमानुसार मासिकाचे वितरण करताना पिनकोड सहित संपूर्ण पत्ता टाकणे अनिवार्य झाले आहे. आपला अंक वितरित होण्यासाठी कृपया पिनकोडसह आपला संपूर्ण पत्ता लिहून पोस्टकार्डद्वारे मासिकाच्या पत्त्यावर पाठवावा. ही विनंती.

T BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किमतीत मिळवा!

# T बुक क्लब १८

**सभासद फी ५०रु. आजच सभासद व्हा!**

## टी बुक क्लब १८ मधून प्रकाशित होणारे चौथे पुस्तक




## वन शॉट

**ली चाइल्ड**
अनु. बाळ भागवत

**३४०रु. सभासदांना १७०रु. पोस्टेज ३०रु.**

सहा शॉट्स. पाच ठार. काही तासांत बिनतोड पुराव्याच्या आधारावर गुन्हेगाराला अटक, पण तो तोंडातून अक्षर काढत नाही. शेवटी खूप प्रयत्नांनंतर तो बोलतो, ‘तुम्ही चुकीच्या माणसाला पकडले आहे... माझ्यासाठी जॅक रीचरला बोलवा.’

जॅक रीचरचा इतरांना शोध घेता येत नसला तरी टी.व्ही.वरच्या बातम्या बघून तो यायला निघालेलाच असतो. त्याची खात्री असते की काही तरी घोटाळा आहे. गुन्हेगार लष्करातला नेमबाज असताना एक शॉट चुकलाच कसा? आणि शहरात पोहोचल्यावर रीचरच्या लक्षात येते की त्याचे या शहरातले अस्तित्व कुणाला तरी खुपते आहे.


रीचर तेरा वर्षे मिलिटरी पोलीस असतो. तपास करण्यात, माग काढण्यात तरबेज. त्याला भानगडीत अडकवण्यासाठी निरपराध व्यक्तीचा खून करण्यापर्यंत मजल गेल्यावर, संतापलेला रीचर बचाव पक्षाच्या तरुण आणि सुंदर अशा वकिलाला घेऊन त्यांच्यामागे लागतो. त्याला माहीत असते की खरा गुन्हेगार शोधायचा तर तेवढेच कावेबाज आणि निर्दय व्हायला हवे. प्रत्येक पावलाला गोळीचे उत्तर गोळीनेच द्यायला हवे.

## टी बुक क्लब १८ मधून प्रकाशित झालेली पुस्तके

### डिसेप्शन पॉईंट

**डॅन ब्राऊन** । अनु. अशोक पाध्ये

**पहिले पुस्तक**




कधीतरी एक उल्का उत्तर ध्रुवाजवळच्या बर्फात घुसली. आणि तेथून सुरू झालं एक चमत्कारिक नाट्य!

थरार, पाठलाग, हत्या! सत्य हे वेगळेच होते. मेंदूला मुंग्या आणणारी डॅन ब्राऊनची थरारक कादंबरी!

**५००रु. सभासदांना २५०रु. पोस्टेज ३०रु.**

### द ॲटर्नी

**स्टीव्ह मार्टिनी** । अनु. अजित ठाकूर

**दुसरे पुस्तक**





प्रसिद्ध लेखक स्टीव्ह मार्टिनी यांची आंतरराष्ट्रीय स्तरावर विक्रमी खप झालेली नवीन रोमांचक न्यायालयीन रहस्यकथा.

**३५०रु. सभासदांना १७५रु. पोस्टेज ३०रु.**

### क्रायसिस

**डॉ. रॉबिन कुक** । अनु.डॉ. प्रमोद जोगळेकर


**तिसरे पुस्तक**




मेडिकल थ्रिलर रायटर म्हणून प्रसिद्ध असलेले रॉबिन कुक यांची नवीन रहस्यमय कादंबरी.

**३५०रु. सभासदांना १७५रु. पोस्टेज ३०रु.**

## टी बुक क्लब १८ मधून प्रकाशित होणारे पुस्तक




# नेक्स्ट

**मायकेल क्रायटन**
अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर


कर्करोगाच्या उपचारांसाठी आलेल्या रुग्णांच्या पेशी मिळवून
त्या विद्यापीठाला विकणारा डॉक्टर.
या पेशींच्या मालकीसाठी काहीही करायला तयार
असणारे उद्योगपती आणि मतलबी प्राध्यापक.
चिम्पँझी मादीच्या जनुकसंचात स्वत:चेच जनुक मिसळून बेकायदेशीररीत्या
'ह्यूमंझी' बनवणारा बेजबाबदार जीवशास्त्रज्ञ.
धर्म आणि विज्ञान यांची चलाखीनं सरमिसळ करणारा, आपल्या विद्यार्थ्यांचं
संशोधन चोरणारा आणि राजकारणात राजकारण्यांनाही मागे टाकणारा शास्त्रज्ञ
रॉबर्ट बेलार्मिनो.
स्वत:ची तुंबडी भरण्यासाठी कोणत्याही थराला
जाणारे प्रसिद्धी माध्यमांचे लोक.
या सगळ्या काळ्या पार्श्वभूमीवर मनोरंजन करणारा आणि
गणित सोडवणारा बुद्धिमान पोपट....
या सगळ्यातून तयार होते प्रश्नांची मोठी मालिका.
उत्तरं नसलेले, अस्वस्थ करणारे प्रश्न....
मन मानेल ते करायला सज्ज असणारं आजचं जीवशास्त्र ...
पुढे काय होणार?

# टी बुक क्लब १८ मधून प्रकाशित होणारे पुस्तक

## द फर्म


**जॉन ग्रिशॅम**

अनु. अनिल काळे




एक माफिया फॅमिली :
विविध प्रकारच्या गुन्ह्यांमधून जमवलेला
प्रचंड काळा पैसा पांढरा करणारी...
त्यासाठी कोणत्याही थराला जाऊ शकणारी...
एका वकिलांची फर्म :
माफिया फॅमिलीचा सभ्य धुवट चेहरा असलेली...
फॅमिलीच्या काळ्या पैशाचं बेमालूमपणे
'शुद्धीकरण' करणारी... एक वकील :
नुकताच शिक्षण घेऊन बाहेर पडलेला अत्यंत हुशार, चलाख तरुण
फर्ममध्ये नोकरी मिळवतो. त्याला आणि त्याच्या सुंदर बायकोला स्वप्नं
पडतात ती फक्त उज्ज्वल भविष्यकाळ, भरपूर पैसा,
बीएमडब्ल्यू यांची.
प्रत्यक्षात मात्र दोघंही
एकीकडे माफिया फॅमिली, तर दुसरीकडे एफबीआय,
अशा कात्रीत सापडतात...
आणि जीव वाचवण्यासाठी पळत सुटतात...
दिशा मिळेल तिकडे.

जगभरातल्या ३० हून अधिक भाषांमध्ये ५० लाख प्रतींच्या
विक्रीचा टप्पा गाठणारी 'बेस्ट सेलर' कादंबरी आता मराठीत




# शांताराम

ग्रेगरी डेव्हिड रॉबर्ट्स
**अनु. अपर्णा वेलणकर**

पृष्ठे : १४२८
मूळ किंमत : ९९०रु.
सवलतीत : ८५०रु.
पोस्टेज : ४०रु.

सवलत ३१मे २०१० पर्यंत





*दूर देशाहून एक गोरं पाखरू.*

*पळून आलं होतं.*

*तुटलं होतं माणसांपासून... मातृभूमीपासून... जगण्यापासूनच!*

*मागावर असलेले पोलीस आणि स्वत:च्या डागाळलेल्या आयुष्याची लाज वाटणारं मन*

*यापासून त्याला पळून जायचं होतं... लपून राहायचं होतं.*

*ते उतरलं होतं मुंबईत.*

*अंधारी, काळी, कलकलाटाची दुनिया. पिचलेली... तरीही ताठ उभ्या कण्याची!*

*क्षणात नरडीचा घोट घेणारी, क्षणात प्रेमाची पाखर घालून पोटाशी कवटाळणारी दुनिया!*

*घर सुटलेलं, कुटुंब तुटलेलं, जिवलग दुरावलेले, अशा शून्य अवस्थेत भिरभिरणारं ते*

*एकुट पाखरू शिरलं मुंबईच्या कुशीत.*

*– आणि बघता बघता सारं बदललं.*

*एक नवीच दुनिया उलगडत गेली.*

*प्रेमाचा पाऊस... द्वेषाचा जाळ... विश्वासघाताचे सुरे...*

*रहस्यांचं चक्रव्यूह आणि गुपितांच्या गुहा!*

*शरीरसुखाच्या उफाळत्या लाटांवर नाचणारा उत्कट प्रणय*


*आणि तुरुंगाच्या अंधारकोठडीतला रक्तरंजित छळ.*

*जगण्याच्या लढाईत धगधगणाऱ्या झोपड्या आणि पंचतारांकित हॉटेलातलं थंडगार ऐश्वर्य.*

*अंडरवर्ल्डमधल्या टोळीयुद्धांच्या चिखलात रुजलेली तत्त्वज्ञानाची कमळं आणि बॉलीवुडच्या झगमगाटाआडचा सुन्न अंधार.*

*– मुंबई.*

**आगामी**




# नष्ट नीड

**रवींद्रनाथ टागोर**
अनु. नीलिमा भावे

चारू, आदित्य आणि शशांक हे आपापल्या जागी एका विशिष्ट परिस्थितीत सापडले आहेत. त्यामुळं त्यांचा मानसिक कोंडमारा होतो आहे. या कोंडमाऱ्यातून बाहेर पडण्याचा मार्ग त्यांना जवळच्या व्यक्तीतच सापडतो.

हा मार्ग आपल्याला नक्की कुठे नेणार आहे, याची कल्पना येण्याआधीच ते त्या मार्गावर चालायला सुरुवातही करतात.


आपापल्या स्वभावधर्मानुसार पुढे जाणाऱ्या त्यांच्या या वाटचालीतचे टप्पे कादंबरीकार टागोर या कथानकांमधून चित्रित करतात. त्यांच्या स्वभावधर्मानुसार ही कथानकेही वेगवेगळी होतात आणि त्यांचे शेवटही वेगवेगळे होतात.

कादंबरीकार टागोरांचा या विषयाचा शोध चालूच राहतो.

मेहता पब्लिशिंग हाऊस

आगामी

# स्लमगर्ल ड्रिमिंग



**रुबिना अली**
अनु. **मैत्रेयी जोशी**

रुबिना अली. मुंबईतल्या झोपडपट्टीत राहून चंदेरी चित्रपटसृष्टीतली चमचमती तारका बनण्याचे स्वप्न पाहणारी एक सिनेमावेडी मुलगी. वय केवळ ८-९ वर्षांचं.

तिचं हे स्वप्न एक दिवस खरोखरीच साकार होतं आणि ती थेट ऑस्करपर्यंत मजल मारते.

'स्लमडॉग मिलीयनेअर' मधल्या या चिमुरड्या चित्रतारकेचा हा ऑस्करपर्यंतचा प्रवास आपल्याला या पुस्तकात बघायला मिळेल. तोही तिच्याच शब्दांत!

ऑस्कर जिंकूनही पुन्हा त्याच बकाल वस्तीत परत येणाऱ्या रुबिनामध्ये बालसुलभ निरागसता आणि परिस्थितीनं शिकवलेलं शहाणपण यांचं मजेदार मिश्रण आढळतं. कादंबरीच्या अखेरच्या भागात तर अतिक्रमण विभागाकडून तिचं ते झोपडंही पाडण्यात येतं आणि नाईलाजाने तिला तिच्या अब्बांच्या मित्राच्या घरी राहायला जावं लागतं.

एकीकडं चटका देणारं दाहक वास्तव तर दुसरीकडे हॉलिवूडच्या झगमगत्या दुनियेत अनुभवलेली 'रेड कार्पेट ट्रीटमेंट'! तो मानसन्मान, ते सत्कार समारंभ, ती यशाची धुंदी!... या साऱ्यांचा ताळमेळ घालत रुबिना एक दिवस फार मोठी अभिनेत्री बनण्याची स्वप्नं पाहत आहे.

हा तिचा दुर्दम्य आशावाद कौतुकास्पदच!

# साहित्यवार्ता



*** तस्लिमांचा कथित लेख**

बांगलादेशी लेखिका तस्लिमा नसरीन यांच्या कथित अनुवादित लेखाच्या प्रकाशनाने निर्माण झालेल्या वादाचे पडसाद मंगलोर येथे उमटून कन्नड व इंग्रजी वृत्तपत्राच्या कार्यालयावर हल्ला केला गेला. शिमोगा व हसन येथेही हिंसक पडसाद उमटून दोनजण पोलीस गोळीबारात ठार झाले. वृत्तपत्राच्या कार्यालयात अज्ञातांनी जबरदस्तीने प्रवेश करून दगडफेक केली व पेट्रोलबॉम्बही फेकले. यात सात संगणकांचे नुकसान झाले. अशाच प्रकारचे लिखाण प्रसिद्ध केले तर गंभीर परिणाम होतील अशी धमकी संतप्त जमावाने दिली.

शिमोगा आणि हसन या दोन शहरात ज्या लेखावरून तणाव निर्माण झाला तो लेख आपला नसल्याचा खुलासा तस्लिमा नसरीन यांनी केला आहे. ''हा सारा प्रकार अत्यंत भयानक असून माझी प्रतिमा मलीन करण्याचा हा प्रकार आहे. माझ्या लिखाणाचा चुकीच्या पद्धतीने वापर करून समाजात अशांतता निर्माण करण्याचा हा प्रयत्न'' असल्याचे त्यांनी पत्रकात म्हटले आहे. सुरक्षेच्या कारणास्तव श्रीमती नसरीन सध्या अज्ञातवासात आहेत. वृत्तसंस्थेने नसरीन यांचे निवेदन प्रसिद्ध केले आहे. यामध्ये त्यांनी म्हटले आहे की, माझ्या आयुष्यात मी कधीही कर्नाटकमधील कोणत्याही वर्तमानपत्रासाठी लेखन केलेले नाही, तसेच प्रेषित महम्मद हे बुरखा पद्धतीच्या विरोधात होते, असे लेखन मी कधीही केलेले नाही. नसरीन यांच्या एका लेखाचा कथित अनुवाद एका कन्नड दैनिकाने प्रसिद्ध केल्यानंतर शिमोगा आणि हसन येथे तणाव निर्माण झाला होता.

*** अभिनेते अशोक सराफ यांची चार दशकांची कारकीर्द**

'चौरस पुणे' निर्मित 'सम्राट अशोक' या कार्यक्रमात अशोक सराफ यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू सहकारी कलाकार, दिग्दर्शक यांनी उलगडून दाखवले. महापौर मोहनसिंग राजपाल यांच्या हस्ते पुणेरी पगडी प्रदान करून सराफ यांचा सत्कार करण्यात आला. सम्राटपदाचा मुकुट त्यांना महेश मोतेवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

सराफ म्हणाले, ''मेहनत, नशीब आणि प्रेक्षकांच्या प्रेमातून मी घडलो. 'सम्राट' झालो की नाही ते माहीत नाही, पण बऱ्यापैकी नट झालो. प्रत्येक भूमिकेत वेगळे काहीतरी करण्याचा प्रयत्न केला. लहानपणी असलेला तबलावादनाचा नाद हा संवादफेकीत लय सांभाळण्यासाठी उपयोगी ठरला.''

अभिजित कोसंबी, जितेंद्र भुरूक, योगिता गोडबोले यांनी 'जीवन इतका नाम है प्यारे', 'अगं नाच नाच नाच राधे उडवू या रंग', 'जोडीनं गोडीनं', 'निशाणा तुला दिसला ना', 'अश्विनी ये ना', 'अगं हेमा' ही सराफ यांच्यावर चित्रित झालेली गीते सादर केली. या वेळी www.ashokasaraf.in या संकेतस्थळाचे उद्‌घाटन झाले. बंधु सुभाष सराफ, रमेश पुंडे व हेमंत अमलानी हे बँकेतील सहकारी, मैत्रीण मधू भंडारी, अरुण नलावडे, संजय मोने, किशोरी शहाणे, प्रिया बेर्डे, निशिगंधा वाड, दिलीप प्रभावळकर, अभिराम भडकमकर, सतीश राजवाडे यांनी प्रत्यक्ष तर भारती आचरेकर, विक्रम गोखले, सविता प्रभुणे, सचिन, वर्षा उसगावकर, भरत जाधव, प्रसाद ओक यांनी दृक-श्राव्य माध्यमातून आपल्या भावना प्रकट केल्या.

''लक्ष्मीकांत बर्डे हे अजब रसायन होते. काही विनोदी चित्रपटांत तोचतोचपणा असेल, पण हसविण्याचा धंदा आम्ही सोडला नाही. चित्रपटसृष्टी जिवंत ठेवण्याचे श्रेय आमच्या जोडीला द्यावे लागेल. आपल्याला काय करायचे नाही हे ज्याला कळते, तो मोठा नट,'' असेही अशोक सराफ यांनी सांगितले.

*** कुसुमाग्रज स्मारक**

ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांच्या मूळ गावी, शिरवाडे वणी (ता. निफाड) येथे बांधण्यात येणाऱ्या त्यांच्या स्मारकाचे बांधकाम निधीअभावी तीन वर्षांपासून रखडलेले आहे.

कुसुमाग्रज स्मारकासाठी काही वर्षांपूर्वी तत्कालीन जिल्हा परिषद सदस्य अनिल कदम आणि लक्ष्मण निकम यांनी जिल्हा परिषदेकडून २६ लाख रुपयांचा निधी मंजूर करून घेतला. त्याचे पत्रही शिरवाडे वणी ग्रामपंचायतीला देण्यात आले. पहिल्या टप्प्यात मिळालेल्या बारा लाख रुपयांतून स्मारकासाठी निश्चित केलेल्या शिरवाडे गावाच्या दक्षिण दिशेला एक एकर जागेत संरक्षक भिंत, जलकुंभ आणि महामार्गावर स्वागतकमान एवढी कामे झाली. स्मारकाच्या कृती आराखड्यातील स्मारक चबुतरा, हॉल, उद्यान ही कामे निधीअभावी होऊ शकली नाहीत. येथील ग्रामसभेत हा प्रश्न वारंवार उपस्थित करण्यात आला; पण प्रशासनापर्यंत मात्र तो पोचू शकला नाही.

शिरवाडे वणी गावाबाबत तात्यासाहेबांच्या मनात कायमच आपुलकीचा भाव होता. १९८४ मध्ये ओझरखेड धरणाच्या डाव्या कालव्याचे काम वडनेरभैरवच्या शेतकऱ्यांनी अडविले. शिरवाडे गाव कालव्याच्या पाण्यापासून वंचित राहण्याचा

धोका होता. ॲड. माधवराव निफाडे आणि ग्रामस्थांनी ही बाब तात्यासाहेबांच्या निदर्शनास आणून दिली. त्याची तत्काळ दखल घेत त्यांनी तत्कालीन आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्याकडून हे काम मार्गी लावले. त्यामुळे शिरवाडेसह परिसरात ओझरखेड कालव्याच्या पाण्याने हरितक्रांती झाली. त्याचे श्रेय कुसुमाग्रजांनाच आहे. तात्यासाहेबांनी शिरवाडेत शैक्षणिक चळवळही रुजविली. त्यांच्या जयंतीनिमित्त कृतज्ञतेची भावना म्हणून उर्वरित निधी प्रशासनाकडून त्वरित देण्यात यावा, अशी कुसुमाग्रजांवर प्रेम करणाऱ्यांची अपेक्षा आहे.

*** परदेशी पाहुण्यांशी मराठीत बोलावे**

राज्य शासनाचे मंत्री, प्रशासकीय प्रमुख यांनी सार्वजनिक कार्यक्रमात, तसेच परदेशी प्रतिनिधींबरोबर बोलताना शक्यतो मराठी भाषेतच बोलावे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. आ. ह. साळुंखे यांनी जागतिक मराठी दिवसाच्या निमित्ताने केले. ते म्हणाले, ''या विचारामागे सक्तीची भावना नाही. एखाद्या वेळेस दुभाष्याच्या मदतीने बोलल्यामुळे प्रत्यक्ष संवाद खंडित होण्याचा वा त्याचा प्रभाव कमी होण्याचा संभव असेल, तर त्याप्रसंगी मराठीत बोलण्याचा आग्रह असू नये. परंतु, जेथे तशी शक्यता नाही तेथे मराठीतून बोलणे हे आपल्या भाषेचे आणि संस्कृतीचे महत्त्व अधोरेखित करण्याच्या दृष्टीने योग्य असते. काही वेळा आपली अस्मिता प्रकट करण्यासाठी प्रतीकात्मक कृती म्हणून देखील या गोष्टीला महत्त्व असते. शिवाय मराठीभाषकांचे अनुवादकौशल्य वाढणे आणि त्यांना अनुवादक म्हणून व्यवसाय प्राप्त होणे, या व्यावहारिक दृष्टीनेही ही बाब विचारात घ्यावी. समाजातील प्रमुख व्यक्ती मराठी भाषेचा आग्रह धरतात हे पाहून सर्वसामान्य लोकही शक्य तेव्हा मराठी बोलतील तर मराठीच्या विकासाचे वातावरण वृद्धिंगत होईल.''

भाषा आणि साहित्यविषयक उपक्रम एकत्रित राबविण्यासाठी भाषा भवन उभारण्यात आले तर भाषाविषयक उपक्रमांमध्ये समन्वय साधला जाईल, असे स्पष्ट करून ते म्हणाले, ''प्रमाण भाषा आणि भाषेच्या बोली यांचे नाते अविभाज्य असते. समाजातील बहुसंख्य लोक कोणत्या ना कोणत्या बोलीचाच प्रयोग करीत असतात. त्यामुळे बोलींचा अभ्यास हा प्रमाणभाषेला पूरक आणि पोषक ठरतो, परंतु अनेकदा सर्वसामान्य लोकांच्या बोलींमधील शब्द स्वीकारणे, हे असंस्कृतपणाचे वाटल्यामुळे ते स्वीकारण्याच्या बाबतीत खळखळ केली जाते. वस्तुत: बोलीमधील निवडक शब्द प्रमाणभाषेत स्वीकारले तर प्रमाण भाषा सर्वसमावेशक बनेल.''

मराठी भाषा आणि देशातील, विदेशातील भाषा यांच्यामध्ये परस्पर साहित्य व्यवहार वृद्धिंगत झाल्यास मराठी समृद्धी होईल आणि महाराष्ट्राची संस्कृती सर्वदूर

पोचेल. मराठीपेक्षा वेगळी मातृभाषा असलेल्या देशी किंवा परदेशी लेखकांनी मराठी भाषेमध्ये किंवा महाराष्ट्राविषयी लिहिलेल्या उत्कृष्ट ग्रंथांना पुरस्कार देण्याच्या योजनेमुळे मराठी भाषा आणि महाराष्ट्र यांची प्रतिमा सर्वदूर पोचण्यास मदत होईल, असे ते म्हणाले.

*** राज्यकर्ते मराठीबाबत उदासीन**

''अलीकडच्या काळात एखाद्या मराठी माणसाला विद्यापीठातर्फे डी.लिट देण्यात आलेली नाही, ज्येष्ठ साहित्यिक विजय तेंडुलकर यांनाही हा सन्मान देण्यात आला नाही, त्याबद्दल खंत वाटते.'' अशी भावना मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू व ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी व्यक्त केली. यशवंतराव चव्हाण हे दूरदृष्टी असलेले मुख्यमंत्री होते; मात्र त्यांच्यानंतर मराठीच्या बाबतीत कोणतेही ठोस निर्णय घेतले गेलेच नाहीत, अशी टीकाही त्यांनी केली.

मराठी भाषादिनाचे औचित्य साधून 'मराठी विकास आणि संस्थात्मक व्यवहार' या विषयावर एका चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. चर्चासत्राचे उद्घाटन मुंबई विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरू डॉ. चंद्रा कृष्णमूर्ती यांच्या हस्ते झाले.

पॉप्युलर प्रकाशनाचे रामदास भटकळ म्हणाले, ''मराठी भाषा व इतर भाषांचे एकमेकींशी माय-मावशीचे नाते आहे. त्यामुळे भाषांची देवाणघेवाण ही जास्तीत जास्त प्रमाणात व्हायला हवी.'' त्यांनी आंतरभारतीय साहित्य संवाद केंद्रातर्फे मराठी-गुजराती आणि गुजराती-मराठी असा एक अनुवाद प्रकल्पच हाती घेतला आहे. डॉ. विजया वाड म्हणाल्या, ''आम्ही सर्व विश्वकोशांचा एक ७ सीडींचा संच तयार केला आहे. त्याला चांगल्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे.'' महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष मधू मंगेश कर्णिक, प्रा. प्र. ना. परांजपे, महाराष्ट्र राज्य भाषा संचालनालयाचे अध्यक्ष गौतम शिंदे, प्रतिमा जोशी, मराठी अभ्यास केंद्राचे शरद गोखले यांचीही या वेळी भाषणे झाली.

*** संकेत स्थळावर मराठी उद्योजक**

मराठी अस्मितेच्या मुद्द्यामुळे सध्या मराठी भाषकांचा कलही मराठी व्यावसायिक शोधण्याकडे आहे; परंतु मराठी व्यावसायिकांची माहिती उपलब्ध नसल्यामुळे त्यांचा शोध घेणे कठीण होते. परिणामी इच्छा नसतानाही अमराठी व्यावसायिकांकडून काम करून घ्यावे लागते. ही गरज लक्षात घेऊन डोंबिवलीतील तीन तरुणांनी एकत्र येऊन www.marathiyp.com या संकेतस्थळाची निर्मिती केली आहे. देशातील उद्योजकांबरोबरच देशाबाहेरील मराठी उद्योजकांची सूची या संकेतस्थळावर उपलब्ध असून, २५ हजारांपेक्षा जास्त मराठी व्यावसायिकांनी या बेवसाईटला भेट देऊन या संकेतस्थळावर

नावनोंदणी करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. या संकेतस्थळाची अधिकृत घोषणा 'राज्यभाषा दिना'चे औचित्य साधून करण्यात आली.

डोंबिवलीतील दीपक उमरेडकर, देवेंद्र खरे आणि शिल्पा दळवी या तिघांनी या संकेतस्थळाच्या माध्यमातून बसल्या जागी नागरिकांना देशातील आणि देशाबाहेरील व्यावसायिकांचा शोध घेणे सुलभ केले आहे. या संकेतस्थळावर प्रत्येक व्यावसायिकाला प्रत्येकी एक वेबपेज देण्यात येणार असून, त्यात उद्योजकांची संपूर्ण माहिती, पोर्टफोलिओ, व्यवसायसंबंधित छायाचित्रे, लोगो, व्हीडीओ, स्लाईड शो आणि प्रेझेन्टेशन असेल. उद्योजकाला हवे ते बदल या वेबपेजवर करता येणार आहेत हे विशेष. त्यासाठी त्याला स्वतंत्र आयडी-पासवर्ड देण्यात येणार आहे.

*** 'शोध मराठीचा' संस्थेकडून 'मराठी एडिटर' सुविधा**

मराठीतून 'ई-मेल' करणे आता अधिक सुलभ होणार आहे. 'शोध मराठीचा' या संस्थेने 'मराठी एडिटर' ही सुविधा उपलब्ध करून दिली आहे. तिचा वापर करून जगातील संगणकावरून मराठी भाषेतून मजकूर टाइप करता येणार आहे. त्यामुळे भाषेचा प्रसार आणि प्रचार होण्यास मदत होणार आहे.

संस्थेचे शुभानन गांगल आणि ज्येष्ठ पत्रकार यमाजी मालकर यांनी या सुविधेची माहिती पत्रकार परिषदेत दिली. ता. २७ फेब्रुवारीपासून www.shodhmarathicha.com या संकेतस्थळावरून ही सुविधा मोफत उपलब्ध झाली आहे. 'मराठी एडिटर' या सुविधेतील फाँट सोईस्कर आहेत. मराठीत टाइप केलेला ई-मेल हा संबंधित व्यक्तीला पाठविल्यानंतर तो जसाच्या तसा दिसतोच, असे नाही. यामुळे अनेक जण मराठीतील मजकूर पाठविताना 'पीडीएफ' फाईल तयार करतात आणि मजकूर 'स्कॅन' करून 'ई-मेल'द्वारे पाठवितात, तर काही जण इंग्रजीचा वापर संवाद साधण्यासाठी करतात.

या अडचणीतून 'मराठी एडिटर'मुळे मार्ग निघाला आहे. 'मराठी एडिटर'मधून 'ई-मेल' मराठीतून पाठविला, तर ज्याला तो मिळणार आहे, त्यामध्ये 'गांगल वन फाँट' डाऊनलोडची सुविधा असेल. फाँट डाऊनलोड केला, की संगणकावर मराठीचा वापर करता येईल. 'मराठी एडिटर'ची लिंक पाठविलेल्या व्यक्तीलाही त्याचा वापर करता येईल. त्याचप्रमाणे 'मराठी एडिटर' हा पेन ड्राईव्हमध्ये 'सेव्ह' करता येईल. सर्वसामान्यांच्या गरजा लक्षात घेऊन हा 'एडिटर' तयार केला आहे. 'मायक्रोसॉफ्ट'चे 'वर्ड', 'एक्सेल', 'पेजमेकर', 'फोटोशॉप' यांच्या प्रमाणेच 'गूगल', 'याहू', 'हॉटमेल' या ठिकाणीही वापर करता येतो. या सुविधेमुळे व्यवहारात, व्यवस्थापनात मराठीचा सहभागी वाढेल.

या सुविधेसाठी सुधीर दरोडे आणि आनंद जोग यांनी अर्थसाह्य केले आहे.

*** 'अक्षरधारा' ग्रंथ प्रदर्शनात विज्ञान पुस्तकांचे दालन**

विज्ञानदिनाचे औचित्य साधून 'अक्षरधारा' पुस्तक प्रदर्शनात विज्ञानविषयक पुस्तकांचे विशेष दालन ठेवून २५ टक्के सवलत देण्यात आली अशी माहिती 'अक्षरधारा'चे संचालक लक्ष्मण राठिवडेकर यांनी दिली.

कर्वे रस्त्यावरील अंबर हॉल येथे हे पुस्तक प्रदर्शन ३ एप्रिलपर्यंत सुरू होते.

विज्ञानविषयक विभागात मोहन आपटे, डॉ. जयंत नारळीकर, आनंद घैसास, निरंजन घाटे, डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी, डॉ. अरुण मांडे, डॉ. बाळ फोंडके आदी लेखकांची विविध वैज्ञानिक विषयांवरील पुस्तके उपलब्ध होती. याशिवाय विज्ञानातील जमतीगमती, अंतराळातील भस्मासुर, विज्ञान कुतूहल, दुर्बिणी आणि वेधशाळा, अंतराळातील स्फोट, सूर्यमालेतील सृष्टीचमत्कार, इंटरनेट - एक कल्पवृक्ष, कृष्णविवर, स्पेसशटल, अवकाशमोहिमा, विज्ञान परिक्रमा, अनपेक्षित शोध, ए टू झेड विज्ञान, अणुविवेक, तारकांच्या विश्वात, किस्से शास्त्रज्ञांचे अशा पुस्तकांना विशेष मागणी होती. अलीकडे माहिती-तंत्रज्ञानविषयक आणि विज्ञानविषयक पुस्तकांविषयीचे कुतूहल वाढीला लागले आहे. याशिवाय पुस्तक प्रदर्शनात कोशवाङ्मय, कांदबऱ्या, कथासंग्रह, कवितासंग्रह, प्रवासवर्णने, अनुवादित साहित्य, धार्मिक आणि आध्यात्मिक पुस्तकेही उपलब्ध होती.

*** 'साम'वर मराठी भाषेतून हॉलिवूडपट**

मराठी, हिंदी चित्रपटांबरोबरच भव्य-दिव्य सादरीकरण, उत्तम दिग्दर्शन व रोमांचकारी अनुभूती देणाऱ्या हॉलिवूडपटांची क्रेझ सध्या वाढतच आहे. वेगळ्या धाटणीचे विषय, भरगच्च ॲक्शन आणि रोमान्सचा तडका यांचे एकत्रित पॅकेज देणारे दर्जेदार इंग्रजी चित्रपट आता मराठी भाषेतून रोज रात्री साडेआठ वाजता, 'साम' रसिकांना पाहण्याची संधी 'साम मराठी वाहिनी' मुळे लाभणार आहे.

*** 'गाव तेथे ग्रंथालय योजना'**

सामाजिक प्रदूषण दूर करून निकोप सामाजिक वाढीसाठी विधायक विचारांची अधिकाधिक माणसे उभी राहणे गरजेचे आहे आणि विधायक वाचनाने आदर्श विचार रुजवण्यासाठी सुशिक्षित तरुणांनी 'गाव तेथे ग्रंथालय' ही कल्पना राबवावी, असे विचार पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रा. दिगंबर दुर्गाडे यांनी व्यक्त केले.

पुणे जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या ग्रंथालय उपाध्यक्षपदी सुभाष मारणे यांची नुकतीच निवड झाली. ग्रंथालय जिल्हाध्यक्ष प्रभाकर जगताप, प्रदेश युवक सरचिटणीस प्रवीण काळभोर, जिल्हा युवक उपाध्यक्ष लक्ष्मण बांदल, सरचिटणीस राहुल

चोरघडे, किरण तावरे, राहुल कामठे, किरण राऊत यांसह कार्यकर्ते उपस्थित होते.

वाचनसंस्कृती लोप पावून चॅनेलसंस्कृतीचा अतिरेक होत आहे असे प्रा. दुर्गाडे म्हणाले. 'ग्रंथ हेच जीवन', 'वाचाल तर वाचाल', 'पुस्तकांसारखा दुसरा गुरू नाही' ही सुभाषिते सध्या फक्त भिंतींची शोभा वाढवत आहेत. हिंसाचार, अश्लीलता, बीभत्सपणा दाखविणाऱ्या दूरचित्रवाणी वाहिन्यांची संख्या वाढत आहे. लहान मुले, विद्यार्थी, तरुण हे या वाहिन्यांवरील नकारात्मक कार्यक्रमांनी बिथरत आहेत. देश घडविणारी ही पिढी वाचवायची असेल तर तिला शाहू-फुले-आंबेडकर आणि ज्ञानेश्वर, तुकाराम ते छत्रपती शिवाजी यांचे विचार व कार्य यांची ओळख व्हायला हवी. वाचनसंस्कृती वाढवण्यासाठी गाव तेथे ग्रंथालय ही योजना विधायक ठरेल.

*** एकनाथ वाणी लिखित पुस्तकाचे प्रकाशन**

एकनाथ वाणीलिखित 'मी, पृथ्वी आणि प्रवास' पुस्तकाचे प्रकाशन विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. अरुण निगवेकर यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ विचारवंत डॉ. मा. प. मंगुडकर, डॉ. प्रमोद तलगेरी, डॉ. सतीश देसाई, उत्कर्ष प्रकाशनाचे सु. वा. जोशी, मंजिरी जोशी आदी या वेळी उपस्थित होते.

''जीवनाच्या वाटेत आलेली अडथळ्यांची शर्यत धैर्याने पार केल्यास प्रगती साधता येते,'' असे मत 'सकाळ'चे संपादक सुरेशचंद्र पाध्ये यांनी व्यक्त केले. ते म्हणाले, ''परिस्थिती हाताळत वाटचाल केल्यास शोधण्याची प्रवृत्ती निर्माण होते. कष्ट व प्रामाणिकपणाच्या बळावर चांगले यश मिळते. वाणी यांचे कार्यही समाजासाठी आदर्श आहे. त्यांच्या लेखनात सूचकता आणि स्पष्टपणा आहे.''

डॉ. निगवेकर म्हणाले, ''जीवघेण्या स्पर्धांमुळे निराशेच्या गर्तेत सापडलेल्यांना एकनाथ वाणी यांचे हे पुस्तक प्रेरणादायी ठरेल. जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून कसे पाहावे, याचा वस्तुपाठ या पुस्तकात मांडला आहे. सामाजिक संतुलन व समृद्ध जीवनाचा संदेश या पुस्तकात आहे.''

डॉ. तलगेरी म्हणाले, ''वाणी यांचे पुस्तक सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण आहे.''

*** वनिता जाधव यांच्या चित्रकृतींचे प्रदर्शन**

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून दिल्ली येथील इंडिया हॅबिटॅट सेंटरमध्ये वनिता जाधव यांच्या चित्रकृतींचे प्रदर्शन आयोजित केले होते. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन केंद्रीय गृहनिर्माण व नगरविकासमंत्री सेलजा यांच्या हस्ते झाले. राज्यसभा सदस्य अनिल राव, तसेच अनेक कलाप्रेमी या प्रसंगी उपस्थित होते. ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक अनंतराव वाईकर यांच्या वनिता जाधव या कन्या. देशप्रेमाचा प्रवाह त्यांच्या चित्रांमधून रंग, रेषा आणि आकारांची विविध रूपे घेऊन प्रकट झाला आहे. निळा,

हिरवा आणि भगवा या रंगछटांचा अतिशय कल्पक आणि संवेदनशील वापर त्यांनी आपल्या चित्रांतून केला आहे. देशाचे पारंपरिक सांस्कृतिक वैभव, आधुनिक काळात देशाने सर्व क्षेत्रांत केलेली प्रगती, वैश्विक जाणिवा आणि भावी काळातील विकासाचे स्वप्न... हे सारे चित्ररूपाने प्रकट झाले आहे.

*** ट्विटर, फेसबुक वापरावरील बंदी 'पेंटॅगॉन'ने उठवली**

सोशल मीडियामुळे सुरक्षेच्या दृष्टिकोनातून होणारे फायदे जास्त असल्याचे लक्षात आल्याने 'पेंटॅगॉन'ने अमेरिकी सैन्यदलांना ट्विटर, फेसबुकसह विविध 'वेब २.०' साईट्स वापरण्याची परवानगी दिली आहे.

अमेरिकेच्या संरक्षण विभागाने आपल्या कार्यालयातील कॉम्प्युटर सिस्टीमद्वारे 'यू ट्यूब'सारख्या वेबसाईट्स वापरण्यावर २००७मध्ये बंदी घातली होती.

'पेंटॅगॉन'चा हा नवा निर्णय नौदलासह सैन्यदलांच्या विविध विभागांसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

यापूर्वी अशा साईट्सबाबत निश्चित भूमिका नव्हती. त्यामुळे काही वेबसाईट्स वापरण्यावर बंदी घालण्यात आली होती. अमेरिकेच्या संरक्षण दलांसाठी सोशल मीडियाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. अमेरिकी सैन्यदलाचे संयुक्त प्रमुख ॲडमिरल माईक म्युलेन हे 'ट्विटर'चा वापर करतात. तब्बल १६ हजार जणांशी त्यांचा संपर्क आहे. हैतीतील भूकंपानंतर तेथे सुरू केलेल्या मदतकार्याबाबतची ताजी माहिती देण्यासाठी सैन्याच्या दक्षिण मुख्यालयानेही 'ट्विटर'चाच आधार घेतला होता. अमेरिकेचे संरक्षण सचिव रॉबर्ट गेट्स यांनीदेखील सोशल नेटवर्किंगचा वापर करण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांच्या मते सैन्यदलातील बहुतेक जवान विशीच्या उंबरठ्यावर असून त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी 'पेंटॅगॉन'ला याच साईट्सची मदत होणार आहे.

*** मोबाईल कंपन्यांची मराठीतून सेवा**

आता एअरटेल, व्होडाफोन, एअरसेल व लूप मोबाईल या कंपन्यांनी मराठीतूनही सेवा सुरू केली आहे. 'एमटीएनएल'सुद्धा लवकरच मराठी सेवा सुरू करणार आहे.

महाराष्ट्रातील मोबाईल कंपन्यांकडून ग्राहकांना मिळणाऱ्या सूचना इंग्रजी व हिंदी या दोन भाषांतूनच देण्यात येत असत. या कंपन्यांकडून मराठीला डावलले जाते म्हणून मनसेचे अखिल चित्रे यांनी मोबाईल कंपन्यांच्या मुंबईतील अधिकाऱ्यांशी संपर्क साधून, ग्राहकांना सर्व सेवा मराठीतून देण्याचा आग्रह धरला.

अखेर व्होडाफोन, एअरटेल, एअरसेल व लूप मोबाईल या चार आघाडीच्या मोबाईल कंपन्यांनी जागतिक मराठी भाषादिनाच्या मुहूर्तावर आपल्या सेवा इंग्रजी व

हिंदीसह मराठीतून देण्यास प्रारंभ केला आहे.

*** 'मसाप'च्या परीक्षांच्या विद्यार्थी संख्येत घट**

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे घेण्यात येणाऱ्या विविध परीक्षांना बसणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत लक्षणीय घट झाली आहे. या आद्य साहित्य संस्थेतर्फे शालेय विद्यार्थ्यांमध्ये साहित्याची आवड निर्माण करण्याबरोबरच अभिरुची घडविण्याच्या उद्देशातून 'प्रथमा', 'प्रवेश', 'प्राज्ञ' आणि 'विशारद' अशा चार परीक्षा घेतल्या जातात. महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांच्या प्रेरणेतून ही संकल्पना पुढे आली. साहित्य परिषदेच्या परीक्षा देणे हे विद्यार्थ्यांना प्रतिष्ठेचे वाटत असे. मात्र गेल्या काही वर्षांपासून या परीक्षार्थींच्या संख्येमध्ये सातत्याने घट होत आहे.

इयत्ता ६ ते ८ मधील कोणाही विद्यार्थ्यास प्रथमा परीक्षेस, तर नववीपासूनच्या कोणाही विद्यार्थ्यास प्रवेश परीक्षेस बसता येते. परिषदेची प्रवेश परीक्षा किंवा दहावीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या कोणाही व्यक्तीस किंवा अठरा वर्षे पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यास प्राज्ञ परीक्षेस बसता येते. प्राज्ञ परीक्षा उत्तीर्ण, बारावी किंवा सरकारमान्य विद्यापीठाची प्रथम वर्ष परीक्षा उत्तीर्ण झालेल्यास विशारद परीक्षेस बसता येते.

प्रमुख कार्यवाह डॉ. माधवी वैद्य म्हणाल्या, ''सध्या मराठी माध्यमातून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत घट होत असल्याने त्याचा फटका परीक्षांना बसला आहे. शाळांमध्ये आधीच अभ्यासक्रम आणि अन्य परीक्षांचा एवढा भार विद्यार्थ्यांवर असतो, की आणखी एका परीक्षेचा अतिरिक्त बोजा स्वीकारायचा का, अशी त्यांची भावना असते. त्यामुळे या परीक्षंचा जुना अभ्यासक्रम बदलून विद्यार्थ्यांच्या सध्याच्या पाठ्यक्रमाशी मिळताजुळता असावा असा प्रयत्न आहे.''

*** बातम्यांसाठी मोबाईलचा वाढता वापर**

अमेरिकेत दैनिकांच्या ऐवजी मोबाईलवर बातम्या वाचणाऱ्यांचे प्रमाण वाढत आहे. पीव रिसर्च सेंटरने केलेल्या सर्वेक्षणातून हे स्पष्ट झाले. गेल्या दशकभरापासून तंत्रज्ञानातील बदलांमुळे माहिती मिळविण्यासाठी नागरिक आधुनिक साधनांवर अवलंबून राहू लागले आहेत. या बदलांचाच एक भाग म्हणून मोबाईलवर इंटरनेटचा वापर करण्याकडे अमेरिकी नागरिकांचा कल वाढू लागला आहे. या सर्वेक्षणामुळे त्याला पुष्टी मिळाली. सर्वेक्षणानुसार २६ टक्के अमेरिकी नागरिक मोबाईलवरच ताज्या बातम्या वाचतात. ताज्या बातम्यांसाठी मोबाईलवर अवलंबून असणाऱ्यांमध्ये तरुण पिढीचे प्रमाण जास्त आहे. सर्वेक्षणात सहभागी झालेल्यांपैकी ४३ टक्के तरुणांनी मोबाईलवरच बातम्या वाचण्याला प्राधान्य देत असल्याचे सांगितले. सर्वेक्षणात सहभागी झालेल्यांपैकी मोबाईलवर इंटरनेट सर्फिंग करणारे ७२ टक्के नागरिक

हवामान जाणून घेण्यासाठी आणि त्याखालोखाल ताज्या बातम्या जाणून घेण्यासाठी मोबाईलवर इंटरनेटचा वापर करत आहेत.

*** दामू धोत्रे यांचे स्मारक हवे**

सर्कस क्षेत्रात भारताचे नाव उंचावणारे दामू धोत्रे यांचे स्मारक पुणे शहरात उभारावे, अशी मागणी स्व. दामू धोत्रे प्रतिष्ठानचे अध्यक्ष आनंद धोत्रे यांनी केली आहे. शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे आणि प्रसिद्ध व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर यांनी या स्मारकास पाठिंबा दर्शविला आहे. असे स्मारक उभे राहिल्यास शहराच्या सौंदर्यात नक्कीच भर पडेल आणि तरुण पिढीलाही त्यातून प्रेरणा मिळेल, असे प्रतिष्ठानचे प्रतिपादन आहे.

*** अजय-अतुलची वेबसाईट**

अजय-अतुल यांच्या संगीतात एक वेगळा गोडवा आहे. 'विरुद्ध' या चित्रपटाच्या वेळी त्यांच्यातील गुणवत्ता दिसली होती. आता ती राष्ट्रीय पुरस्कारामुळे सिद्ध झाली, अशा शब्दांत प्रसिद्ध अभिनेते अमिताभ बच्चन यांनी संगीतकार अजय-अतुल यांचे कौतुक केले.

संगीतकार अजय-अतुल यांनी 'अजयअतुल डॉट कॉम' ajayatul.com नावाची वेबसाईट सुरू केली आहे. बच्चन म्हणाले, ''या संगीतकार जोडीकडे असलेली गुणवत्ता आपल्याला आधीच जाणवली होती. त्यांचे एकूणच गुण व नम्रता पाहून आपण या समारंभाला आलो.''

मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे या प्रसंगी म्हणाले, 'नटरंग'मधील गाणी ऐकून पिंजऱ्यातून लावणी आता बाहेर पडली आहे, असे वाटते.

ज्येष्ठ संगीतकार प्यारेलाल, अभिनेते सचिन पिळगावकर, दिग्दर्शक राजीव पाटील, अभिनेता उपेंद्र लिमये, अभिनेत्री मुक्ता बर्वे, अमृता खानविलकर, श्रीरंग गोडबोले, गुरू ठाकूर, संजय जाधव वगैरे उपस्थित होते. वेबसाईटबद्दल माहिती देताना अजय म्हणाला, आम्ही आमच्या चाहत्यांना नेहमीच भेटू शकत नाही. त्यांच्याशी संवाद साधू शकत नाही. त्यामुळे ही वेबसाईट सुरू केली आहे. तिच्यावर आमच्याबद्दलची माहिती, आमची गाणी तसेच आमची छायाचित्रे असतील.

*** पुणे विद्यापीठ कुलगुरुपदी डॉ. रघुनाथ शेवगावकर**

पुणे विद्यापीठाच्या कुलगुरुपदी मुंबईच्या 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी'मधील (आयआयटी) प्राध्यापक डॉ. रघुनाथ शेवगावकर यांची निवड कुलपती डॉ. के. शंकरनारायण यांनी जाहीर केली आहे.

पुणे विद्यापीठाच्या कुलगुरुपदी निवड झालेले डॉ. शेवगावकर हे १९८७ पासून 'आयआयटी' मुंबईत प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे ते उपसंचालक होते. डॉ. शेवगावकर यांनी ग्वाल्हेरमध्ये शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर जिवाजी विद्यापीठातून १९७५ मध्ये अभियांत्रिकीची पदवी मिळविली. त्यानंतर 'आयआयटी कानपूर'मधून 'एम. टेक.' पूर्ण केले. बंगळूर येथील रामन रिसर्च इन्स्टिटय़ूटमध्ये तसेच अमेरिकेतील 'युनिव्हर्सिटी ऑफ मेरीलँड'मध्येही संशोधन केले आहे. डॉ. शेवगावकर यांची पुस्तके तसेच शोधनिबंध आंतरराष्ट्रीय नियतकालिकात प्रसिद्ध झाले आहेत. विद्यापीठ अनुदान आयोगासह (युजीसी) देशातील विविध केंद्रीय संस्थांवर त्यांनी काम केले आहे. अनेक संस्थांचे ते मानद सदस्य आहेत.

'आयआयटी'सारख्या उच्च शिक्षण संस्थांमधून पुणे विद्यापीठाचे कुलगुरू झालेले डॉ. शेवगावकर पहिले कुलगुरू आहेत. विद्यापीठाच्या गेल्या साठ वर्षांतील ते अठरावे कुलगुरू आहेत. या आधी बॅरिस्टर जयकर, डॉ. रँग्लर परांजपे, महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार, डॉ. धनंजयराव गाडगीळ, डॉ देवदत्त दाभोलकर, डॉ. वि. ग. भिडे, डॉ. वसंतराव गोवारीकर, डॉ. अरुण निगवेकर, डॉ. अशोक कोळस्कर व डॉ. नरेंद्र जाधव यांनी विद्यापीठाचे कुलगुरुपद भूषविले आहे.

''पुणे विद्यापीठासारख्या ख्यातनाम विद्यापीठाचा कुलगुरू म्हणून माझ्यावर मोठी जबाबदारी आली आहे. 'आयआयटी'तील अनुभवाच्या आधारे पुणे विद्यापीठाला देशातील पहिल्या क्रमांकाचे विद्यापीठ करण्याचा माझा प्रयत्न राहील,'' अशी भावना डॉ. रघुनाथ शेवगावकर यांनी व्यक्त केली.

''पुणे विद्यापीठाला मोठी परंपरा आहे. विद्यापीठाच्या यंत्रणेत काम करण्यासाठी मी नवखा असलो, तरी 'आयआयटी'तील अध्यापनाचा अनुभव, 'आयआयटी'; तसेच विद्यापीठातील चांगल्या गोष्टींची सांगड घालून विद्यापीठाला सर्व पातळ्यांवर पुढे नेण्याचा प्रयत्न करू. संशोधनाबरोबरच उद्योग व शिक्षण संस्थांमधील संवाद वाढविण्याचा प्रयत्न करू. 'आयआयटी'त झालेले प्रयोग पुणे विद्यापीठात राबविण्याचा प्रयत्न राहील.'' असे ते म्हणाले.

### * 'कवितेसाठी प्रतिभाशक्ती चिंतनशीलता आवश्यक'

कविता करण्यासाठी प्रतिभाशक्ती, इतरांच्या कवितांचे वाचन आणि चिंतनशीलतेची नितांत आवश्यकता असल्याचे मत नौरोसजी वाडिया महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भगवान ठाकूर यांनी व्यक्त केले.

सतरा वर्षांपासून कार्यरत असणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे वाडिया महाविद्यालय शंभरावे कविसंमेलन झाले. यामध्ये प्रा. रंजना फडके, दशरथ यादव, रमेश रेडेकर, किशोर टिळेकर, संगीता पाटील, रूपाली अवचरे, आकाश

सोनवणे हे कवी सहभागी झाले होते.

निसर्ग, विडंबन काव्य, सामाजिकता, मानवी स्वभाव, नाती असे अनेक विषय त्यामध्ये होते.

*** ओप्रा नवीन केबल नेटवर्क सुरू करणार**

गेल्या २४ वर्षांपासून अमेरिकेत आणि १४५ देशांत प्रसारित होणारा लोकप्रिय 'ओप्रा विन्फ्रे शो' २०११मध्ये रौप्य महोत्सव साजरा करणार आहे. अमेरिकेत ७० लाख घरात पाहिला जाणारा हा टीव्ही कार्यक्रम असून, या कार्यक्रमाची लोकप्रियता पाहून जगभरातील असंख्य वाहिन्यांनी 'चॅट शो' सुरू केले. ओप्रा यांनी तीन वर्षांपूर्वी 'ओप्रा अँड फ्रेंडस' नावाची स्वत:ची नभोवाणी वाहिनीही सुरू केली. यंदाच्या फोर्ब्सच्या यादीत ओप्रा विन्फ्रे ४५व्या स्थानावर आहे. 'टॉक शो'चा समारोप झाल्यानंतर सीबीएस टेलिव्हिजनवरून ओप्रा विन्फ्रे या डिस्कव्हरी नेटवर्कच्या साह्याने ओप्रा विन्फ्रे नेटवर्क 'ओन' नावाचे केबल सुरू करणार आहेत.

*** साहित्यिक कोणत्याही प्रश्नावर भूमिका घेण्याचे टाळतात**

''आधुनिक काळात साहित्य व साहित्यिक कोणत्याही प्रश्नावर कोणतीही भूमिका घेत नाहीत. त्यामुळे साहित्य संमेलनाच्या निमित्ताने 'कोटीच्या कोटी उड्डाणे' घेतली तरी काहीही होणार नाही,'' असे मत डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी 'उपनगरीय साहित्य संमेलन : गरज, अडचणी आणि भूमिका' या विषयावरील परिसंवादात व्यक्त केले. वि. भा. देशपांडे, ज्येष्ठ समीक्षक रा. ग. जाधव, 'साहित्यिक कलावंत प्रतिष्ठान'चे अध्यक्ष दिलीप बराटे, 'अक्षरभारती'चे अध्यक्ष माधव राजगुरू, परिषदेच्या कार्यवाह माधवी वैद्य व्यासपीठावर उपस्थित होत्या.

डॉ. दाभोलकर म्हणाले, ''माणसाला उन्नत करणे हे साहित्याचे प्रमुख काम आहे. प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी आहे. साहित्याचा मूळ विषय माणूस आणि निसर्ग. माणूस हा वैश्विक आहे. मग, उपनगरीय स्थानिक कसे होते? ते वैश्विकतेचे प्रतिबिंब आहे. साहित्य संमेलनात साधेपणा स्वीकरण्याची गरज आहे. साधेपणा म्हणजे कंजूषपणा किंवा कंगालपणा नाही. समाजातील संवेदनशीलतेला ग्रहण लागले आहे. त्या समाजातील साहित्य संमेलनाला आज ना उद्या या आव्हानाला सामोरे जावे लागेल याची नोंद घेतली पाहिजे.''

जाधव म्हणाले, ''संमेलन हे साहित्य संस्थेचे उद्दिष्ट नाही. साहित्याची अभिरुची वाढविणे, हे त्याचे प्रमुख काम आहे. साहित्य संस्थेने संमेलन भरविणे हे उद्दिष्ट निश्चित केले असल्यास संस्थेच्या भूमिकेत काहीतरी गफलत आहे.''

साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. सतीश देसाई यांनी प्रास्ताविक केले.

### * कीर्तन महोत्सव

''कीर्तन हे प्रसारमाध्यमांतील सर्वांत प्रभावी आणि परिणामकारक माध्यम आहे,'' असे मत प्रसारमाध्यमतज्ज्ञ डॉ. विश्वास मेहेंदळे यांनी व्यक्त केले.

'श्री हरिकीर्तनोत्तेजक सभे'तर्फे शतकोत्तर रौप्यमहोत्सवानिमित आयोजित 'कीर्तन महोत्सव'चे उद्घाटन मेहेंदळे यांच्या हस्ते झाले. सभेचे अध्यक्ष गजाननबुवा राईलकर, विश्वस्त शरश्चंद्र ठकार आणि शाहीर हेमंत मावळे या वेळी उपस्थित होते. उद्घाटन कार्यक्रमानंतर श्रेया साने आणि आनंदबुवा जोशी यांचे कीर्तन झाले.

मेहेंदळे म्हणाले, ''देवाच्या साक्षीने लोकांपुढे कीर्तन करणाऱ्या कीर्तनकाराची कथनाची पद्धत आणि विषयाची मांडणी प्रभावी असते. दोन बाय साडेतीन फुटांच्या जागेत तो 'परफॉर्मर' असतो. छोट्या गावात जाणारा आणि लोकांचे रंजनातून प्रबोधन करणारा कीर्तनकार हा लोकशिक्षक आहे. सर्व कीर्तनकारांची मोट बांधण्याचे काम संस्था या महोत्सवाच्या माध्यमातून करीत आहे.''

### * क्लायमेट चेंज पुस्तकाचे प्रकाशन

लहान मुलांच्या पर्यावरण बदलाविषयीच्या भावना 'क्लायमेट चेंज' या पुस्तकरूपाने शब्दबद्ध केल्याबद्दल होली स्टीक चाइल्ड डेव्हलपमेंट इंडियाचे कौतुक करायला हवे असे उद्गार आदिवासी संशोधन संस्थेचे डायरेक्टर डॉ. अरविंदकुमार झा यांनी काढले.

भारतीय ग्रामीण व आदिवासी भागातील मुलांच्या पुनर्वसनाचे काम होली स्टीक संस्था करते. या वेळी संस्थेचे अध्यक्ष एन. थॉमस राजकुमार, युनायटेड नेशन एन्व्हायर्मेंट पॅनलचे सदस्य डॉ. सुकुमार डिवोट्टो, संस्थेचे कोशाध्यक्ष ग्लेन मस्कारेन्हास, उपस्थित होते.

डॉ. डिवोट्टो म्हणाले, ''मुलांना पर्यावरणाविषयी जागृत केल्यास भविष्यकाळात चित्र नक्कीच सकारात्मक होईल.'' संस्थेच्या रांची, गुजरात, मेळघाट येथून आलेल्या मुलांनी वातावरण बदलाच्या नकारात्मक परिणामाविषयीची मनोगते व्यक्त केली. अतिवृष्टी, वृक्षतोड, दुष्काळ, दुर्भिक्ष या विषयावरील चित्रप्रदर्शन भरविले. प्रास्ताविक होली स्टीक चाइल्ड डेव्हलपमेंट इंडियाचे अध्यक्ष एन. थॉमस राजकुमार यांनी केले.

### * मुस्लिम मराठी साहित्य परिषद

सातारा जिल्ह्यातील मुस्लिम मराठी साहित्यिकांना एकत्र करून मुस्लिम मराठी साहित्य परिषदेची स्थापना करण्यासाठी लेखिका सौ. फरझाना डांगे यांनी जिल्ह्यातील साहित्यिकांची बैठक कऱ्हाड येथे घेतली.

सौ. डांगे म्हणाल्या, ''मुस्लिम साहित्याभोवती एक चौकट आहे. त्या चौकटीतून

प्रत्येकजण त्याकडे पाहत असतो. त्यामुळे ती चौकट मोडून मराठी साहित्याचा गाढा अभ्यास मुस्लिम समाजातील साहित्यिकांना करायला हवा, हे सांगण्याचा आमचा प्रयत्न आहे. येथील मुस्लिमांचे सगळे व्यवहार मराठीतून होत आहेत. त्यांचे संस्कारही मराठीचेच आहेत. अनेकदा ती गोष्ट लपवली गेली. त्याचा परिणाम मोठ्या प्रमाणावर येथे झाला आहे. त्यामुळे मराठी साहित्य लिहिणाऱ्या मुस्लिम साहित्यिकांसाठी व्यासपीठ निर्माण करणार आहोत. मुस्लिम समाजाव्यतिरिक्त अन्य समाजातील लोकांनाही समावून घेण्यात येईल. पुढे अखिल भारतीय राष्ट्रीय मुस्लिम मराठी साहित्य संमेलन घेण्याचे नियोजन आहे.''

*** स्त्रीमुक्तीचा हुंकार**

दोन शतकांतील स्त्री चळवळीतील महिलांचा संघर्ष 'समतेकडे वाटचाल' या नाटकाच्या माध्यमातून दाखविण्याचा प्रयत्न स्त्रीमुक्ती संघटनेने केला आहे. अशी माहिती स्त्रीमुक्ती चळवळीतील कार्यकर्त्या अलका पावनगडकर यांनी दिली.

त्या म्हणाल्या, ''स्त्री चळवळीत काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे दोन वर्षांपूर्वी शिरूरला 'विचारवेध' संमेलन झाले होते. यात गाणी, अभिवाचनातून मागील दोन शतकांतील स्त्री चळवळीतील महिलांचे योगदान स्पष्ट करण्यात आले होते. ज्योती म्हापसेकर यांची मूळ संकल्पना होती. त्यावरून शारदा साठे, सुषमा देशपांडे यांनी समतेकडे वाटचाल या नाटकाची निर्मिती केली आहे. स्त्रियांना 'माणूस' म्हणून जगण्याचा हक्क आहे, असे ज्या काळापासून बोलले जाऊ लागले; तसेच आधुनिकतेची 'बीजे' ज्या काळापासून दिसू लागली अशा दोन शतकांपूर्वीच्या लिखित नोंदी होत्या, त्यावरून हे नाट्यरूपांतर करण्यात आले आहे. या नाटकात अमेरिकी स्वातंत्र्ययुद्ध, फ्रेंच राज्यक्रांतीपासून ते भारतीय स्वातंत्र्यलढा अशा ठळक घटनांवर दृष्टिक्षेप टाकण्यात आला आहे. यासाठी गाणी, नाट्यसंकल्पना; तसेच जुने फोटो, स्लाइड आदी माध्यमांचाही वापर करण्यात आलो आहे.

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जॉन ॲडम्स यांची पत्नी ॲबिगेल यांनी पत्रांतून स्वातंत्र्य आणि राज्यघटना यात महिलांचा वेगळा विचार करा, स्त्रियांना हक्क द्या, गुलाम म्हणून वागवू नका, 'माणूस' म्हणून पुरुषांना अधिकार असतात, स्त्रियांना नसेल तर चालणार का, असा प्रश्न विचारला होता. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर 'पुरुष' हक्क जाहीरनामा मांडण्यात आला होता, त्या वेळी मेरी वुलस्टन क्राफ्ट यांनी महिलांना हक्क का नाहीत, असे विचारण्याचे धाडस केले होते. हे सर्व प्रसंग या नाटकात आहेत.

महाराष्ट्रातील धर्म, पुराण, सामाजिक, व्यवहार आदी पातळ्यांवर स्त्री दुजाभाव नाकारणाऱ्या ताराबाई शिंदे, सावित्रीबाई फुले, बंगालमधील स्त्री क्रांतिकारी कल्पना

दत्त, प्रीतिलता वड्डेदार, बीना दास ही पात्रे दाखविली आहेत. मुलींची घटणारी संख्या, धर्मशक्तीमुळे संकटात आलेले महिलांचे स्वातंत्र्य, महिलांना पाण्यासाठी करावी लागणारी पायपीट हे सर्व नाटकात दाखविले आहे'' असे पावनगडकर यांनी सांगितले.

*** उद्योजकता विकास अभ्यासक्रमात**

''उद्योजकता विकास आणि कौशल्य विकास या विषयांचा अभ्यासक्रमात समावेश करण्यासाठी प्रयत्न करू,'' असे आश्वासन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री राजेश टोपे यांनी 'जागतिक मराठी चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज'तर्फे आयोजित परिसंवादामध्ये दिले. लोकसभेचे माजी सभापती मनोहर जोशी, महापौर मोहनसिंग राजपाल, खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, अविनाश धर्माधिकारी, सुधीर मांडके, डी. के. अभ्यंकर, वैशाली वर्णेकर आदी या वेळी उपस्थित होते.

टोपे म्हणाले, ''देशात साठ टक्के लोकसंख्या तरुणांची आहे. त्यांच्यातून कुशल मनुष्यबळ निर्माण केले, तर लोकसंख्या ही देशासाठी संपत्ती ठरेल. त्यामुळे तरुणाईला नवी आव्हाने पेलण्यासाठी सज्ज केले पाहिजे. त्यासाठी तरुणांनी नोकरीची मानसिकता आणि अल्पसंतुष्ट वृत्ती सोडून उद्योजक बनण्याची गरज आहे. त्यासाठी उद्योजकता आणि कौशल्य विकासाचा अभ्यासक्रम शालेय स्तरापासून सुरू करण्यासाठी आम्ही प्रयत्न करू.''

जोशी म्हणाले, ''मराठी माणसाने फार मोठी स्वप्ने पाहण्याची सवय लावून घेतली पाहिजे. महाराष्ट्राला खऱ्या अर्थाने 'उद्योगी महाराष्ट्र' बनविण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. व्यवसाय म्हणजे तत्त्वज्ञान नाही, तर धंदा हे धनिक बनण्याचे साधन आहे. अजूनही पैसा मिळविणाऱ्याकडे हेटाळणीने पाहिले जाते. ही मनोवृत्ती मराठी माणसाने सोडली पाहिजे. सरकारनेही महाराष्ट्राच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात तरुणांना उद्योजक बनविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.''

*** माध्यमांचा क्षितिज विस्तार**

''कुठल्याही घटनेकडे पत्रकाराने माणुसकीच्या दृष्टीने आणि संवेदनशीलतेने पाहिले पाहिजे. त्याचबरोबर विविध कार्यक्षेत्रांची प्राथमिक माहिती त्याला असायला हवी,'' असे प्रतिपादन संगणकतज्ज्ञ अच्युत गोडबोले यांनी 'माध्यमांचा क्षितिज विस्तार' या विषयावर बोलताना केले. या वेळी मुंबई विद्यापीठातील वृत्तपत्र विभागाचे प्राध्यापक मिलिंद कोकजे, 'मी मराठी' वाहिनीचे कार्यकारी निर्माता सचिन परब, अतुल कहाते, उज्ज्वला बर्वे व 'मराठवाडा' महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. लॉरेन्स उपस्थित होते.

गोडबोले म्हणाले, ''कोणत्याही प्रकारच्या बदलाची सुरवातीला भीतीच वाटते;

मात्र माध्यमात होणाऱ्या बदलांकडे पत्रकारांनी संधी म्हणून पाहिले पाहिजे. तंत्रज्ञानाचा इतिहास व त्यात नव्याने होणाऱ्या घडामोडी समजून घेऊन त्याचा माध्यमात योग्यरीत्या वापर व्हायला हवा.''

माध्यमातील बदलत्या प्रवाहाबाबत बोलताना परब म्हणाले, ''आजकाल सोशल नेटवर्किंग साइट्सवर वाचकांना विशेषत्वाने आवडणाऱ्या गोष्टी कोणत्या याचा शोध घ्यायचा झाला, तर 'करमणूक' वा 'मनोरंजन' म्हणजे 'बॉलिवूड', 'क्रीडा' क्षेत्रातील 'सर्च' म्हणजे 'क्रिकेट' आणि 'नाती' वा रिलेशनशिप्स पाहायला गेले तर 'लिंगभाव' किंवा 'सेक्स' हे सरळ समीकरण असल्याचे दिसून येते. आजकाल साबण विकल्यासारखी वृत्तपत्रे विकली जातात, त्यामुळे पत्रकारिता क्षेत्रात जास्तीत जास्त अनुभव घेतलेल्यांनी माध्यमांची आचारसंहिता नव्याने मांडण्याची गरज आहे.''

कोकजे म्हणाले, ''पत्रकारांनी 'बायलाइन'चा अट्टहास सोडला, तर पत्रकारितेच्या माध्यमातून आपण नक्कीच 'सकस बातम्या' लोकांपर्यंत पोचवू शकतो.''

कहाते म्हणाले, ''माध्यमांचे कितीही 'फॉर्म्स' निर्माण झाले, तरी जोपर्यंत 'क्लास' (दर्जा)ला धक्का लागत नाही, तोपर्यंत कोणत्या माध्यमातून बातमी समाजापर्यंत पोचते आहे, याने फारसा फरक पडत नाही.''

तंत्रज्ञानाचा पत्रकारितेतील वाढता वापर व त्याचा त्यावर होणारा परिणाम, संकेतस्थळांद्वारे काही सेकंदात जनतेपर्यंत पोचणाऱ्या बातम्या, इंटरनेटवरील निर्बंध, वृत्तपत्रांच्या संकेतस्थळांचा वाढता वापर, अशा विषयांवर वक्त्यांनी आपली मते मांडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संजय तांबट यांनी केले. गणेश पुराणिक यांनी आभार मानले.

### * वृत्तपत्रीय कात्रणांचे संकलन

राज्यसत्तेवर अभ्यासू वर्गाचा अंकुश निर्माण झाला पाहिजे. मात्र, सध्या एखाद्या विषयाचे संशोधन करून मांडणी करणाऱ्यांची संख्या कमी झाली असून, सर्वत्र वैचारिक गारठा पसरला आहे, असे मत डॉ. द. ना. धनागरे यांनी रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीच्या संदर्भ ग्रंथालयाचे उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले.

विनय सहस्रबुद्धे, रेखा महाजन या वेळी उपस्थित होते. 'वृत्तपत्रीय' व नियतकालिकांतील चार लाखांहून अधिक कात्रणांचे संकलन प्रबोधिनीतर्फे करण्यात आले आहे. विविध तेवीस विषयांत याची विभागणी करण्यात आली असून संशोधक, विद्यार्थी, अभ्यासक, संस्थांना अल्प दरात ही कात्रणे उपलब्ध असणार आहेत.

धनागरे म्हणाले, ''पैसा असणाऱ्या व्यक्तींनाच राजकीय पक्षांकडून तिकीट दिले जाते, लोकप्रश्नांची त्यांना कितपत जाण आहे, असा प्रश्न त्यांना विचारला जात नाही. सामाजिक संस्थांबाबतही अशीच स्थिती निर्माण झाली असून, त्यांनी संशोधनाचा

अग्रक्रम ठरविणे गरजेचे आहे. मात्र, तसे न होता गेल्या तीस वर्षात सामाजिक संस्थाच विविध चळवळी हायजॅक करू लागल्या आहेत. इतकेच काय, सामाजिक कार्यकर्त्यांची प्रवृत्ती प्रथम राजकीय अग्रक्रम हीच झाली आहे. या स्थितीत बदल झाला पाहिजे. त्यासाठी यावर अंकुश ठेवणारा बुद्धिजीवी वर्ग निर्माण होणे गरजेचे आहे.''

*** नामदेव तळपे यांचा एकपात्री प्रयोग : धन्य तुकोबा समर्थ**

संत तुकाराम महाराज यांच्या जीवनचरित्रावर आधारित 'धन्य तुकोबा समर्थ' हा संगीतमय एकपात्री कार्यक्रमाचा सुवर्ण महोत्सवी प्रयोग नामदेव तळपे यांनी सादर केला.

महापौर योगेश बहल यांनी उद्घाटन केले. श्री. तळपे यांनी 'नाम घेता', 'पंढरीची वारी आहे माझे घरी', 'आपुला तो एक देव करुणी घाव', 'वृक्षवल्ली आम्हा', 'आम्हा घरी धन शब्दाचीच रत्ने', 'आम्ही जातो तुम्ही कृपा असो द्यावी' या अभंगांतून संत तुकाराम महाराजांच्या जीवनातील विविध प्रसंग सादर केले. त्यात तुकोबांचा जन्म, बालपण, देहू परिसर आणि इंद्रायणीचे माहात्म्य, तुकाराम महाराजांवर आलेली संकटे आणि त्यावर मात करण्यासाठी त्यांनी केलेले चिंतन, रचलेले अभंग, गाथा यांसह वैकुंठगमनापर्यंतचा आढावा अभंगांतून घेतला. 'आम्ही जातो आमुच्या गावा' या अभंगाने कार्यक्रमाचा समारोप झाला.

*** लोककला जतन करण्याची गरज**

भारतातील ग्रामीण जीवन झपाट्याने लोप पावत आहे आणि परिणामी येथील लोककलांचा अस्सल बाज नाहीसा होत आहे असा इशारा 'युनायटेड नेशन्स एज्युकेशनल, सायंटिफिक अँड कल्चरल ऑर्गनायझेशन'ने दिला आहे. लोककलाप्रकारांचे मूळ स्वरूपात जतन करण्यासाठी उत्तम दर्जाच्या प्रशिक्षण केंद्राची आवश्यकता आहे.

युनेस्कोतर्फे केलेल्या सर्वेक्षणात केरळपासून अरुणाचल प्रदेशपर्यंत विविध ठिकाणच्या लोककला प्रकारांचा विचार केला गेला. संबंधित कला प्रकारातील प्रतिनिधींशी संवाद साधण्यात आला. तसेच काही मान्यवर कलाकारांशीही चर्चा करण्यात आली. एकूण १०१५ व्यक्तींच्या मुलाखती आणि प्रश्नावलीतून पाहणीचे निष्कर्ष काढण्यात आले. अखिल भारतीय सांस्कृतिक संघातर्फे सचिव हेमंत वाघ यांनी सुरू केलेल्या राष्ट्रीय स्तरावरील बहुभाषिक नाट्य, नृत्य, वादन, गायन महोत्सवाची नोंद 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड'मध्येही झाली आहे. २००९मध्ये 'वैश्विक बहुसांस्कृतिकता' या उपक्रमात अठरा राज्यांतील आठ हजार पाचशे कलाकार सहभागी झाले होते. संस्थेने या कलाकारांना प्रश्नावली देऊन प्रशिक्षण, सादरीकरणाच्या संधी, आर्थिक प्राप्ती आणि कलाविषयक मते जाणून घेऊन, कलाकारांशी वैयक्तिक

संवाद साधून 'युनेस्को'ने अहवाल सादर केला. ''ग्रामीण जीवनातील पारंपरिक लोककला प्रकार झपाट्याने लोप पावत चालले आहेत कारण ग्रामीण संस्कृतीच ऱ्हास पावत आहे,'' असे या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

या सर्वेक्षणात नृत्य कलाकारांमध्ये सर्वाधिक वैविध्य आढळले. केरळपासून अरुणाचल प्रदेशपर्यंत विविध ठिकाणचे लोककला प्रकारही सादर झाले. वय, कलाप्रकार, साधनेचा कालावधी, गुरूंची माहिती, शिकविण्याच्या पद्धती, संधी, मोबदला, पुरस्कार, पारितोषिके, कला सादरीकरणाचा खर्च (उदाहरणार्थ - वेशभूषा, प्रकाशयोजना, रंगमंच, साथीदार इत्यादी), कला प्रकाराचा इतिहास, त्या विशिष्ट कला प्रकारातील दिग्गज, उपलब्ध लिखित साहित्य, तुलनात्मक अभ्यासाच्या संधी यांचीही माहिती घेण्यात आली. 'आयलँड इन्फर्मेटिक्स' आणि 'बांग्लानाटक डॉट कॉम'तर्फे सर्वेक्षणाचे काम करण्यात आले.

ग्रामीण भागातील कलाकारांचे शहरांकडे स्थलांतर होत आहे. ललित कलाकार बहुतांश शहरी भागातील मध्यमवर्गीय स्तरातील आहेत. त्यांचे कलाविषयक शिक्षण समाधानकारक आहे. कला सादरीकरणाची संधीही त्यांना मिळते, असेही लक्षात आले.

*** साहित्यकृतींवरील चित्रपटांचे नवे 'पर्व'**

अभिजात मराठी साहित्यकृतींवर आधारित चित्रपटांची निर्मिती हे उद्दिष्ट ठेवून स्थापन करण्यात अलेल्या 'पर्व क्रिएशन्स' या निर्मिती संस्थेचे औपचारिक उद्‌घाटन ज्येष्ठ दिग्दर्शक राजदत्त यांच्या हस्ते झाले. या वेळी या चित्रपटातले प्रमुख कलावंत ज्येष्ठ अभिनेते सतीश पुळेकर, लालन सारंग आणि ज्येष्ठ नृत्य दिग्दर्शक सुबल सरकार, स्वाती चांदोरकर, सुहास काळे उपस्थित होते.

''केवळ साहित्यकृतींवर आधारित चित्रपटनिर्मिती करण्याचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून नव्या पिढीतल्या तरुणांनी एखादी निर्मिती संस्था स्थापन करणे ही बाब कौतुकास्पद असून, मराठी चित्रपट क्षेत्रात 'पर्व क्रिएशन्स' निश्चितच एक ठसा उमटवेल,'' असा विश्वास या वेळी दिग्दर्शक राजदत्त यांनी व्यक्त केला.

मराठीतले जवळपास सर्वच यशस्वी चित्रपट साहित्यकृतींवर आधारित आहेत आणि याच गोष्टींचे विस्मरण अलीकडच्या काळात होत होते म्हणून पुन्हा एकदा साहित्याकडे वळण्याचा ठोस प्रयत्न करण्यासाठी 'पर्व क्रिएशन्स' या निर्मिती संस्थेची स्थापना केल्याचे समीर सुर्वे यांनी सांगितले.

याच समारंभात 'पर्व क्रिएशन्स'ची निर्मिती असलेल्या समीर सुर्वे दिग्दर्शित 'श्री पार्टनर' या चित्रपटाचा मुहूर्त झाला. व. पु. काळे यांच्या 'पार्टनर' कादंबरीवर हा चित्रपट आधारित असून 'पार्टनर'च्या मुख्य भूमिकेत सतीश पुळेकर तर मध्यवर्ती भूमिकेत लालन सारंग आहेत. प्रायोगिक रंगभूमीवरचा चतुरस्र अभिनेता पद्मनाभ बिंड

नायकाच्या भूमिकेत दिसेल. पुण्याची श्वेता पगार ही नवोदित अभिनेत्री या चित्रपटाद्वारे नायिका म्हणून पदार्पण करीत आहे.

या चित्रपटातल्या सहकलाकारांची निवड मुंबई आणि पुण्यात निवड चाचणी घेऊन करण्यात आली. ७५० कलावंतांतून १६ जणांची निवड करण्यात आली. या चित्रपटात दीपक कदम, आकांक्षा मेहेंदळे, आनंद पानसे, दिनेश कानडे, राहुल कुलकर्णी, सिद्धार्थ बेंद्रे, अंजली गोडबोले, आरती पाटील, राधिका सुवर्ण पत्की, मंदार पाठक, आनंद बापट, कुशल कोळी, डॉ. संजीवकुमार पाटील, विद्याधर परांजपे, संजय देशपांडे हे सहकलावंत आहेत.

या चित्रपटाचे छायाचित्रण राजा फडतरे करणार असून, कलादिग्दर्शन दत्ता लोंढे यांचे आहे. संगीतकार निलेश मोहरीर यांनी संगीत दिले आहे. गीते अश्विनी शेंडे यांनी लिहिली आहेत. बेला शेंडे, मधुश्री आणि स्वप्निल बांदोडकर यांनी या गीतांना स्वर दिला असून, पार्श्वसंगीताची जबाबदारी नीलेश डहाणूकर सांभाळणार आहेत. नृत्य-दिग्दर्शन दिपाली विचारे यांचे असून, संकलक योगेश गोगटे आहेत. ध्वनी - राशी बुट्टे, वेशभूषा - बाळकृष्ण जावकर, रंगभूषा - दिनेश नाईक सांभाळतील. कीर्तीकुमार नाईक आणि आशिष काळे कार्यकारी निर्माते आहेत. गंधर्व पेडणेकर, अजित म्हसकर, समीर सुर्वे या चित्रपटाचे निर्माते आहेत. हा चित्रपट सप्टेंबर महिन्यात प्रदर्शित करण्याचा मानस आहे.

*** पुणे मराठी ग्रंथालयात मातृभाषा दिन**

मराठी भाषा टिकली पाहिजे, त्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची वेळ का येते, असा प्रश्न शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांनी पुणे मराठी ग्रंथालयातर्फे मातृभाषा दिनानिमित्त आयोजित व्याख्यानात विचारला. पत्रकार राजू परुळेकर, ग्रंथालयाचे अध्यक्ष मोहन दाते, कार्याध्यक्ष मुकुंद अनगळ व कार्यवाह प्रा. चारुदत्त निमकर या वेळी उपस्थित होते. पुरंदरे म्हणाले, ''महाराष्ट्राची संतांची थोर परंपरा आहे. संतांनीच भाषेची मशागत केली, ती वाढविली व टिकवली. सध्या मराठी भाषेविषयी खूप बोलले जात आहे. मात्र, भाषा वाढविणे किंवा मारणे अंतिमतः मराठी माणसाच्याच हाती आहे.''

परुळेकर म्हणाले, ''मातृभाषेचा आग्रह म्हणजे इतर भाषांचा द्वेष नाही. मुळात इतर भाषांचा द्वेष करून कोणतीही भाषा मोठी होऊ शकत नाही. आपली भाषा अधिक समृद्ध होण्यासाठी सर्व पातळ्यांवर योग्य प्रयत्न होणे आवश्यक आहे. मातृभाषेतून शिक्षण हा प्रश्न केवळ भाषेपुरता मर्यादित राहत नाही. भाषेच्या माध्यमातून मातृसंस्कृती, परंपरा पुढे येत असतात. त्यातूनच व्यक्तिमत्त्वाचा खरा विकास होत असतो.''

### * विद्यार्थ्यांनी पंचसूत्री आत्मसात करावी

''अभ्यासाची गोडी वाढविण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने आत्मविश्वास, ध्येय, प्रयत्न, एकाग्रता आणि परिश्रम ही पंचसूत्री आत्मसात केली पाहिजे. तसे झाल्यास परीक्षेची अवाजवी भीती दूर होईल,'' असे मत प्राचार्य मधुकर एरंडे यांनी 'काय तुझ्या मनात' या विशेष कार्यशाळेत व्यक्त केले.

खेड तालुक्यातील इंदिराजी माध्यमिक विद्यालयात झालेल्या या कार्यशाळेत आठवी ते दहावीतील सुमारे दोनशे विद्यार्थी सहभागी झाले होते. एरंडे म्हणाले, ''विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच कलासंपन्न जीवन जगले पाहिजे. त्यासाठी परिश्रम घेण्याची तयारी ठेवली पाहिजे. दूरचित्रवाणी बघण्याचा अतिरेक टाळून वाचन व लेखन कौशल्य वाढवायला हवे. नियमित व्यायाम आणि संतुलित आहाराकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. पालक आणि विद्यार्थ्यांमधील सुसंवाद वाढला पाहिजे.''

### * साहित्य महामंडळाचे मुख्य कार्यालय पुढील तीन वर्षे मुंबईत

अखिल भारतीय साहित्य महामंडळाचे मुख्य कार्यालय एप्रिल महिन्यापासून महामंडळाच्या मुंबई मराठी साहित्य संघ या घटक संस्थेकडे आले आहे. साहित्य संघाकडे पुढील तीन वर्षांसाठी हे कार्यालय असेल. महामंडळाच्या घटनेनुसार मुख्य कार्यालय एकाच ठिकाणी न ठेवता ते महामंडळाच्या पुणे, मुंबई, नागपूर आणि औरंगाबाद या घटकसंस्थांकडे फिरते ठेवण्यात येते. मुंबई मराठी साहित्य संघाकडे मुख्य कार्यालयाची जबाबदारी आल्यानंतर अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाध्यक्ष पदाच्या निवडणुकीत काही बदल करण्यासाठी साहित्य संघ प्रयत्न करणार आहे.

औरंगाबाद येथील मराठवाडा साहित्य परिषद, नागपूर येथील विदर्भ साहित्य संघ, पुणे येथील महाराष्ट्र साहित्य परिषद, मुंबई येथील मुंबई साहित्य संघ या चार संस्थांनी एकत्र येऊन १९६१ मध्ये अखिल भारतीय साहित्य महामंडळ ही शिखर संस्था स्थापन केली. कालांतराने साहित्य महामंडळात घटक संस्थांबरोबरच काही संलग्न आणि समाविष्ट संस्थांचाही समावेश करण्यात आला. २००७ पासून साहित्य महामंडळाचे मुख्य कार्यालय औरंगाबाद येथे होते.

साहित्य संमेलनाध्यक्षपद आणि त्यासाठी होणाऱ्या निवडणुकीवरून दरवर्षी काही ना काही वाद होतात. ज्येष्ठ आणि वयोवृद्ध साहित्यिकांना संमेलनाध्यक्षाचा सन्मान मिळालेला नाही, संमेलनाध्यक्षपदासाठी निवडणूक न घेता ज्येष्ठ साहित्यिकाची बिनविरोध निवड व्हावी अशीही चर्चा सुरू असते. त्या पार्श्वभूमीवर मुंबई मराठी साहित्य संघाकडे मुख्य कार्यालयाची जबाबदारी आल्यानंतर अध्यक्षांची निवड बिनविरोधी व्हावी तसेच होणारा अध्यक्ष घटक, संलग्न किंवा समाविष्ट संस्थांचा

सभासद असलाच पाहिजे ही अट शिथिल करण्यासाठी साहित्य संघ अग्रक्रम देणार असल्याची माहिती संघाच्या सूत्रांकडून देण्यात आली. तसेच विश्व मराठी साहित्य संमेलन आयोजित करण्यासाठी महामंडळाच्या घटनेत बदल करण्यात येईल असे सांगण्यात आले.

*** ज्ञानेश्वरी यादवकालीन नव्हे तर समकालीन ग्रंथ**

''तेराव्या शतकातील ज्ञानेश्वरी हा केवळ यादवकालीन नव्हे तर समकालीन ग्रंथ आहे,'' असे मत साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

'सिग्नेट पब्लिकेशन्स'तर्फे सुमन देवलिखित 'आपण सारे पार्थ' या ज्ञानेश्वरीवरील निरूपण ग्रंथाचे प्रकाशन डॉ. कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. लोकसाहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे, प्रा. अविनाश आवलगावकर, देव यांची कन्या अंजली महागावकर आणि प्रकाशक प्रमोद आडकर या वेळी उपस्थित होते.

कुलकर्णी म्हणाले, ''ज्ञानेश्वरी हा ज्ञान, कर्म आणि भक्तियोगाचा प्रात्यक्षिक आविष्कार आहे. ज्ञानेश्वरीतून अद्वैत तत्त्वज्ञान सांगितले असेल तर श्रीकृष्ण-पार्थ, गीता-ज्ञानेश्वरी, गुरू-शिष्य आणि वक्ता-श्रोता हे द्वैत का मांडले आहे? अमृतानुभवाचे प्रत्यंतर देणारी ज्ञानेश्वरी हे शिव-शक्तीचे स्वरूप असल्याने द्वैतातून अद्वैताकडे जाण्याची प्रक्रिया आपल्याला कळते. यवनी, इंग्रजांच्या आक्रमणानंतरही मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृती नष्ट होऊ शकली नाही, त्यामुळे आता ती जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत नाहीशी होईल ही भीती व्यर्थ आहे.''

देखणे म्हणाले, ''साहित्यातील सगळे दृष्टांत ज्ञानेश्वरीत सामावले आहेत. भगवद्‌गीता हे ज्ञानदर्शन असले तरी ज्ञानेश्वरी हे भावदर्शन आहे. 'आपण सारे पार्थ' हे निरुपणाच्या अंगाने ओवलेले पुस्तक आहे.''

आवलगावकर म्हणाले, ''मराठीमध्ये टीकाग्रंथाची परंपरा ज्ञानेश्वरीपासून आलेली आहे. 'एक तरी ओवी अनुभवावी' या जाणिवेतून ज्ञानेश्वरीवर आणखी टीकाग्रंथ निर्माण होतील. संतसाहित्याकडे निखळ जीवनविषयक तत्त्वज्ञान म्हणून पाहावे लागेल.''

*** 'अन्वेषण' जीवनाच्या पैलूशी निगडित**

''अन्वेषण' ही संकल्पना केवळ वैज्ञानिक शोधापुरती मर्यादित न ठेवता, ती जीवनाच्या प्रत्येक पैलूशी निगडित आहे, याची जाणीव असणे आवश्यक आहे.'' असे प्रतिपादन डॉ. विजय भटकर यांनी केले.

'विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट'तर्फे आयोजित केलेल्या 'अन्वेषणाद्वारे क्षितिजाच्या पार' या राष्ट्रीय परिषदेचे उद्‌घाटन डॉ. विजय भटकर यांच्या हस्ते झाले.

डॉ. भटकर म्हणाले, ''अन्वेषण ही केवळ संस्थांची गरज आहे असे नसून, आज भारतालाच नव्हे, तर साऱ्या जगाला त्याची गरज आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये 'अन्वेषणा'कडे आर्थिक वृद्धी आणि भरभराटीच्या दृष्टिकोनातून पाहिले पाहिजे.''

### * 'गूगल'चं सोशल नेटवर्किंग

इंटरनेटवरील निरनिराळ्या सोशल नेटवर्किंग साईट्स म्हणजे तरुणाईचा जीव की प्राण झाला आहे. या साईट्सच्या माध्यमातून आपला मित्रपरिवार वाढविण्यावर तरुणाई भर देत आहे.

आर्कुटनंतर सध्या ट्विटर आणि फेसबुक या सोशल नेटवर्किंग साईट्सना तरुणाईची अधिक पसंती मिळत आहे. या साईट्सना मिळणारी लोकप्रियता लक्षात घेऊन आता गूगलचीही 'गूगल बझ' ही नवी सोशल नेटवर्किंग साइट सुरू होत आहे.

मीडियातून समोर येणाऱ्या ताज्या घडामोडी, त्यावरील प्रतिक्रिया, आपली मतं सहजपणे इतरांपर्यंत पोचावीत या उद्देशानं हे नेटवर्क सुरू करण्यात येत आहे. 'जी मेल' सुरू केल्यावर त्यातील स्क्रीनवरच नवे अपडेट्स करण्याची फेसबुक आणि ट्विटरची कल्पना गूगलही उचलणार आहे.

गूगलच्या नव्या फिचरमध्ये यू ट्यूब आणि पिकासा फोटो सर्व्हिस यांचाही समावेश असणार आहे.

सध्या ४० कोटी लोक फेसबुकचा, तर १७ कोटी लोक जीमेलचा वापर करत आहेत.

### * इतिहास संशोधन संस्थांनी एकत्रित अडचणी मांडाव्यात

इतिहास संशोधन संस्थांनी एकत्र येऊन आपल्या अडचणी शासनापुढे मांडून आर्थिक साहाय्य व इतर प्रकारची मदत मिळविण्याचा प्रयत्न करावा, असे मत भारत इतिहास संशोधक मंडळातर्फे आयोजित 'मराठ्यांच्या इतिहासातील कूटस्थळे' या विषयावरील परिषदेत व्यक्त झाले.

या परिषदेत डॉ. चित्तरंजन दास यांनी 'ओरिसातील मराठी राजवट', तर डॉ. चंद्रकांत अभंग यांनी 'राजस्थानावरील मराठी राज्यांचे वर्चस्व' या विषयावरील निबंधांचे वाचन केले, तसेच डॉ. सुमित्रा कुलकर्णी यांनी '१८व्या शतकावर वादंग' आणि डॉ. श्री. मा. भावे यांनी '१८ व्या शतकातील महाराष्ट्रामधील लोकजीवन' या विषयावरील निबंधाचे वाचन केले.

राजवाडे संशोधन मंडळ धुळे, विदर्भ संशोधन मंडळ नागपूर, मोडी परिषद ठाणे, इतिहास परिषद कल्याण, विदर्भ साहित्य संघ, भांडारकर प्राच्यविद्या, पुणे

विद्यापीठ इतिहास विभाग या संस्थांच्या प्रतिनिधींनी, तसेच अनेक संशोधक, विद्यार्थी व शिक्षकांनी सहभाग घेतला.

### * 'पालकांचे चुकते कुठे?' पुस्तक प्रकाशित

वंदन नगरकर यांनी लिहिलेल्या 'पालकांचे चुकते कुठे?' या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ समाजसेविका रेणू गावस्कर यांच्या हस्ते झाले. साने गुरुजी आरोग्य मंदिराचे अध्यक्ष शाहीर लीलाधर हेगडे, इंद्रायणी साहित्य प्रकाशनचे श्याम कोपर्डेकर आदी यावेळी उपस्थित होते. पालकांची अपेक्षा पूर्ण करण्यात आपण अयशस्वी ठरू या दडपणामुळेच बहुतेक विद्यार्थी नैराश्याने ग्रासले जातात आणि आत्महत्येचा मार्ग पत्करतात, असे निरीक्षण नोंदवून गावस्कर म्हणाल्या की, मुलांच्या मनातील नकारात्मक भावनिक वादळाची वेळीच नोंद घेऊन त्यांना मानसिक आधार देण्यासाठी पालक आणि पाल्य यांच्यामध्ये सातत्याने सुसंवाद असणे आवश्यक आहे. केवळ चाकोरीबद्ध अभ्यासक्रम आणि रूळलेल्या वाटेवरील व्यावसायिक कारकीर्दीपुरता संकुचित विचार न करता पालकांनी तसेच त्यांना शिक्षण देणाऱ्या शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव द्यावा, असे शाहीर लीलाधर हेगडे यांनी सांगितले. प्रकाश पायगुडे यांनी सूत्रसंचालन केले. श्याम कोपर्डेकर यांनी आभार मानले.

### * जैवविविधता उद्यान

''पुण्याच्या विकास आराखड्यातील जैवविविधता उद्यानांबाबत (बायोडायव्हर्सिटी पार्क) सरकारने घेतलेले आक्षेप चुकीचे आहेत. हे प्रकल्प अस्तित्वात आले तरच पुण्यातील पर्यावरणाचा समतोल राखता येणार आहे. त्यामुळे पुणेकरांनी एकत्र येऊन हा प्रश्न मार्गी लावला पाहिजे,'' असे मत बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटीचे अध्यक्ष बी. जी. देशमुख यांनी व्यक्त केले.

देशमुख म्हणाले, ''पूर्वी पुण्याची 'नो फॅन सिटी' अशी ओळख होती, पण आता वातानुकूलित यंत्रणेशिवाय राहणे अशक्य वटते. शहरातील टेकड्यांमुळे पूर्वी येथील पर्यावरणाचा समतोल राखला जात होता, पण आता डोंगर बोडके झाले आहेत. जैवविविधतेचे संवर्धन झाले तरच पुन्हा एकदा पहिले दिवस अनुभवायला मिळतील. त्यामुळे सरकारने या उद्यानांसाठी महापालिकेकडे पैसा आहे का, असा प्रश्न विचारण्याऐवजी स्वत: मदत करावी. गरज पडल्यास केंद्र सरकारकडून जवाहरलाल नेहरू योजनेअंतर्गत निधी मिळण्यासाठी मी प्रयत्न करीन.''

'किर्लोस्कर समूहा'चे राहुल किर्लोस्कर, बीबीसीचे प्रतिनिधी पॉल रोझ, महापालिकेच्या स्थायी समितीने अध्यक्ष नीलेश निकम, 'गिरीकंद ट्रॅव्हल'च्या शुभदा जोशी, ब्रिटिश

लायब्ररीच्या व्यवस्थापक कजरी मित्रा, 'पार्थफाइंडर'च्या नीलिमा खरे, महोत्सवाचे अध्यक्ष विजय वर्मा, संयोजक वीरेंद्र चित्राव, अनुज खरे, 'नीती सोल्यूशन'चे पराग माणकीकर उपस्थित होते.

'वसुंधरामित्र' पुरस्कार निसर्गअभ्यासक किरण पुरंदरे, चित्रपट दिग्दर्शक शेखर दत्तात्री आणि बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटीचे अध्यक्ष बी. जी. देशमुख यांना किर्लोस्कर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

या वेळी पुरंदरे म्हणाले, ''मला निसर्गाकडून निखळ आनंद मिळाला; गुरूसमान असलेल्या निसर्गाला मी हा पुरस्कार अर्पण करणार आहे. निसर्गसंरक्षणाची वाट काट्याने व्यापलेली असली तरीही आपल्याला या वाटेने जायचे आहे. निसर्गात राहून त्याचे संरक्षण करण्याची गरज असून, याला शास्त्रोक्त अभ्यासाची जोड असली पाहिजे. या कार्यासाठी सर्वांनी एकत्र यावे.''

सरकार, उद्योग क्षेत्राबरोबरच प्रत्येक नागरिकाने पर्यावरणरक्षणाची जबाबदारी उचलावी, असे आवाहन किर्लोस्कर यांनी केले. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात रोझ यांनी 'जागतिक तापमानवाढ' या विषयावर मार्गदर्शन केले. यानंतर दत्तात्री यांनी दिग्दर्शित केलेला 'द टूथ अबाऊट द टायगर' हा चित्रपट दाखविण्यात आला.

''जागतिक तापमानवाढ, वातावरणातील बदल याबाबत संशोधन सुरू आहे. मात्र, अद्याप याला जागतिक पातळीवरील नेतृत्व मिळालेले नाही. पुढील तीन दशकांमध्ये या संदर्भात प्रचंड काम होणार असून अमेरिका, युरोप नव्हे; तर सर्वाधिक तरुणवर्ग असलेले देश याचे नेतृत्व करतील. मला विश्वास वाटतो की भारताचा यात नक्कीच समावेश असेल,'' असे मत बीबीसीचे प्रतिनिधी पॉल रोझ यांनी व्यक्त केले.

### * राजवाडी होळी अन् साहित्य संमेलन

'काट्या कुट्यांचा तुडवीत रस्ता, माझ्या गावाकडे चल माझ्या दोस्ता' ग्रामीण साहित्यिक प्रा. इंद्रजित भालेराव यांच्या या काव्यात्मक हाकेने सातपुड्याच्या दऱ्याखोऱ्यातील लोक सुखावले.

शहाद्यात नंदुरबार जिल्ह्याचे द्वितीय साहित्य संमेलन उत्साहात पार पडले. काठी संस्थानच्या लोकप्रिय राजवाडी होळी प्रसंगी आदिवासींच्या सांस्कृतिक परंपरेचे दर्शन झाले. साहित्य संमेलनाचे उद्घाटक प्रा. इंद्रजित भालेराव यांनी ग्रामीण समाजाचे वास्तव चित्र आपल्या कवितेतून उलगडून दाखविले. पंचतत्त्व ही ईश्वराची रूपे असून यापासून जो दूर गेला तो गोरा झाला आणि त्याच्याजवळ तो गेला तो काळा झाला असे सांगून त्यांनी काळ्या मातीचे महत्त्व विशद केले. मुख्यमंत्रीपदाची कारकीर्द उपभोगलेल्यांच्या क्रमवारीत नंबर दोनवर असलेल्या विलासरावांच्या मराठवाड्यातच पहिली शेतकरी आत्महत्या झाल्याचे नमूद करतानाच आता विदर्भापाठोपाठ

मराठवाड्यातही त्या वाढत चालल्याने 'शिक बाबा शिक, लढायला शिक, कुणब्याच्या पोरा आता लढायला शिक' असा संदेश भालेरावांनी दिला. संमेलनास अध्यक्ष म्हणून आदिवासी कवी वाहरू सोनवणे उपस्थित होते. नंदुरबार जिल्हा साहित्य अकादमीचे राजेंद्र गावीत यांनी संमेलनाचे यशस्वी आयोजन केले.

बदलत्या समाज व्यवस्थेत कृषी क्षेत्राचे महत्त्व आणि स्त्री शक्तीचे महत्त्व अशा दोन परिसंवादांमुळे एकूणच साहित्य संमेलनात शेतकऱ्यांच्या आणि महिलांच्या प्रश्नांना प्राधान्य मिळाले. नंदुरबार जिल्हा हा लोककला, लोकपरंपरा या संदर्भात संपन्न आहे. 'होळी' हा सण तर आदिवासी जीवनाचे आणि त्यांच्या लोकपरंपरेचे महत्त्वपूर्ण प्रतीक आहे. होलिकोत्सवामुळे आदिवासी जीवन चैतन्यमय होते.

काठी संस्थानच्या होलिकोत्सवाची परंपरा १२व्या शतकापासून सुरू आहे. या संस्थानला उमेदसिंग सरकारही मानले जाते. सातपुड्याच्या पर्वत रांगेत या होळीला 'राजवाडी' होळी म्हणून संबोधिले जाते. रात्रभर बेधुंदपणे ठिकठिकाणच्या पाड्यातील पथके मोरख्या, बुध्या, बावा आणि डाकिणी समवेत ढोलच्या थापेवर लयबद्धरीत्या पारंपरिक नृत्ये सादर करीत होती. आदिवासी विकास राज्यमंत्री ॲड. पद्माकर वळवी, खा. माणिकराव गावीत, माजी आमदार चंद्रकांत रघुवंशी, सी. के. पाडवी, कवी वाहरू सोनवणे आदींनीही भारावलेल्या वातावरणात नृत्याचा आनंद लुटला.

### * कथा 'दमलेल्या बाबाची'

संदीप खरे आणि सलील कुलकर्णी यांच्या 'दमलेल्या बाबा' या गीताला जनमानसात स्थान मिळत आहे. कार्यक्रमाच्या निमित्ताने बऱ्याच वेळा हे कवी पहाटे घरी येतात. त्यावेळी मुलं झोपलेली असतात. कवी सकाळी उठतात, तेव्हा मुलं शाळेत गेलेली असतात. कितीतरी वेळा मुलांशी बोलणचं होत नाही. अशा वेळी मनात येणारे विचार कागदावर उतरवले गेले. एक कवी आणि एक संगीतकार अशा दोन बाबांच्या अनुभवातून या गाण्याचा जन्म झाला आहे.

'आयुष्यावर बोलू काही'च्या पाचशेव्या प्रयोगात ही कविता पहिल्यांदा सादर झाली. प्रेक्षकांची दाद मिळाली. 'दमलेल्या बाबाची कहाणी' या गाण्याला पत्र, फोन आणि प्रत्यक्ष भेटून लोकांनी उदंड प्रतिक्रिया दिल्या.

### * स्वातंत्र्यवीर सावरकरांची पुण्यतिथी

महाराष्ट्र मंडळ अंदमानतर्फे स्वातंत्र्यवीर सावरकर यांची पुण्यतिथी अंदमान येथे साजरी करण्यात आली. मंडळाच्या कार्यालयापासून सेक्युलर जेलपर्यंत सकाळी रॅली आयोजित करण्यात आली होती. यात सातशेहून अधिक सावरकरप्रेमी सहभागी झाले. मंडळाचे सचिव अरविंद पाटील यांच्या हस्ते सावरकरांच्या प्रतिमेस पुष्पहार

अर्पण करण्यात आला.यानंतर सावरकर पार्कमध्ये डॉ. रशिदा इक्बाल यांनी सावरकर यांच्यावर व्याख्यान दिले. सायंकाळी झालेल्या कार्यक्रमात डॉ. सच्चिदानंद शेवडे यांचे व्याख्यान झाले. 'स्वतंत्रता सेनानी वंशज'च्या अंदमान निकोबार शाखेचे अध्यक्ष मदन मोहन सिंग, जयेशचंद्र लाल, महाराष्ट्र पर्यटन महामंडळाचे मुंबई येथील अध्यक्ष अतुल मोहिले, अनंतराव सकपाळ उपस्थित होते. शरद मोडक यांनी मंडळाला श्री संत ज्ञानेश्वर महाराजांची प्रतिमा भेट दिली.

*** इंटरनेट हा मूलभूत हक्क**

इंटरनेट हा मूलभूत हक्क असल्याचे जगातील पाच नागरिकांपैकी चौघांचे मत आहे, असे एका जागतिक पाहणीत आढळून आले आहे. बीबीसी वर्ल्ड सर्व्हिससाठी २६ देशांत पाहणी करून २७ हजार नागरिकांची मते जाणून घेण्यात आली.

या पाहणीनुसार, तब्बल ७८ टक्के नागरिक म्हणतात, की इंटरनेटमुळे प्रत्येकाला अधिक स्वातंत्र्य मिळाले आहे, तर इंटरनेट हे ज्ञान मिळवण्यासाठीचे उत्तम स्थान असल्याचे दहापैकी नऊ नागरिक मानतात. इंटरनेटमुळे अधिक स्वातंत्र्य मिळाल्याची भावना अमेरिकी लोकांमध्ये जास्त आहे. तसेच ऑनलाइन मते नोंदविण्यावरही या नागरिकांचा अधिक विश्वास आहे.

जपानमधील लोकांची प्रतिक्रिया मात्र काहीशी वेगळी आहे. त्यांच्या मते, ऑनलाइन प्रतिक्रिया नोंदविणे सुरक्षित नाही. दक्षिण कोरिया, फ्रान्स, जर्मनी आणि चीन मधील नागरिकांचेही थोड्याफार फरकाने असेच मत आहे.

इंटरनेटवर कोणत्याही देशातील सरकारचे नियंत्रण नसावे, असे दक्षिण कोरिया, नायजेरिया, मेक्सिको आणि पाकिस्तान मधील बहुतांश नागरिकांचे मत आहे, तर तुर्कस्थान आणि चीनमधील नागरिक या मताशी अंशत: सहमत आहेत. 'इंटरनेट शिवाय जगणे अशक्य आहे,' असे मत जपान, मेक्सिको आणि रशियातील काही लोकांनी व्यक्त केले आहे. ५० टक्के लोकांना इंटरनेट हे माहिती मिळवण्याचे उत्तम साधन वाटते, तर ३० टक्के लोकांच्या मते इंटरनेट हे संपर्क आणि संवादाचे चांगले माध्यम आहे.

*** दुसरे विश्व साहित्य संमेलन**

साहित्य संमेलनाची १३२ वर्षांची परंपरा आहे. ती परंपरा पाळताना काही पथ्ये, रूढी, आचारसंहिता याची काळजी घ्यावी लागते. ती घेताना कुणाचा अनादर करण्याचा हेतू नव्हता; मात्र त्यातून काही गैरसमज निर्माण झाले, असे स्पष्टीकरण महामंडळाचे अध्यक्ष कौतिकराव ठाले-पाटील यांनी समारोपाच्या वेळी केले. या संमेलनामध्ये काही वाद-विवाद झाले असले, तरी तिसरे विश्व मराठी साहित्य

संमेलन होणारच, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. संमेलनाध्यक्ष मंगेश पाडगावकर म्हणाले, ''दुबई सोडताना मला गहिवरून आले आहे. माहेरवाशीण माहेर सोडताना तिच्या डोळ्यातील अश्रू सर्व काही सांगत असतात. तीच माझी आज भावना आहे.''

प्रसारमाध्यमांकडून झालेल्या टीकेमुळे व्यथित कौतिकराव ठाले पाटील यांची अस्वस्थता त्यांच्या भाषणातून दिसून आली. ते म्हणाले ''इतके मोठे काम करताना काही लोक खुसपट काढत असतात. कारण, खुसपट काढणाऱ्यांना काहीही काम नसते. वृत्तवाहिन्यांनी काही टिकेच्या पट्ट्या (टिकर) चालविल्या. त्यामुळे अकारण समज-गैरसमज निर्माण झाले.

तरीही दुबईतील मराठी माणसांनी भरभरून प्रतिसाद देत हे संमेलन यशस्वी केले. महाराष्ट्र मंडळाच्या दुबई शाखेच्या संजीवनी पाटील यांनी 'संमेलनाची वारी संपली वाळवंटाच्या दारी' म्हणत कृतज्ञता व्यक्त केली. भाऊ मराठे यांनी या सोहळ्याचे सूत्रसंचालन केले.

*** महिला लघुपट महोत्सव**

''बाजारकेंद्री संदेश देण्यापेक्षा प्रसारमाध्यमांनी जाणीवपूर्वक जीवनाकडे सकारात्मक रीतीने बघण्याचा संदेश द्यावा. घरोघरी नळाप्रमाणे गळणाऱ्या वाहिन्यांमधून तरुणांना 'जगण्यासारखे काही नाही' असा संदेश मिळत आहे.'' असे भाष्य ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शिका सुमित्रा भावे यांनी केले.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने 'आयाम' हा महिला पत्रकारांचा गट, राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय व आशय फिल्म क्लब यांच्या वतीने लघुपट महोत्सव घेण्यात आला.

भावे म्हणाल्या, 'महिला पत्रकारांचा लोकशाही घडवण्यात मोठा सहभाग असायला हवा. दृक-श्राव्य माध्यमांतून हिंसाचाराचे प्रदर्शन नको असेल तर महिलांनी लेखन व दिग्दर्शनाच्या माध्यमातून तिसरा डोळा द्यायला हवा. पुरुषी जगात त्यांच्या पद्धतीने पटकन मोठे होण्याचा मोह टाळून, आक्रमक न होता निर्भयतेने व्यक्त व्हायला हवे.''

'आयाम' हा अनौपचारिक गट गेल्या दोन-तीन वर्षांपासून निरनिराळे कार्यक्रम करीत असल्याची माहिती प्रभुणे यांनी दिली. ''मराठी व जागतिक चित्रपटांमध्ये स्त्रीला मध्यवर्ती ठेवून तिच्या भावविश्वातील चढ-उतार दर्शवणाऱ्या चित्रपटांची संख्या वाढते आहे,'' असे चित्राव म्हणाले. या कार्यक्रमात महिला अभिनेत्रींचे योगदान दर्शवणारे व स्त्री दिग्दर्शकांनी तयार केलेले चित्रपट दाखविण्यावर भर दिला गेला. पहिल्या दिवशी कमलाबाई गोखले, फिअरलेस नादिया (हंटरवाली) व नर्गीस यांच्यावरील माहितीपटांचा रसिकांनी आस्वाद घेतला.

### * वाढदिवसाची पार्टी नको, पुस्तकं द्या!

'वाढदिवसाची पाटी नको, पार्टीच्या बदल्यात पुस्तकं द्या' असे सांगत नाशिक येथील विनायक रानडे यांनी कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या वाचनालयासाठी पुस्तक गोळा करायला सुरुवात केली. मित्रांकडून वाढदिवसाच्या पार्टीचे आमंत्रण नाकारत त्या पैशातून पुस्तके विकत घेण्याची कल्पना त्यांनी राबवली. यातूनच सध्याचे कुसुमाग्रज प्रतिष्ठानमधले वाचनालय उभे राहिले आहे.

दहा लाखांच्या देणगीतून ग्रंथालय उभे राहिले होते आणि आता गरज होती हजारो पुस्तकांनी ग्रंथालय भरून टाकण्याची. ही गरज ओळखून बर्थ डे पार्टीच्या रूपात पुस्तक गोळा करण्याची कल्पना त्यांनी राबवली.

आजमितीला प्रतिष्ठानच्या वाचनालयात सुमारे बावीस लाख रुपयांची पुस्तके आहेत. कोणतीही सरकारी मदत नसताना लोकांच्या सहभागातून हे वाचनालय उभे राहिले आहे. लोकांपर्यंत पुस्तके पोहोचण्यासाठी 'ग्रंथ तुमच्या दारी' ही योजना आखली. या योजनेसाठी देणगीदाराने पंधरा हजार रुपयांचा धनादेश प्रतिष्ठानच्या नावे काढायचा, या रकमेच्या पुस्तकांची खरेदी करून त्या प्रत्येक पुस्तकावर देणगीदाराच्या कुटुंबातील दिवगंत व्यक्तींची नावे कोरली जातात. पितरांच्या आठवणीदाखल पुस्तके या योजनेद्वारे तीन हजार पुस्तकं जमा झाली. शंभर पुस्तकांची एक पेटी अशा सुमारे तीस पेट्या तयार झाल्या असून फिरत्या चषकासारख्या वेगवेगळ्या मंडळांमधून फिरत आहेत. एका पेटीतील पुस्तके वाचून झाली की दुसरी, असे वाचनाचे आवर्तन नाशिकमध्ये सुरू आहे.

### * कवी ग्रेस यांचे मुक्तचिंतन

''मूळ निर्मितीत परमेश्वराने जी दुर्बोधता ठेवली आहे, तिला सुबोध करण्याचे काम कलावंत आपल्या पुनर्निर्मितीतून करीत असतो. अनुभवाने पुनर्निर्मित होणारी कला पूर्णत्वाकडे जाणारी असते. म्हणूनच कलावंताला चुका करण्याचा अधिकार नाही,'' असे मत ज्येष्ठ कवी ग्रेस यांनी व्यक्त केले.

दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातर्फे 'दीनायन कलापर्व' उपक्रमांतर्गत 'देवाच्या गाण्याने दळणाला मोल चढे' या कार्यक्रमाच्या माध्यमातून ग्रेस आणि ज्येष्ठ संगीतकार गायक पं. हृदयनाथ मंगेशकर यांची शब्दसुरांची मैफल रंगली.

सुरवातीला राधा मंगेशकर यांनी 'आयेगा आनेवाला', 'लग जा गले के फिर ये हसी रात हो ना हो' आणि 'कुछ दिलने कहा' ही गीते सादर केली. रसिकांच्या आग्रहास्तव पं. मंगेशकर यांनी गायलेल्या 'भय इथले संपत नाही'या ग्रेस यांच्या गीतानंतर पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

*सागर तंद्रीतून नसावे कुठे चुळभर पाणी*
*तुझ्या कृपेच्या दु:खामागे येईन मी अनवाणी*

या काव्यपंक्ती सादर करून गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्याविषयी भाष्य करताना ग्रेस म्हणाले, ''मदन मोहन पासून ते सलील चौधरीपर्यंतच्या प्रतिभावंतींनी लताजी नावाचं 'कोडं' आपल्या कुवतीनुसाार सोडविण्याचा प्रयत्न केला. पण त्यांनी स्वरबद्ध केलेली एखादी बंदिश लताजींच्या गळ्यातून उतरते तेव्हा प्रश्न पडतो ही किमया गळ्याची की गाण्याची? प्रश्न माधुर्याचा किंवा गोडव्याचा नाही. लताजींचं समग्र शरीरच गात असतं. आदिम प्रेरणांच्या प्रतिभेचे हे गाणे आहे. दूरचित्रवाणी वाहिन्यांवरील कार्यक्रमातील गाणाऱ्यांशी या गाण्याची तुलना करू नका. चर्चा करायचीच तर ती 'रेंज'ची करा, 'रँक'ची नको.''

''मी जीवनावर भाष्य करत नाही. मी भाष्यकार नाही. टीकाकार नाही. तर, स्वत:च्या शारीर आणि मानसिक अवस्थेतून पडताळा पाहणारा केवळ मांडणीकार आहे,'' हे स्पष्ट करून ग्रेस म्हणाले, ''माझे बोलणे ऐकून एकाने 'यू आर व्हेरी गुड ॲक्टर' अशी टिपण्णी केली होती. मी नटाचा अपमान करू इच्छित नाही. नट लेखकाने लिहिलेले भाडोत्री संवाद म्हणतो. मी माझी स्वत:ची कविता म्हणतो.''

### * 'सो कुल'चे प्रकाशन

सोनाली कुलकर्णीलिखित 'सो कुल' या पुस्तकाचे प्रकाशन नाना पाटेकर यांच्या हस्ते करण्यात आले. 'लोकसत्ता'च्या 'व्हिवा' या पुरवणीमध्ये २००५ ते २००७ दरम्यान प्रसिद्ध झालेल्या लेखांचा समावेश 'राजहंस प्रकाशन'च्या पुस्तकात करण्यात आला आहे.

भाषेवरून चाललेल्या वादात नानांनी आपली निश्चित अशी भूमिका अलीकडेच एका कार्यक्रमात व्यक्त केली होती. तोच धागा पकडून ते यावेळी म्हणाले की, भाषा टिकविण्याची सर्वांत सुंदर पद्धत म्हणजे आपण एकमेकांच्या भाषा शिकणे. तसे झाले तर दोघांनाही एकमेकांच्या भाषेविषयी आदर वाटू लागेल.

''माझ्यासारख्या नवोदित लेखिकेला असा स्तंभ लिहायला मिळणे ही एक मोठी संधी होती. अनेक विषय मांडता आले. अनेकदा आपल्याला व्यक्त व्हायचे असते. काही वेळा विविध विषयांबाबत प्रश्नही विचारले जातात, पण संपूर्ण उत्तर द्यायच्या आतच प्रश्न विचारणारा फोन कट करतो. त्या प्रश्नाबाबत विचार मात्र सुरू राहतो. 'सो कुल'च्या निमित्ताने मनातील भावनांना वाट मोकळी करून देता आली,'' अशा शब्दात सोनाली कुलकर्णीने आपले मनोगत व्यक्त केले.

सोनालीच्या लेखनाची तारीफ करतानाच, आपल्याला कोणी संधी दिली तर आपल्यालाही लेखक व्हायला आवडेल, असे पाटेकर म्हणाले. स्तंभाच्या नावाबद्दल

नंतर विचार करू असे पाटेकर यांनी सांगताच प्रेक्षकातून 'सो हॉट' असे नाव सुचविण्यात आले आणि एकच हशा पिकला. ते पुढे म्हणाले की, समाजात सध्या ठिकठिकाणी अन्याय होताना दिसत आहे. परिणामांची चिंता करत आपण त्याबद्दल कोणत्याही प्रकारचा विरोध दर्शवत नाही आणि त्यामुळेच गुंडशाही वाढते. एखादी वाईट गोष्ट घडताना दिसली आणि त्याबद्दल बोलावेसे वाटले. तर लगेचच त्यावर प्रतिक्रिया व्यक्त करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

लोकसत्ताचे संपादक कुमार केतकर म्हणाले की, या स्तंभाच्या शीर्षकापासून सर्व काही सोनालीनेच ठरविले. तिच्यात लिहिण्याची एक आंतरिक उर्जा आहे. त्याचप्रमाणे त्या लिखाणाला अनौपचारिक आणि ओघवत्या शैलीची जोड आहे. ही जोड तिच्या मध्यमवर्गीय मूल्यांमुळे आलेली आहे.'' अलीकडेच नाना पाटेकर म्हणाले होते की मी बिहारी, बंगाली, गुजराती, हिंदू, मुसलमान, शीख, ख्रिश्चन सर्व काही आहे. हाच वैश्विक भाव सोनालीमध्येही दिसून येतो. सोनाली आणि नाना पाटेकर या दोघांचे पाय जमिनीवर आहेत. त्यांच्या क्षेत्रातील ग्लॅमरचा त्यांना स्पर्श झालेला नाही.

### * पाठ्यपुस्तकाचा धंदा

परंपरागत समाजव्यवस्थेत शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर राहिलेल्या वर्गांत शिक्षणाविषयीची आस्था निर्माण करण्यासाठी स्वातंत्र्यानंतर सरकारने हाती घेतलेल्या योजनांना गेल्या सहा दशकांत मर्यादित प्रमाणात का होईना यश आले आहे. मात्र शिक्षणाच्या विस्ताराबरोबरच, विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शिक्षणाच्या दर्जात उत्तरोत्तर घटच होत आहे. खाजगी शाळांतील विद्यार्थ्यांसाठी पाठ्यपुस्तके तयार करणे हा एक 'धंदा' झाला आहे. मेघालयात अशाच एका पाठ्यपुस्तकामुळे संतापाची लाट उसळली आहे. या राज्यात नववी-दहावीसाठी विशिष्ट पाठ्यपुस्तकेच बंधनकारक असली, तरी त्याखालील इयत्तांसाठी शाळांना पाठ्यपुस्तके निवडीचे स्वातंत्र्य आहे. पहिली ते तिसरी या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी दिल्लीच्या 'स्कायलाइन पब्लिकेशन्स' या नव्यानेच या 'धंद्या'त उतरलेल्या प्रकाशनाची पुस्तके निवडली गेली होती. या पुस्तकात येशू ख्रिस्ताचे आक्षेपार्ह छायाचित्र आढळले. डिसेंबरमध्येही शिलाँग येथील सेंट जोसेफ शाळेच्या शिक्षकांनी या बाबीकडे लक्ष वेधल्यानंतर, पोलिसांत रीतसर तक्रार करण्यात आली. पोलिसांनी गुन्हा नोंदवल्यावर, आता मुख्य न्याय दंडाधिकाऱ्याने प्रकाशक इंद्र मोहन झा यांच्याविरुद्ध अटक वॉरंट जारी केले आहे. झा यांनी तातडीने स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन माफी मागितली असली, तरी या चुकीचे खापर त्यांनी पुस्तकाच्या पानांची रचना व सजावट करणाऱ्या व्यक्तींवर फोडले आहे. त्यांनी इंटरनेटवर उपलब्ध असलेली छायाचित्रे पुस्तकात वापरली, असा त्यांनी केला. एका

हातात बीअरचा कॅन आणि दुसऱ्या हातात सिगरेट अशाप्रकारचे हे छायाचित्र, येशू ख्रिस्ताच्या संदर्भातील धड्यात प्रसिद्ध केले गेले; शाळकरी मुलांसाठी बनविलेली पुस्तके, शिक्षणाच्या संस्कारांचा गंधही नसलेल्या व्यक्तींकडून बनवून घेतली जातात, ती छापली जाण्यापूर्वी वा नंतर त्यातील मजकुरावरून नजरही फिरवली जात नाही, ती शाळेतील विद्यार्थ्यांना लावण्यापूर्वी हा निर्णय घेणारे शिक्षक ती चाळूनही पाहत नाहीत, हेच यावरून स्पष्ट होते.

*** 'तारकांच्या विश्वात'चे प्रकाशन**

खगोल संशोधक व विज्ञान प्रसारक पराग महाजनी यांनी लिहिलेल्या 'तारकांच्या विश्वात' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून डॉ. राजीव शारंगपाणी, तर प्रमुख पाहुणे म्हणून विज्ञान प्रसारक अरविंद गुप्ता उपस्थित होते.

मोहन आपटे यांनी सांगितले, की आजचे युग हे खगोलशास्त्राचे सुवर्णयुग म्हटले पाहिजे, कारण त्या अगोदरच्या पाच हजार वर्षांत झाली नाही एवढी प्रगती अलीकडच्या पन्नास वर्षांत झाली. १९५७ मध्ये रशियाने स्पुटनिक उपग्रह अवकाशात सोडला तेव्हापासून या प्रगतीला सुरुवात झाली. त्यानंतर रशियाने चंद्रावर एकूण २४ अंतराळयाने पाठविली. रशियाची प्रगती पाहून धास्तावलेली अमेरिका मग या स्पर्धेत उतरली. त्यानंतरच्या काळात बुधावर दोन याने, शुक्रावर तीन, तर चंद्रावर एकूण ७३ याने पाठवण्यात आली. आतापर्यंत चाळीस यानांनी मंगळाचा वेध घेतला आहे. गुरूकडे नऊ, तर शनीकडे पाच याने झेपावली. युरेनसचा वेधा आतापर्यंत दोन यानांनी घेतला आहे. प्लुटो हा आता ग्रह नाही, पण त्याच्या दिशेने पाठवलेले न्यू होरायझन हे यान २०१५ मध्ये तेथे पोहोचेल, त्याचा वेग ताशी ६० हजार कि. मी. आहे. कालांतराने अवकाशयानांचा वेग ताशी ७५ हजार किलोमीटरपेक्षाही जास्त होईल, त्या वेळी चंद्रावरचा प्रवास हा पुणे-मुंबई प्रवासासारखा सोपा होईल.

ते म्हणाले, की अलीकडेच चंद्राच्या दिशेने पाठवण्यात आलेले ल्युनर रेकनसान्स ऑरबायटर हे यान चंद्राची छायाचित्रे पाठवित असून, त्यात अपोलो-११ हे मानवाला चंद्रावर घेऊन गेलेले यान जिथे उतरले होते त्याची छायाचित्रेही मिळाली आहेत. त्यामुळे मानवाचे चंद्रावरील अवतरण हे थोतांड होते व तेव्हाचे सगळे चित्रण हे एका वाळवंटातील आहे हे जे म्हटले जाते ते खरे नाही. अमेरिकी अंतराळवीर खरोखर चंद्रावर उतरले होते याचे पुरावे या ल्युनर रेकनसान्स ऑरबायटरने दिले आहेत. मंगळावर पाठवलेल्या स्पिरीट या अंतराळयानाने मंगळावरचे सूर्यग्रहण दाखवणारे छायाचित्र पाठवले आहे ते वेगळा अनुभव देणारे आहे. शनीच्या दिशेने पाठवलेल्या कॅसिनी यानाने पाठवलेल्या एका छायाचित्रात शनिच्या कड्यामध्ये एक बारीक

ठिपका दिसतो आहे ती आपली पृथ्वी आहे, ते छायाचित्र विश्वात पृथ्वीचे स्थान काय आहे हे स्पष्ट करते.

खगोलशास्त्राच्या भवितव्याबाबत ते म्हणाले, की चंद्रावर मानवी वसाहत निर्माण करण्याचे उद्दिष्ट २०२५ पर्यंत अमेरिका साध्य करील. भारतही इ. स. २०२० पर्यंत चंद्रावर माणूस पाठवेल यात शंका नाही असेही प्रा. आपटे यांनी सांगितले.

पराग महाजनी यांनी सांगितले, की विज्ञानाची जाण नसलेल्या लोकांनाही खगोलनिरीक्षण करता यावे यासाठी हे पुस्तक लिहिले आहे. त्यामुळे कुठला तारकासमूह कुठे बघायचा याचे ज्ञान मिळते.

❒


**मेहता मराठी ग्रंथजगत** दिवाळी अंकाला

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अ.स. गोखले स्मृत्यर्थ

**‘रत्नाकर पारितोषिक’**



डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या हस्ते ‘श्रेष्ठता पारितोषिक’ स्वीकारताना कार्यकारी संपादक शंकर सारडा, वंदना घाटगे




*कधी गर्जतो सागराच्या बळाने*
*कधी कापतो बोलता आपणाशी*
*असा मी, तसा मी, कसा मी कळेना*
*स्वत:च्या घरी दूरचा पाहुणा मी...*

कविवर्य विंदा करंदीकर यांच्या या ओळीतून त्यांचे सगळे व्यक्तिमत्त्व उभे राहते असे मला वाटते. पृथ्वीवरचा विंदांचा वावर हा पाहुण्यासारखा होता. ते येथील विषमता, दु:ख दारिद्र्य, पांथिक-धार्मिक कडवेपणा, आचार-विचारातील अंधश्रद्धा या सर्व विरूपांनी व्यथित होत. या सामाजिक विरूपांनी आणि विसंगतींनी भरलेल्या समकालीन वातावरणात त्यांचा जीव गुदमरत असे. हे सर्व बघणे असह्य होत असे आणि स्वत:च्या संवेदनशील मनाला ते पुन: पुन्हा बजावत असत, ''माझ्या मना, बन दगड.''

करंदीकर इंग्लिशचे प्राध्यापक होते. आधुनिक पाश्चात्य वाङ्मयीन समीक्षात्मक संकल्पनांचा त्यांनी अभ्यास केला होता. टी.एस. एलियटच्या आधुनिक जीवनातील बोअरडम (कंटाळा), अँक्झायटी (चिंता) आणि लोन्लीनेस (माणसाचा एकाकीपणा) किंवा अस्तित्ववादी एलिनिएशन (जगाबद्दल वाटणारा तुटकपणा) यासारख्या संकल्पनांचा प्रभाव त्यांच्यावर कळत-नकळत पडलेला होता. ज्यां पॉल सार्त्र, आल्बेर कामू यांच्याप्रमाणे ते स्वत:ला या जगात आउटसायडर, उपरा, पाहुणा मानत होते. अपघाताने मानवी जन्म लाभला, या पृथ्वीवर वास्तव्य घडले; पण या इथल्या कुणाशी आपले काही नाते नाही, काही देणेघेणे नाही, आपली नाळ येथे जुळत नाही

अशी भावना त्यांच्या अंतर्यामी दृढ होती असे त्यांच्या कवितांवरून वाटते.

''माझा पिंडधर्म वेगळा आहे. मी माणसात असलो तरी माणसांचा नसतो. मी माणसात वाढलो पण माणसात रमलो नाही. कधी कधी थोडे अपराधी वाटायचे. सुरुवातीला तसा प्रयत्नही केला. पण कधी जमलंच नाही. माझा पिंडधर्मच वेगळा होता... ग्लॅमरचे कधी आकर्षण मला वाटले नाही. मी ग्लॅमर मिळवू शकलो नसतो आणि मिळवू शकलो असतो तरी त्याने माझ्या आत्म्याचे समाधान झाले नसते... कौतुकाचा हव्यास वाऱ्याची झुळूक येऊन एखादं फळ पडावं तसा गळून पडला....'' असे विंदांनी विजया राजाध्यक्ष यांना दिलेल्या मुलाखतीत म्हटले होते, ते नि:संशय त्यांच्या स्वभाववृत्तीचे प्रांजल आकलन होते. त्यांना स्वत:ला ते आकलन ऐन तरुण वयातच झाले होते हे विशेष!

त्यामुळेच की काय, विंदांचे येथील वास्तव्य हे पाहुण्यासारखे, आऊटसायडरसारखे होते.

त्यांनी चारचौघांसारखा संसार केला, प्राध्यापक म्हणून काम केले, काव्यलेखन केले, ललित लेख लिहिले. अनुवाद केले, समीक्षात्मक लेखन केले. काव्याचे सादरीकरण केले. पाहुणेपण मनोमन पक्के असले तरी जे काम पत्करले ते इमानेइतबारे केले. प्रामाणिकपणे सर्वस्व ओतून केले. काव्यलेखनात वेगवेगळे प्रयोग केले. आशयाचे अंत:स्वर पकडले. बालगीतांचे संग्रहही काढले. जे काम केले ते उत्तम केले. त्यामुळे लोकांना त्याचे महत्त्व जाणवले. विविध पुरस्कारांच्या रूपाने त्यांना त्यांच्या कार्याची पावती मिळाली.

केंद्र सरकारच्या शिक्षणविभागाने आणि एन.सी.आर.ई.टी.ने त्यांना चार पुरस्कार दिले. सीनियर फुलब्राइट फेलोशिप मिळाल्याने अमेरिकेत वर्षभर अध्ययन-अध्यापन करण्याचा मान मिळाला. सोव्हिएट लँड नेहरू पुरस्कार मिळाल्याने रशियाचा दौरा करण्याचा योग आला. भारतीय पातळीवरचे कवी म्हणून कबीर राष्ट्रीय सन्मान १९९१ मध्ये मिळाला. जनस्थान, महाराष्ट्र फाउंडेशन, केरळचा कुमार आसन काव्य पुरस्कार असे लाखालाखांचे कितीतरी पुरस्कार मिळाले. त्यावर ज्ञानपीठ पुरस्काराने कळस चढवला.

या उत्तरकालीन पुरस्कारांदाखल मिळालेल्या लाखो रुपयांचे समाजसेवी संस्थांना त्यांनी मुक्तहस्ताने दान करून टाकले. संपत्तीचा मोह धरला नाही. ऐषआरामाचा लोभ धरला नाही.

१९७६ साली मुदतपूर्व निवृत्ती स्वीकारली. तीही काहीशा अशाच भावनेतून.

१९८० साली 'आता काव्यलेखन नाही' असे स्वत:शीच ठरवून टाकले.

'अष्टदर्शन' २००३ मध्ये प्रकाशित झाले. तो अपवाद. त्याला ज्ञानपीठ

मिळाले. मराठीला तिसरा ज्ञानपीठ पुरस्कार त्याद्वारे लाभला. नरसिंह राव यांनी त्यांच्या नावाची शिफारस केली.

१९५९-६१ साली मुंबई विद्यापीठात इंग्रजी विषयात मी एम. ए. करीत होतो. त्यावेळी इंग्लिश लिटररी क्रिटिसिझमचा एक पेपर विंदा करंदीकर शिकवत... नेमलेल्या पुस्तकातले वेगवेगळ्या समीक्षकांचे धडे ते नेमक्या शब्दात समजावून देत. रेखीव मुद्दे मांडत. समीक्षेचे सूत्र पक्के असे. फापटपसारा नसे. विद्यार्थी प्रश्न विचारत. त्यांची सूत्रमय उत्तरे देत. विद्यार्थ्यांमध्ये ते फारसे मिसळत होते असे आठवत नाही. तास संपल्यावर निघण्याची घाई असे.

१९६२ साली महाराष्ट्र टाइम्समध्ये मी त्यांची एक मुलाखत प्रसिद्ध केली. बालसाहित्य हे बहुपेडी असते. मुलांना मुलांच्या पातळीवर ते कळते; प्रौढांना प्रौढांच्या पातळीवर आवाहन करण्यास ते सक्षम हवे असे मत त्यांनी आग्रहपूर्वक मांडले.

१९९३ च्या सातारच्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचा मी कार्याध्यक्ष होतो. कार्यक्रमाच्या आखणीच्या बैठकीमध्ये महामंडळापुढे मी एक प्रस्ताव मांडला. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदासाठी योग्य असूनही ज्या व्यक्ती निवडणुकीच्या रणधुमाळीत उतरण्यास अनुत्सुक असतात, अशा व्यक्तींना संमेलनात मुद्दाम पाचारण करून त्यांचा सत्कार करावा... या सूचनेवर महामंडळाचे अध्यक्ष सुरेश द्वादशीवार म्हणाले, ''अशी कोण व्यक्ती तुमच्या डोळ्यांपुढे आहे?''

मी म्हटले, ''विंदा करंदीकर...''

त्यांनी विचारले, ''ते येतील का? ते येत असले तर जरूर असा पायंडा पाडू या.''

मी म्हटले, ''विचारून बघतो.''

मी घरी जाऊन विंदांना फोन केला. त्यांना ही कल्पना सांगितली. आमंत्रणाचा स्वीकार करा अशी विनंती केली. बंगाली कवी सुभाष मुखोपाध्याय उद्घाटनाला येणार आहेत हेही सांगितले. विंदांनी होकार दिला आणि मला अपरिमित आनंद झाला. मी महामंडळाच्या सदस्यांना ते सांगितले तेव्हा सर्वांनाच त्याचे अप्रूप वाटले. प्रत्येक कार्यक्रमाबद्दल वाद झडत असताना या कार्यक्रमाबद्दल मात्र सर्वांनी समाधानाचा सूर काढला.

संमेलनातला विंदांचा सत्कार दृष्ट लागण्यासारखा झाला. त्या सत्काराला उत्तर देणाऱ्या भाषणात विंदांनी 'पंचमहापापांचा' उल्लेख केला. ते म्हणाले, ''सध्या उसळलेल्या अमानुषतेच्या थैमानाची जबाबदारी फक्त गुंडांवर टाकून चालणार नाही. गेल्या पन्नास वर्षांचा इतिहास वेगळी साक्ष देईल. या कालखंडात आम्ही केलेल्या

पंचमहापापांची ही अटळ आणि संकलित निष्पत्ती आहे. ती पापे कोणती? सांगतो. मातृभूमीचे विभाजन हे पहिले पाप. समान नागरी कायदा न करणे हे दुसरे पाप. गांधींची हत्या हे तिसरे पाप. झुंडीच्या दबावाखाली केलेल्या कायद्यातील दुरुस्ती हे चौथे पाप आणि बाबरी मशीद पाडणे हे पाचवे पाप. परिणामत: स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवासाठी मातृभूमीच्या पायापुढे आज आम्ही जो नजराणा आणलेला आहे तो भारतीय संस्कृती, सहिष्णुता आणि संपत्तीचा बळी देणारा आहे... मी निर्ढावलेला आशावादी आहे. अरबी समुद्रातून हे कालकूट उपलब्ध झाले पण यातूनही काही अमृत निघू शकेल अशी आशा मी बाळगतो. धर्मवेडाच्या आहारी गेलेला समाज पुन्हा शुद्धीवर येऊन पूर्वीप्रमाणेच निर्मळ मनाने तुकारामाचे अभंग आणि कबीराची भजने म्हणत राहील, पुन्हा शेजारधर्माला जागू लागेल आणि त्याची दडपलेली माणुसकी पुन्हा डोके वर काढील अशी मला खात्री आहे.''

हजारो उपस्थितांना एकाच वेळी अंतर्मुख करणारे आणि हेलावणारे हे भाषण होते.

वयोमानानुसार विंदांची तब्येतीची कुरकुर गेली काही वर्षे चालूच होती. ज्ञानपीठ पुरस्कार मिळाल्यानंतर त्यांना नागपूरला होणाऱ्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अविरोध अध्यक्षपद द्यावे अशी सूचना मी केली होती. परंतु तिला महामंडळाने प्रतिसाद दिला नाही. ज्ञानपीठ पुरस्काराचा मानकरीही या अध्यक्षपदी विराजमान होऊ शकत नसेल तर आपल्या साहित्यप्रेमाला काही अर्थ नाही, अधिष्ठान नाही हेच खरे! विंदा स्वत:ला स्वत:च्या घरीही दूरचा पाहुणाच मानत होते, त्यामुळे त्यांना अध्यक्षपदाचे अगत्य नव्हते, परंतु आपल्या रसिकतेची कृपणता जी दिसते ती लज्जादायक वाटते.

**शंकर सारडा**

ई १० पाटील रिजन्सी, हॉटेल कलिंगामागे,

१५ एरंडवणे पुणे ४११ ००४.

❒

नवीन पुस्तकांची माहिती, नवीन योजना कळविण्यासाठी आपला **Email ID** आमच्याकडे हवाच!

info@mehtapublishinghouse.com

## पेपरबॅक स्वस्त पुस्तके

नवीन **खंडाळ्याच्या घाटासाठी** - शुभदा गोगटे

पृष्ठे : ४८० किंमत : रु. १५०

(१०००० प्राणांच्या आहुतीमधून साकारलेल्या बोरघाटाची थरारक कहाणी)

नवीन **जगद्गुरू तुकाराम महारांचे आत्मचरित्र**

- प्रा. उत्तमराव खरात

पृष्ठे : १७६ किंमत : रु. ८०

### आमची इतर पेपरबॅक स्वस्त पुस्तके

| | | |
|---|---|---|
| ◆ गियानाहून पलायन | विजय देवधर | रु.६० |
| ◆ कनक आणि कामिनी | जयंत देवकुळे | रु.६० |
| ◆ आशा परत येते | जयंत देवकुळे | रु.५५ |
| ◆ चमत्कार | विजय तरवडे | रु.५० |
| ◆ प्राक्तन | सुहास शिरवळकर | रु.५० |
| ◆ संसर्ग | नारायण धारप | रु.५० |
| ◆ आपली माणसं | डॉ. विजया वाड | रु.६० |

सर्व पुस्तक-विक्रेत्यांकडे उपलब्ध

पोस्टेज फ्री

**संपर्क :**

**भारत बुक हाऊस**

१७८८, सदाशिव पेठ, देशमुख वाडी, पुणे विद्यार्थी गृहाजवळ,
पुणे-३० फोन : ३२५४९०३२/३३
मोबा. : ९८५०७८४२४६/९८५०९६५४७९

## पेपरबॅक स्वस्त पुस्तके

नवीन

### असूरवेद - संजय सोनवणी

पृष्ठे : २८६ किंमत : रु. ९५

(आजवरच्या सर्व सांस्कृतिक श्रद्धा उद्ध्वस्त करणारी थरार कादंबरी)

नवीन

### ब्रह्मसूत्र रहस्य - संजय सोनवणी

पृष्ठे : १४४ किंमत : रु. ७५

(भारतीय तत्त्वज्ञानातील, प्रत्येकाने वाचायलाच हवीत अशी सर्वश्रेष्ठ सूत्रे)

### आमची इतर पेपरबॅक स्वस्त पुस्तके

| | | |
|---|---|---|
| ◆ अगदी सोपी ज्ञानेश्वरी | श्री. न. आंबेकर | रु.५० |
| ◆ हिंदू धर्माचे शैव रहस्य | संजय सोनवणी | रु.५५ |
| ◆ मुंबई २६/११ पूर्वी आणि नंतर | संजय सोनवणी | रु.६० |
| ◆ नाईट | आशा कर्दळे | रु.५० |
| ◆ द्वंद्व | अनु. अनंत मनोहर | रु.५० |
| ◆ टिल आय डाय ! | अनु. श्रीनिवास पटवर्धन | रु.५० |
| ◆ द ब्रॅन्डस् | अनु. श्रीनिवास पटवर्धन | रु.४० |
| ◆ ग्राहक सेवेचा मूलमंत्र | डॉ. सुधीर राशिंगकर | रु.५० |

सर्व पुस्तक-विक्रेत्यांकडे उपलब्ध

पोस्टेज फ्री

**संपर्क :**


**भारत बुक हाऊस**

१७८८, सदाशिव पेठ, देशमुख वाडी, पुणे विद्यार्थी गृहाजवळ,
पुणे-३० फोन : ३२५४९०३२/३३
मोबा. : ९८५०७८४२४६/९८५०९६५४७९

# पुस्तक परिचय

## आर्सेलरचा पोलाद कारखाना हस्तगत करण्यासाठी लक्ष्मी मित्तल यांनी केलेली कौशल्यपूर्ण व्यूहरचना

# कोल्ड स्टील




**टीम बुके/बायरॉन उसी** अनु. सुभाष जोशी

'कोल्ड स्टील' हे पुस्तक सद्य:कालीन जागतिकीकरणाच्या स्पर्धाशील वातावरणाचे एक अंतर्भेदक दर्शन घडवते. जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या अचाट संधींची त्यावरून कल्पना येते. अवघ्या वीस वर्षात लक्ष्मीनिवास मित्तल यांच्यासारखा तरुण चार खंडात १४ देशात पोलाद कारखान्यांची मालकी मिळवून दरसाल ४० लाख टन पोलादाचे उत्पादन करण्याची क्षमता सिद्ध करून जगातील सर्वाधिक श्रीमंत व्यक्तींमध्ये स्थान पटकावतो - हे जागतिकीकरणामुळेच संभवू शकते. त्याचप्रमाणे प्रत्येक क्षेत्रात निर्माण झालेल्या स्पर्धेला आता एकदेशीय स्वरूप उरलेले नसून तिला जागतिक परिमाण लाभले आहे, कुठल्याही देशात एखादा औद्योगिक प्रकल्प काढायचा झाला तर जगातील विविध देश आणि वेगवेगळे उद्योगपती व बँकर्स त्याच्या आर्थिक शक्यतांचा धांडोळा घेऊ लागतात, त्यामुळे त्या स्पर्धेची व्याप्ती वाढते, आंतरराष्ट्रीय व्यापार-उद्योग धोरणांची आणि कायद्यांची चौकट सांभाळूनच पुढे पाऊल टाकता येते हे क्षणभरही दुर्लक्षित करता येत नाही...

या प्रक्रियेचे एक अत्यंत वास्तव आणि वस्तुनिष्ठ चित्र उभे करणारे 'कोल्ड स्टील' हे पुस्तक एखाद्या थरारकथेइतकेच रहस्यपूर्ण आणि उत्कंठावर्धक आहे.

या थरारकथेमध्ये आपण गुंतून जातो कारण या थरारकथेचा नायक एक भारतीय आहे. हा भारतीय नायक आर्सेलरसारख्या जगातील सर्वाधिक उच्च दर्जाचे पोलाद तयार करणाऱ्या अग्रगण्य कारखान्यावर आपले प्रभुत्व प्रस्थापित करतो. वेगवेगळ्या देशांचे राजनेते आणि उद्योजक यांच्या कटकारस्थानांना आणि व्यूहरचनांना तोंड देत, सावध पवित्रे टाकत, नामवंत बँकर्सचे आणि आर्थिक सल्लागारांचे मार्गदर्शन घेत, पोलाद क्षेत्रातील मान्यवरांना आपल्या बाजूला घेण्याचे कौशल्य दाखवत सहा महिन्यांच्या अवधीत लक्ष्मीनिवास मित्तल यांनी मूळातच विक्रीसाठी उपलब्ध नसलेल्या आर्सेलर या सुस्थितीतील पोलाद कारखान्यावर कब्जा केला ही आधुनिक काळातील एक विलक्षण यशोगाथा आहे.

या थरारकथेत मित्तल स्टील एकीकडे तर आर्सेलर दुसरीकडे एवढाच संघर्ष नव्हता, विविध बँका आणि वित्तीय संस्था यांचाही संबंध होता. प्रत्येकाचे वकिली सल्लागारही वेगवेगळ्या व्यूहरचना करीत होते. अनेक देशांचे नेते आणि सत्ताधीश तसेच वेगवेगळ्या देशांतील पोलाद कारखान्यांचे उत्पादक रस घेत होते. त्या सर्वांना तोंड देत लक्ष्मीनिवास मित्तल यांनी आर्सेलरचा ताबा मिळवला आणि 'आर्सेलर मित्तल'चा पाया घातला. याचा अभिमान प्रत्येक भारतीयाला वाटायला हवा. सर्वांत जास्त पोलाद उत्पादन करणारा कारखानदार म्हणून लक्ष्मीनिवास मित्तल यांनी मिळवलेला सन्मान हा अभूतपूर्व आहे. धीरूभाई अंबानी, नारायणमूर्ती, यांच्याचसारखे लक्ष्मीनिवास मित्तल यांचे कर्तृत्व लक्षवेधक आहे.

हॅमिल्टन (ओन्टारिओ) या कॅनडामधील शहरातील डोफॅस्को या स्टील कंपनीच्या

लिलावात आर्सेलर, स्मार्टसमूह आणि लक्ष्मी मित्तल या तीन स्पर्धकांनी भाग घेतला. आर्सेलरने २.५ अब्ज डॉलर्सची प्राथमिक बोली लावली. ती वाढत वाढत ४ अब्जांवर गेली. मित्तल यांनी ४.४८ अब्ज बोली लावून आर्सेलरवर मात केली. परंतु त्याचवेळी व्हाइटनाइट म्हणून थायसन क्रप कंपनीने हस्तक्षेप करून ही बोली ४.८ अब्जापर्यंत नेली आणि मित्तल यांच्या तोंडचा घास काढून घेतला. त्यामुळे मित्तल यांनी आर्सेलरच ताब्यात घेण्याचे ठरवले.

आता अडचण अशी की आर्सेलर ही काही विक्रीला काढण्यात आलेली कंपनी नव्हती. ती लक्सेंबर्गमधील अग्रगण्य आणि फायद्यात चाललेली कंपनी होती. मोटारींना लागणारे उच्च पद्धतीचे पोलाद निर्माण करण्याबद्दल तिची ख्याती होती. ती ताब्यात घेण्याच्या मार्गात बरेच अडसर होते. युरोपियन युनियनच्या कमिशनरला आणि नोकरकपातीचा मुद्दा काढणाऱ्या कामगार संघटनांना शांत करून नोकर कपात वा टाळेबंदी होणार नाही असे त्यासाठी आश्वासन द्यावे लागले असते. अनेक बँकांचा पाठिंबा घेणे, शेअर होल्डर्सना आकर्षक वाटेल असा प्रस्ताव देणे, यासाठी बँकर्स, वकील, राजकारण्यांना हाताळणारे मध्यस्थ आणि लोकमत आपल्या बाजूने वळवणारी प्रसार माध्यमातील मंडळी यांचा ताफा उभा करावा लागणार होता. त्यांचा समन्वय साधण्यासाठी मित्तल यांच्या विश्वासातील सुधीर माहेश्वरीची योजना करण्यात आली. गोल्डमन साक्स या वित्तीय कंपनीची सेवा घेण्यात आली. फ्रान्स, लक्सेंबर्ग, स्पेन, बेल्जियम येथील शअर मार्केटमध्ये आर्सेलरची उपस्थिती होती. मित्तलचे नाव अमेरिकन आणि नेदरलँडच्या शेअर बाजारात होते. आर्सेलरच्या भागधारकांपुढे प्रस्ताव मांडण्याच्या आधी या सर्वांशी संपर्क साधून संमती मिळवण्याची गरज होती. गोल्डमन साक्सने योल झोवी या कर्तबगार फ्रेंच गुंतवणूकतज्ज्ञाची या कामगिरीसाठी नेमणूक केली. योग्य ती गुप्तता पाळून, माहिती यंत्रणा कंट्रोल रिस्क ग्रुपकडून तपासून घेत, हेरगिरीला रोखून या दशकातला एक महासंग्राम लढण्याची तयारी करण्यात आली.

-आणि लक्ष्मीनिवास मित्तल यांनी २६ जानेवारी २००६ रोजी रात्री ९.३५ वाजता आर्सेलरचा प्रमुख गी डोल याला फोन केला, ''गी, मी लक्ष्मी मित्तल बोलतो आहे. उद्या मितल स्टील तुझ्या भागधारकांसमोर आर्सेलरच्या शेअर्ससाठी थेट प्रस्ताव मांडणार आहे हे तुझ्या कानावर घालण्यासाठी हा औपचारिक फोन करत आहे. पोलाद उद्योगाच्या एकत्रीकरणाबाबत आपले विचार सारखेच आहेत. तेव्हा हा व्यवहार मैत्रीपूर्ण वातावरणात होऊ शकतो. मी आक्रमकपणे काही करू इच्छित नाही.''

काहीही न बोलता गी डोल फोन बंद करतो.

आणि पुढचे सहा महिने या लढाईत अनेक डाव-प्रतिडाव रंगत जातात. शेवटी

मित्तल बाजी मारतात. आर्सेलर-मित्तल ही पोलाद उद्योगातील सर्वांत मोठी संस्था निर्माण होते आणि एक नवा इतिहास घडवते.

ही कहाणी 'कोल्ड स्टील'मध्ये तपशीलवार वाचायला मिळते.

या कहाणीच्या जोडीने मित्तल यांची पोलाद क्षेत्रातील यशोगाथाही आपल्यासमोर उलगडली जाते.

राजस्थानातील सादुलपूर येथे १९५०मध्ये जन्मलेल्या आणि कलकत्त्याला स्थलांतरित झालेल्या लक्ष्मी मित्तल यांनी पन्नाशीच्या टप्प्यावर ब्रिटनमधील सर्वांत श्रीमंत व्यक्ती म्हणून मजल मारली याचे आश्चर्य वाटते. वयाच्या तेराव्या वर्षी त्यांच्या वडिलांची, मोहनलाल यांची भागीदारी असलेल्या ब्रिटिश इंडिया रोलिंग मिल्समध्ये लोखंडाच्या रसापासून पट्ट्या, कांबी व सळया तयार करण्याच्या कारखान्यात सुटीच्या वेळी काम करणाऱ्या आणि उत्पादनाच्या प्रत्येक प्रक्रियेत प्रावीण्य मिळवणाऱ्या, कारखान्यातील दैनंदिन व्यवस्थापन आणि पोलादाच्या जागतिक उलाढालीवर लक्ष ठेवणाऱ्या लक्ष्मी मित्तल या तरुणाने कॉलेज शिक्षणानंतर जमेल तसा घरचा व्यवसाय बघण्याची जबाबदारी स्वत: होऊनच स्वीकारली. लोखंडाच्या कारखान्याचे अनेक परवाने मोहनलाल यांनी आणि चुलत्यांनी मिळवून, जुने डबघाईला आलेले कारखाने ताब्यात घेण्याचे धोरण राबवले; कारण सरकारी परवाने मिळवणे हे त्यावेळी फार अवघड होते. १९६३ साली आंध्र प्रदेशात लोखंडाचे उत्पादन करणारा कारखाना काढण्याचा परवाना मिळाल्यावर लक्ष्मी मित्तलच्या वडिलांनी कलकत्ता सोडून एवढ्या लांब कशाला जायचे असा प्रश्न न करता तेथे जाऊन त्या कारखान्याची उभारणी केली. (मित्तल) इस्पात असे नाव त्याला दिले. मित्तल कुटुंबाचा तो पहिला उत्पादन प्रकल्प.

कलकत्त्यातील उद्योगव्यवसाय चालूच होता. वाढत होता.

लक्ष्मी मित्तल यांना आंतरराष्ट्रीय पोलाद उद्योगात प्रवेश करण्याची पहिली संधी १९७५ साली वयाच्या पंचविसाव्या वर्षी मिळाली.

इंडोनेशियातील पूर्व जावा बेटात लोखंडाचे उत्पादन करण्याचा कारखाना काढण्याची तेथील सरकारची निविदा बघून त्याच्या वडिलांनी तेथे जाऊन जागा विकत घेतली. परंतु पुढे तेथील शासनाच्या जाचक अटी आणि काळकाढूपणाचे धोरण यामुळे ते वैतागले. वीज पुरवठ्याची व्यवस्थाही करायला सरकार तयार नव्हते. तेव्हा तेथे कारखाना काढण्याचा विचार रद्द करून मोहनलाल मित्तल यांनी लक्ष्मी मित्तल यांना कारखान्यासाठी घेतलेली जमीन विकून टाकण्याकरिता जावामध्ये पाठवले. खरे तर लक्ष्मी मित्तल यावेळी पत्नी उषा आणि दीड-दोन वर्षांचा मुलगा आदित्य यांना घेऊन इंडोनेशियात पर्यटनासाठी जाण्याचा बेत आखत होते. त्यामुळे एका दगडात दोन पक्षी असा योग अनायासेच जमून आला.

लक्ष्मी मित्तल यांनी इंडोनेशियातील पोलाद उद्योगाची माहिती मिळवली. त्यावेळी इंडोनेशियात पोलादाचे फारच अल्प उत्पादन होई. पोलाद कारखान्यासाठी दगडी कोळशाचा प्रचंड साठा करावा लागे. जपान वगैरे देशातून बांधकामाला लागणारे स्टील आयात केले जाई. त्याचे दर महागडे होते. दर महागडे असले तरी लोकांना गरजेएवढे स्टील मिळेलच याची खात्री नसे. व्यापारी साठवणूक करून मालाची कृत्रिम टंचाई निर्माण करून नफेबाजी करीत. येथे पोलादाचे उत्पादन कोळशाऐवजी विजेच्या भट्टीत केले आणि नवे तंत्रज्ञान वापरले तर सध्या बाजारात असणाऱ्या पोलादाच्या दरात निम्मीअधिक घट होऊ शकेल हे लक्ष्मी मित्तल यांच्या लक्षात आले. इंडोनेशियामध्ये त्यावेळी इंजिनियरिंग उद्योगाला लागणारी साधने बनवण्यासाठी लागणारे पोलाद आणि बांधकाम उद्योगाला लागणारे लोखंड स्थानिक पातळीवर तयार होत नव्हते. लक्ष्मी मित्तल यांनी तेथील बाजारातले पोलादाच्या विविध उत्पादनांचे दर बघितले आणि दगडी कोळशाच्या ब्लास्ट फर्नेस ऐवजी विजेच्या भट्टीचा वापर करून संपृक्त लोखंडाच्या लगडींद्वारे 'डायरेक्अ रिड्युस्ड आयर्न' पद्धतीचा वापर केला तर उत्पादन खर्चात ५० टक्के बचत होऊन भांडवलही कमी लागेल हे गणित मनोमन केले. हा पर्याय त्यांचे मनोबल वाढवणारा होता. साहजिकच इंडोनेशियातल्या सुरमाया या गावी कारखाना चालवणे फायदेशीर ठरेल अशी त्यांची खात्री पटली. जमीन विकण्याचा बेत त्यांनी रद्द केला. २० लाख डॉलर्सचे इस्पातचे शेअर्स, साडेसतरा लाख डॉलर्स स्थानिक भागीदारांचे आणि ३७ लाख डॉलर्स बँक ऑफ इंडियाच्या सिंगापूर शाखेकडून कर्ज अशी भांडवलाची उभारणी करण्याचे ठरवून तयारीनिशी वाटाघाटींसाठी आलेल्या लक्ष्मी मित्तल यांना इंडोनेशिया सरकारने सकारात्मक प्रतिसाद दिला. उच्च स्तरावरून सूत्रे हलली. वीजपुरवठ्याची हमी दिली. आवश्यक ते परवाने दिले. भारतातून यंत्रसामग्री आणण्यात आली आणि २९ नोव्हेंबर १९७७ रोजी इंडोनेशियातला डायरेक्ट रिड्युस्ड आयर्नद्वारे पोलादाची उत्पादने करणारा कारखाना सुरू झाला. १४०० सेंटिग्रेड तापमानाचा नारिंगी रंगाचा लोखंडाचा रस यंत्राच्या रोलर्समधून पुढे पुढे सरकत होता आणि शेवटी लोखंडाच्या कांबीचे रूप धारण करून बाहेर पडत होता. पहिल्या वर्षात २६००० टन लोखंडाचे उत्पादन झाले. दहा लाख डॉलर्सचा नफा झाला. इंडोनेशियात त्यावेळी जपानकडून पोलादी उत्पादनांची आयात होई. त्या तुलनेत मित्तल यांची उत्पादने कमी दरात उपलब्ध झाल्याने जपानी आयात कमी कमी होऊ लागली.

बारा वर्षात या कारखान्याचे उत्पादन तीन लाख टनांच्या घरात गेले.

तरीही मागणी वाढत होती.

दुसरा नवा कारखाना काढण्याची निकड जाणवली. त्यावेळी नवा कारखाना उभारण्याऐवजी चालू असलेले कारखाने ताब्यात घेतल्यास व्याप कमी होईल अशी

कल्पना मनात आली.

तशी संधीही चालून आली.

त्रिनिदाद-टोबॅगो येथील सरकारी कारखाना दिवाळखोरींच्या वाटेवर होता. त्याचा लिलाव करण्याचा तेथील सरकारचा विचार होता. लक्ष्मी मित्तल यांनी तेथील सत्ताधीशांना भेटून सांगितले, ''हा कारखाना चालवून तुम्हाला दरमहा एक कोटी डॉलर्सचे नुकसान होते आहे. तो मला चालवायला द्या. मी तुम्हाला दरमहा एक कोटी डॉलर्स देईन. कारखाना नफ्यात आणून दाखवीन. मात्र पाच वर्षांनी मला तो विकत घेण्याची मुभा मिळावी.''

त्रिनिनाद-टोबॅगो सरकारला लक्ष्मी मित्तल यांचा हा प्रस्ताव मान्य झाला. दरमहा होणारा एक कोटी डॉलर्सचा तोटा भरून निघून, एका कोटी डॉलर्सचे जास्त उत्पन्न मिळणार, शिवाय जर्मन तंत्रज्ञांना वर्षाला द्यावे लागणारे २ कोटी डॉलर्सही वाचणार हा प्रस्ताव तेथील सरकारला मोठाच दिलासा देणारा होता. त्यामुळे लक्ष्मी मित्तल हा जणू आपल्या देशाला दिवाळखोरीपासून वाचवण्यासाठी धावून आलेला देवदूतच आहे असे तेथील सरकारला वाटले. लक्ष्मी मित्तल यांनी जर्मन तंत्रज्ञांच्या जागी भारतीय तंत्रज्ञांना नेमून २ कोटी डॉलर्सचा खर्च २० लाख डॉलर्सवर आणला. १९८९ मध्ये या कारखान्यात ४२ हजार टन पोलादाचे उत्पादन होत असे. १९९३ साली ते उत्पादन दहा लाख टन झाले. कराराप्रमाणे पाच वर्षांनी हा कारखाना मित्तलच्या मालकीचा झाला. त्यासाठी २० कोटी डॉलर्सचा सौदा झाला. कारखान्याचे नाव 'इस्पात करेबियन' ठेवण्यात आले.

१९७७ ते १९८९ पर्यंत लक्ष्मी मित्तल यांनी पूर्व जावातील सुरमायाच्या कारखान्यावरच लक्ष केंद्रित केले. ह्या कारखान्याची त्यांनी स्वत: उभारणी केली.

त्रिनिदाद-टोबॅगो येथे मात्र नव्याने कारखान्याची उभारणी न करता नुकसानीत चालू असलेला कारखाना चालवायला घेऊन तो नफ्यात आणून दाखवला, आणि नंतर तो विकत घेऊन टाकला.

कामगारांना प्रशिक्षण, उत्पादनात वाढ, तंत्रज्ञानातील नावीन्य, उत्तम व्यवस्थापन याद्वारे डबघाईला आलेल्या कारखान्यांना उर्जितावस्थेला आणण्याची सिद्धीच जणू लक्ष्मी मित्तल यांना गवसली. या सिद्धीचा वापर करून पुढच्या दशकात लक्ष्मी मित्तल यांनी पोलाद उत्पादनात अग्रगण्य स्थान पटकावले.

मोटारी, विद्युत उपकरणे, गॅस व पेट्रोलचे पाइप वगैरेंच्या निर्मितीसाठी लागणारी उत्पादने बनविणाऱ्या मेक्सिको सरकारच्या मालकीच्या लाझरो कार्डेनास येथील अत्याधुनिक पोलाद कारखान्याचाही सौदा लक्ष्मी मित्तल यांनी १९९० मध्ये केला. ७० हजार टनाचे उत्पादन त्यांनी वर्षात २ लाख टनांवर नेले.

कॅनडातील सिडबेक-डॉस्को कारखाना १९९४ साली ताब्यात घेतला. जर्मनीतील

हॅम्बर्गर स्टीलवर्क हा कारखाना १९९५ मध्ये हस्तगत केला. त्यावेळी घरच्या लोकांना त्यांनी पूर्वकल्पनाही दिली नाही.

लक्ष्मी मित्तल यांच्या या झपाट्याने त्यांच्या भारतात राहणाऱ्या भावंडांना चक्रावून सोडले. वेगवेगळ्या देशात एका पाठोपाठ एक कारखाने विकत घेणे, त्यात गुंतवणूक करणे, कर्जाचे डोंगर उभे करणे हे अंगलट येणार नाही ना असे भय त्यांना वाटू लागले. तेव्हा लक्ष्मी मित्तल यांनी वेगळे होण्याचा प्रस्ताव मांडला. खूप वादावादी झाली. आंतरराष्ट्रीय पातळीवरचे सर्व व्यवहार लक्ष्मी मित्तल यांनी आपल्या ताब्यात घेतले. भारतातील व्यवहार विनोद आणि प्रमोद या दोघा भावांमध्ये विभागले गेले. त्यानंतरही लक्ष्मीनिवास मित्तल यांची घोडदौड वेगाने होत राहिली.

१९९५ मध्ये कझागिस्तानातील टिमीरटाऊ गावातील कारमेल स्टील वर्क्स या बाराशे एकराचा परिसर व्यापणाऱ्या कारखान्याकडे लक्ष्मी मित्तल यांचे लक्ष गेले. या कारखान्याच्या क्षेत्रात दीड अब्ज टन कोळसा, पावणे दोन अब्ज टन लोखंड आणि ४३५ मेगावॅटचे औष्णिक विद्युतकेंद्र होते. तीन प्रचंड क्षमतेच्या भट्ट्या, हॉट अँड कोल्ड रोलिंग मिल्स, लोखंडाला आकार देणारी अवाढव्य यंत्रे यामुळे त्या कारखान्याची उत्पादनक्षमता प्रचंड होती. याच कारखान्यात धातुशास्त्रज्ञ म्हणून काम करणारा नझरबायेव्ह आता कझागिस्तानचा राष्ट्राध्यक्ष होता. त्याने या कारखान्याच्या खाजगीकरणाचा निर्णय घेतला होता. लक्ष्मी मित्तल यांनी त्याच्याशी वाटाघाटी करून ४० कोटी डॉलर्सला सौदा ठरवला. दहा वर्षांसाठी करसवलती मान्य करून घेतल्या. अडीच लाख लोक या कारखान्यावर उदरनिर्वाहासाठी अवलंबून होते. त्यांना मित्तलनी ९ लाख डॉलर्स थकबाकीपोटी दिले. २७ हजार लोकांचे रोजगार शाबूत ठेवण्यासाठी मित्तलनी स्थानिक ट्राम आणि रेल्वे, टीव्ही स्टेशन, कोळशाच्या आणि लोखंडाच्या खाणीही विकत घेतल्या. पोलाद प्रकल्प चालवण्यासाठी संपूर्ण शहरच विकत घेण्याचा हा प्रकार होता. पहिल्याच वर्षात अडीच लाख टन पोलादाचे उत्पादन झाले. कझागिस्तान आणि इंडोनेशियातील प्रकल्प एलएनएम होर्डिंग्ज या कंपनीत टाकले तर त्रिनिदाद, मेक्सिको, कॅनडा प्रकल्प इस्पात इंटरनॅशनल या नेदरलँडसमध्ये रजिस्टर झालेल्या कंपनीत समाविष्ट केले. आपले कुटुंब इंडोनेशियातून लंडनला आणले. ब्रिटनचा रहिवासी नसलेल्या पण ब्रिटनमध्ये वास्तव्य करणाऱ्यांना देशाबाहेर झालेल्या उत्पन्नावर कर भरावा लागत नाही. त्यामुळे मित्तल यांची संपत्ती वाढत राहिली.

१९९५ मध्ये मित्तल यांच्या प्रकल्पांचे उत्पादन प्रतिवर्षी १२० लक्ष टन होऊ लागले. निप्पॉन स्टील ही जपानी कंपनी २७० लक्ष पोलादाचे उत्पादन करीत असे. मित्तल यांनी आपले उत्पादन २०० लक्ष टनापर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवले.

१९९७ साली इस्पातने न्यूयॉर्क, ॲमस्टरडॅम शेअर बाजारात ७८ कोटी

डॉलर्सचे शेअर्स विक्रीसाठी आणले. मित्तल समूहाचे उत्पन्न अडीच अब्ज डॉलर्स झाले. १४ कोटी डॉलर्सचा फायदा झाला.

१९९८ मध्ये न्यूयॉर्कला पोलाद उत्पादकांच्या परिषदेत भाषण करताना लक्ष्मीनिवास मित्तल यांनी म्हटले, ''या उद्योगात स्थानिक पातळीवरच्या लहान उपक्रमांची संख्या मोठी आहे. अनेक ठिकाणी सरकारतर्फेच हे उपक्रम चालवले जातात. जागतिकीकरणाच्या या काळात हा उद्योग अनावश्यक चढउताराच्या चक्रापासून वाचवायचा असेल तर सरकारची मालकी आणि स्थनिक छोटे उपक्रम यांची पुनर्रचना करण्याची गरज आहे.''

मित्तल यांचे हे विचार अनेक प्रतिनिधींना आवडले नाहीत. परंतु त्यानंतर वर्षाच्या आतच पोलादाचे भाव गडगडले आणि अमेरिकेतल्या एक तृतीयांश पोलाद उत्पादकांनी दिवाळखोरी जाहीर केली. लहान कंपन्या ताब्यात घेऊन मोजक्याच कंपन्या मैदानात उतरल्या तर पोलादाचे भाव ठरविण्याचे स्वातंत्र्य आपल्याला मिळेल हे मित्तल यांचे मत मोठ्या कंपन्यांना त्यामुळे पटू लागले. लक्ष्मीनिवास मित्तल यांनी छोट्या कंपन्या ताब्यात घेण्याची आपली मोहीम चालूच ठेवली. व्हेनिझुएला सरकारच्या ताब्यातील सीडोर स्टीलवर्क २ अब्ज डॉलर्सना घेण्याची बोली लावली पण स्थानिक लोकांनी ती २.४० अब्जपर्यंत वाढवून मित्तलना मागे टाकले. व्हेनिझुएलाची कंपनी हातातून गेली. आपले फोन टॅप होत आहेत हे मित्तल यांच्या लक्षात आले.

शिकागोतील इनलँड स्टील ही कंपनी बॉब डार्नेल याच्या एकट्याच्या मालकीची होती. मित्तलनी त्याला फोनवरच १.४ अब्ज डॉलर्सची ऑफर देऊन सौदा पक्क केला, परंतु पोलादाच्या भावात घसरगुंडी झाल्याने इस्पात इंटरनॅशनलच्या शेअर्सचा भाव ९ डॉलर्सपासून दोन डॉलर्सपर्यंत खाली आला. पोलाद क्षेत्रातील मंदीचा प्रभाव इ. स. २००० ते २००२ या काळात चांगलाच जाणवला. पोलाद कारखान्यांच्या किमतीही घसरल्या. ही संधी मानून मित्तल यांनी अल्जीरिया, पोलंड, रुमानिया, मॅसिडोनिया, झेक रिपब्लिक, दक्षिण आफ्रिका, फ्रान्स येथील प्रकल्प ताब्यात घेतले.

हे प्रकल्प ताब्यात घेताना मित्तल यांनी त्या त्या देशातील राज्यकर्त्यांना कौशल्याने हाताळले हे नक्की!

इंग्लंडचे पंतप्रधान टोनी ब्लेअर यांच्या लेबर पार्टीला २००१ मध्ये सव्वा लाख पौंडांची देणगी दिली. २००५ साली वीस लाख पौंडाची देणगी दिली.

कझागिस्तान आणि पोलंड येथील राजकीय नेतृत्व आणि मध्यस्थ यांची मदत त्यांनी घेतली. राष्ट्राध्यक्ष नझरबायेव्हची भेट घडवून आणण्यासाठी मित्तलनी १० कोटी डॉलर्सची लाच पॅटाख चोडिव्ह याला दिली असे म्हटले जाते.

मित्तल यांच्या कार्यपद्धती काही लोकांना आक्षेपार्ह वाटत. पण मित्तल त्यामुळे विचलित होत नसत. पोलाद उद्योगावर पकड बसविण्याच्या एकाच ध्येयाने त्यांना

झपाटलेले होते. आजारी उद्योग ताब्यात घेऊन फायद्यात आणण्याचे कौशल्य त्यांच्यात होते. दहा कोटी डॉलर्सना घेतलेला झेक नोव्हा इट कारखाना चार वर्षात दोन अब्ज डॉलर्सच्या घरात गणला जात होता.

चार खंडांमध्ये आणि १४ देशांमध्ये मित्तल यांच्या पोलाद कारखान्यातून ४० लाख टन पोलादाचे उत्पादन होत होते. चीनची वाढती मागणी पूर्ण करण्यात त्याला अडचण येत नव्हती.

अमेरिकेतील विल्बर रॉस या ज्यू गृहस्थाने अनेक आजारी पोलाद कारखाने घेऊन इंटरनॅशनल स्टील ग्रुप (आयएसजी) हा मोठा समूह निर्माण केला. अमेरिकेत आपले भरभक्कम अस्तित्व दाखवण्यासाठी मित्तल उत्सुक होते. त्यांनी रॉसला साडेचार अब्ज डॉलर्स देऊन इंटरनॅशनल स्टील ग्रुपवर कब्जा मिळवला. बिल्वर रॉसलाच त्यांनी संचालक नेमले. इस्पात स्टील, आयएसजी आणि एलएनएम या तीन संस्थांचे विलीनीकरण करून मित्तल स्टील्स् असे नवे नामकरण केले.

अवघ्या २० वर्षांत लक्ष्मी मित्तल यांनी २७.७ अब्ज डॉलर्सची संपत्ती प्राप्त केली होती. जगातील सर्वांत जास्त श्रीमंत व्यक्तींमध्ये चौथ्या क्रमांकावर मित्तल यांचे नाव घेतले जाऊ लागले. बिल गेट्स, वॉरन बफे आणि इंग्वार कॅम्पार्ड (आयकिया) हे पहिले तिघेजण.

सर्वाधिक पोलादाचे उत्पादन करणारी आर्सेलर ही कंपनी विकत घेण्याचे मित्तल यांना वेध लागले. ती कंपनी विकत घेण्यासाठी मित्तल स्टीलला आकाशपाताळ एक करावे लागले. जानेवारी ते ऑक्टोबर २००६ दरम्यान त्यासाठी वाटाघाटींचे आणि डाव-प्रतिडावाचे युद्ध चालू होते. त्या दरम्यान घडलेल्या घटनांची तारीखवार पुनर्मांडणी करणारी थरारकथाच 'कोल्ड स्टील'मध्ये तपशीलवार नोंदवण्यात आली आहे.

**'आर्सेलर'वर ताबा मिळवण्याची** ही जी मोहीम राबवली गेली, तिच्याशी संबंधित व्यक्ती, संस्था, बँकर्स, देश, माध्यमे यांच्यातील परस्पर संबंध, कायदेशीर आणि घटनात्मक शह-प्रतिशह, विरोधकांची व्यूहरचना या सर्वांची नोंद घेऊन, आर्सेलर मित्तल स्टील यांच्या विलीनीकरणाची वस्तुनिष्ठ कहाणी सांगणारे पुस्तक तयार करण्याची कल्पना फेब्रुवारी २००६ मध्ये मित्तल यांच्या मनात घोळू लागली. त्यासाठी संभाव्य लेखकांचा शोध सुरू झाला. हा शोध घेणे सुकर व्हावे म्हणून वेस्ट डीन कॉलेजमध्ये इच्छुक लेखकांसाठी एक कार्यशाळा घेण्यात आली. पत्रकार टीम बुके आणि वित्तीय जनसंपर्क सल्लागार बायरन उसी या दोघांनीही मित्तल यांच्याविषयी टेलिग्राफ मॅगेझिनसाठी लेख लिहिण्याचे ठरवले. लक्ष्मीनिवास मित्तल, त्यांचा विशीतला मुलगा आदित्य, त्यांचे सल्लागार अधिकारी यांच्या मुलाखती त्यांनी घेतल्या... पुस्तक लिहिण्यासाठी त्यांनी माहितीची जमवाजमव सुरू केली. मित्तल आणि आर्सेलर यांच्यामध्ये हस्तांतरणासाठी झालेली लढाई (फाइट) ही एक

अभूतपूर्व, अद्वितीय घटना होती. पराकोटीची आक्रमकता, कमालीची गुंतागुंत, व्यवहाराचा प्रचंड आवाका यामुळे अशी लढाई आपल्याला पुन्हा आयुष्यात बघायला मिळणार नाही अशी सर्वच संबंधित घटकांची भावना होती.

टीम ब्रुके आणि बायरन उसी या दोघांनी जुलै-ऑगस्ट २००६मध्ये पन्नासावर लोकांच्या सविस्तर मुलाखती घेतल्या. त्यासाठी लंडन, लक्सेंबर्ग, पॅरिस, मिलान, ब्रुसेल्स, बेल्जियम येथे त्यांना जावे लागले. फोनवरूनही अनेकांशी संपर्क साधावा लागला. तारीखवार या लढाईतील एकेका चकमकीचे वर्णन करताना एखाद्या थरार कथेसारखे स्वरूप या लेखनाला येत गेले. जागतिकीकरणामुळे पोलाद उद्योगात आमूलाग्र क्रांती घडून आली, त्याची कार्यपद्धती बदलली, युरोपच्या भूमीवर खऱ्या अर्थाने भागीदारांची लोकशाही प्रस्थापित झाली. सहा अब्जाधीश, वित्तसंस्था, शेकडो कायदेपंडित, सात देश, त्यांचे राष्ट्राध्यक्ष, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे व्यवस्थापन तज्ज्ञ व सल्लागार, गुप्तहेर आणि मध्यस्थ यांच्या माध्यमातून घडलेली ही हस्तांतरणाची जागतिक लढाई- औद्योगिक क्षेत्राला नवी स्पर्धात्मक दिशा देणारी ठरली.

जागतिकीकरणानंतर पोलाद उद्योगाचे संपूर्ण स्वरूप पालटणार आहे हे लक्ष्मी मित्तल यांनी १९९१मध्ये जाणले आणि भारतातच छोट्या कारखान्याच्या व्यवस्थापनात गुंतून न राहता, वेगवेगळ्या देशात या उद्योगाचा विस्तार होण्याची अपरिहार्य गरज लक्षात घेऊन आजारी कारखाने ताब्यात घेऊन लक्ष्मी मित्तल यांनी ते नफ्यात आणून दाखवले आणि जगातील सर्वांत मोठा पोलाद उत्पादक म्हणून स्थान पटकावले हे सर्व विलक्षण रोमहर्षक आहे. टिम बुके आणि बायरॉन उसी या दोघांनी भरपूर परिश्रम घेऊन या लढ्याचे सर्वांगीण चित्रण केले आहे. स्वत:ला श्रेष्ठ समजणाऱ्या आणि भारतीयांना तुच्छ मानणाऱ्या पाश्चात्य कारखानदारांना आणि सत्ताधीशांना लक्ष्मी मित्तल यांनी ज्या कौशल्याने हाताळले, ते कौशल्य अवर्णनीयच म्हणायला हवे. लक्ष्मी मित्तल यांची ही यशोगाथा प्रत्येक भारतीयाला आपल्या अस्मितेची नव्याने जाणीव करून देईल.

**किंमत : ३००रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : ३०रु.**

आमच्या प्रिय वाचकांनी, तसेच सभासदांनी वर्गणीचे नूतनीकरण करावे. ही नम्र विनंती.

# पुस्तक परिचय

**आपल्या खऱ्या इतिहासाचा आपल्याला**
**विसर पडला आहे का?**
**भैरप्पांनी उभा केलेला प्रश्न**

# आवरण




**डॉ.एस.एल. भैरप्पा** अनु. उमा कुलकर्णी

'आवरण' या भैरप्पांच्या कादंबरीच्या कानडीत अवघ्या दोन वर्षात २२आवृत्या निघाल्या आणि तिच्यातील विषयाची चर्चा करणारी दहाबारा पुस्तकेही बाजारात आली.

या कादंबरीने एवढा गदारोळ का माजला असावा असा प्रश्न कोणाही वाचकाला पडेल. ही कादंबरी ऐतिहासिक आहे असे भैरप्पा म्हणतात. तिच्यातली पात्रे आणि घटना समकालीन आहेत, परंतु तिच्यातील घटनांची पार्श्वभूमी इतिहासकालीन आहे. मुस्लीम राज्यकर्त्यांनी भारतातील हिंदू धर्मीयांवर इ.स. बाराव्या शतकापासून जे अत्याचार केले त्यांचे वास्तव स्वरूप अभ्यास- संशोधनातून भैरप्पांना जाणवले आणि या वस्तुस्थितीकडे सोयीस्कर दुर्लक्ष करून, त्याचे विस्मरण घडल्याप्रमाणे अकबर, टिपू सुलतान प्रभृतींच्या तथाकथित धर्मनिरपेक्षतेचे गुणगान गाण्यात आपले बहुसंख्य लोक धन्यता मानत आहेत, असे भैरप्पा स्पष्ट करू पाहतात. साहित्यकाराची अंतिम निष्ठा सत्याचा शोध हीच असली पाहिजे, ऐतिहासिक विषयावर कलानिर्मिती करताना प्रत्येक तपशील संशोधन-सिद्ध असला पाहिजे, सत्याकडून सोयीनुसार उचलेगिरी करून 'मी केवळ एक कलानिर्माता आहे' म्हणून जबाबदारी झटकून देता कामा नये अशी भैरप्पांची ठाम धारणा आहे. ''आपल्या पूर्वजांच्या कुठल्या कार्याचा तिरस्कार करायचा आणि कुठल्या कर्तृत्वापासून स्फूर्ती घ्यायची याचं तारतम्य जोपर्यंत आपण ठेवणार नाही तोपर्यंत आपण प्रौढ वा प्रगल्भ होणार नाही. इतिहासाकडून प्रेरणा घेणे जसे आवश्यक तसेच इतिहासातील अनिष्ट प्रवृत्तींपासून दूर राहणे हेही परिपक्वतेचे द्योतक आहे'' असे भैरप्पांचे प्रतिपादन आहे.

भैरप्पांनी या आधी लिहिलेल्या 'सार्थ' (साक्षी) या आपल्या पहिल्या ऐतिहासिक कादंबरीमध्ये सत्य-असत्याची समस्या वैयक्तिक पातळीवरून मांडली होती. ''प्रभू, खोट्याचं मूळ कुठलं? खोट्याला नाश नाही का?'' असा प्रश्न उपस्थित करून ही कादंबरी थांबली होती. परंतु या प्रश्नाने कादंबरीचा शेवट झाला असला तरी सत्य-असत्याचा प्रश्न भैरप्पांच्या मनात तसाच रेंगाळत राहिला. तोच प्रश्न समूह पातळीवर आणि राष्ट्राच्या पातळीवर उभा करणारी 'आवरण' ही कादंबरी आहे अशी त्यांची भावना आहे. 'साक्षी'मध्ये आठव्या शतकातला संधिकाल आला आहे, 'आवरण'मध्ये त्यानंतरचा काळ आला आहे. 'सार्थ'मधील कालखंड 'आवरण शक्ती'पासून मुक्त आहे, परंतु 'आवरण'मधील प्रत्येक टप्पा आवरण शक्तीला छेद देऊन पुढे जात आहे असे भैरप्पांना वाटते आहे.

''आपण त्यांचे वारसदार'' असे पूर्वपरंपरेचे ओझे डोईवर ठेवून आपण मागच्यांशी नाते जोडत असू तर पूर्वजांनी केलेल्या कर्माची जबाबदारी आपल्याला स्वीकारावी लागेल.

मागे कुणीतरी केलेल्या चुकांसाठी आजचे कोणी जबाबदार नाही असे मानायला

हवे, असे भैरप्पांचे म्हणणे आहे.

पुण्याच्या फिल्म इन्स्टिट्युटमध्ये कर्नाटकातून आलेल्या आमिरची आणि लक्ष्मीची ओळख होते. तारुण्यसुलभ आकर्षण वाढते. दोघेही समवयस्क. चित्रपट पाहताना, त्याचं तंत्र शिकताना त्यांची जवळीक होते. फर्ग्युसन कॉलेजमागच्या टेकडीवरच्या कातळावर एकमेकांना खेटून बसताना रोमांच फुलतात. ''तू मेरा चांद मै तेरी चांदनी'' सारखी गीते ओठावर येतात. ''लक्ष्मी, मनं जुळल्यावर देहांना जबरदस्तीनं दूर ठेवण्यात किती वेदना आहे.'' असे आमिर म्हणतो तेव्हा त्याच्या या भावनेला नकार देणे लक्ष्मीला कसे जमणार?

आमिर हा मुस्लीम आहे, आपण हिंदू, आपल्या दोघांमध्ये धर्माची एवढी मोठी दरी आहे ही जाणीवही त्यावेळी तीव्र नव्हती. शरीर अर्पण केले की लग्न अपरिहार्य असे मानण्याचा तो काळ... त्यामुळे जेव्हा तिने आपल्या लग्नाचा विषय वडिलांकडे काढला तेव्हा ते म्हणाले, ''त्याचंही तुझ्यावर एवढंच प्रेम असेल तर त्याला धर्म बदलू दे. नाव बदलू दे. मी स्वत: लग्न लावून देईन.'' पण आठ बहिणींचा एकमेव भाऊ असणारा आमिर तिला म्हणतो, ''नवऱ्याच्या धर्माचं आचरण बायकोनं करणं हा जगाचा परिपाठ आहे... आमच्या धर्मातले पुरुष असोत वा स्त्री, कुठल्याही कारणानं समाजाबाहेर जाऊ लागले तर आमचा समाज ते सहन करीत नाही. जातीबाहेर जाणाऱ्यांना ते ठार करतात... खरं तर धर्मावर माझा विश्वास नाही. तुझाही नाही. आपण आधुनिक विचारसरणीचे आहोत. धर्म किंवा नाव बदलणं हा केवळ एक उपचार आहे. समाजात परिवर्तन होऊन गरिबांसाठी अफूची गोळी बनलेला धर्म एक दिवस समूळ नष्ट होईल. तोपर्यंतची ही सोय म्हणू या.''

तिचे वडील अप्पागौडा गांधीवादी. सामाजिक कार्य करणारे. सच्छील. शाकाहारी. सात्विक. ग्रामसेवक. लक्ष्मी तीन वर्षांची असताना मातृसुखाला पारखी झालेली. पण अप्पांनी पुन्हा लग्न न करता तिचा सांभाळ केला. गावातील देवळे, विहिरी, हॉटेले हरिजनांसाठी खुली करणारे. परस्परातील भांडणे पंचायत भरवून मिटवणारे अप्पाजी. त्यांनी तिला कठोरपणे सांगितले, ''धर्मांतर करून तू जाणार असशील तर याच जन्मी नव्हे तर पुढच्याही जन्मी आपला कसलाही संबंध राहणार नाही.''

इस्लामचा स्वीकार करून लक्ष्मी आमिरशी निकाह करते. 'रझिया कुरेशी' बनते. ती स्क्रिप्ट रायटर, चित्रपटकथाकार. आमिर दिग्दर्शक. त्यांची जोडी गाजू लागते. या दोघांची वेव्हलेंग्थ चांगली जुळते. तशात रझिया गरोदर राहते. माहेरची तिला आठवण येते. पण ती वडिलांना भेटत नाही. मुलगा झाल्याची बातमी प्रा. शास्त्री आप्पांच्या कानावर घालतात पण अप्पाजी त्यावर काही प्रतिक्रिया देत नाहीत. ''अजून तुम्ही जातींवर विश्वास ठेवता? धर्मापेक्षा मानवी अंत:करण महत्त्वाचं मानायला नको का?'' असं प्रा. शास्त्री सुनावतात तेव्हा अप्पाजी उत्तर देतात,

''नारायण, नारदासारखं लावालावी करण्याचं काम सोडून दे.'' हे शास्त्रींकडून ऐकल्यावर लक्ष्मी अप्पांच्या बाबतीत कठोर होते. अप्पांच्या धर्माविषयी तिचा तिटकारा जागा होतो. आपल्याच पूर्वाश्रमीच्या धर्माविषयी द्वेषभावना उफाळून येते. ''अहिंसेला विरोध म्हणून मांसाहाराचा त्याग करून शुद्ध शाकाहारी बनलेल्या अप्पांच्या मनातली मानवता ज्यानं निपटून काढली, तो धर्म किती वाईट?'' असा विचार तिच्या मनात येतो. त्यानंतर सभासंमेलनात, वृत्तपत्रलेखनात ती हिंदू धर्मावर टीका करू लागते.

''हिंदू धर्माइतका निष्ठुर धर्म दुसरा नाही.''

''स्त्रिया आणि दलित यांच्यावर अपरिमित अत्याचार करणारा धर्म.''

''सामाजिक समानतेचा कट्टर शत्रू... सामाजिक विषमतेचा प्रच्छन्न पुरस्कार करणारा एवढा दुष्ट धर्म जगात कुठलाही नाही म्हणून मी त्या धर्माचा त्याग केला. आधुनिक समतावाद चौदाशे वर्षांपूर्वी सांगणारा आणि जगभर पसरत असलेला धर्म स्वीकारला.'' अशा तिच्या वक्तव्यांना वृत्तपत्रे चांगली प्रसिद्धी देऊ लागली. तिची भाषणे सविस्तर छापू लागली. तिला सभासंमेलनांना बोलवू लागली. एक आयकॉन, हिरॉईन म्हणून तिची प्रतिमा जनमानसात रुजू लागली. तिच्या सासू-सासऱ्यांनाही ती प्रिय झाली. त्यांना खूष करण्यासाठी रझिया पाच वेळा नमाज पढू लागली. मांसाहारही करू लागली. तरीही सासरी तिला पूर्णपणे स्वीकारले गेले नाही. ती गोषा पाळत नव्हती. परपुरुषांशी बोलत होती. घराबाहेर पडत होती. चित्रपटात काम करत होती. ''ते पुरुषी काम सोडून दे. मुस्लीम बाईनं मुस्लीम बाईसारखं राहण्यातच मान आहे. तरच अल्लाहचं प्रेम राहील.'' असा सासूचा उपदेश चालू राहिला. ''माझा मुलगा देखणा आहे. सिनेमाचा डायरेक्टर आहे. त्याच्या प्रेमात पडून आलेल्या या बयेला आमच्या घरचे रिवाज कसे पटतील? मूळ मुस्लीम मुलीशी आमिरनं लग्न केलं असतं तर मला अशी दुरुत्तरे ऐकावी लागली नसती.'' असे सासू तिला ऐकवत राही.

वेगळे घर करावे असे रझिया आमिरला सुचवले. पण त्याचे म्हणणे, ''तू जमवून घे. टॅक्टफुली वागत जा. घरी काळा गाऊन घालत जा.''

तिच्या घरी आलेले तब्लिख तिला, ''तू कुंकू लावतेस. तू चुकीचं उर्दू बोलतेस, ते गोमांस खात नाहीस... तू तुझ्या काफीर धर्माची मूळं पूर्णपणे कापून टाकली नाहीस,'' म्हणून फैलावर घेऊ लागले. ती त्यांच्याशी वाद घालू लागली तर ते तिच्या सासऱ्यांना धमकावू लागले, ''तुमच्या सुनेला तुम्ही वठणीवर आणा. नाहीतर तुमच्यावर बहिष्कार टाकू. कुणी तुमच्या घरी येणार नाही... तुमच्या मुलींची लग्नं होणार नाहीत. तुमच्या मुलाला आम्हाला भेटायला सांगा.''

सासूसासरे तिच्याशी बोलणे बंद करतात.

ती नवऱ्याला म्हणते, ''आपण भाड्याचं घर घेऊ या.''

आमिर हा त्या घरातला एकुलता एक मुलगा. तो घर सोडायला तयार नाही. ''तू हवं तर एकटी जा. मी येणार नाही.'' तो तिच्यावर हात उगारतो, ''तुझ्यासारखीला तलाक देणं हाच एक मार्ग आहे. तुला तलाक देतोय. तुला तलाक देतोय. तुला तलाक देतोय.'' आणि तो ताडताड निघून जातो.

रात्री तो तिला सांगतो, ''अशी कटकट करीत एकत्र राहण्यापेक्षा वेगवेगळे राहणे चांगले. पहिला तलाक सांगितलाय. आणखी दोन शिल्लक आहेत. या अवधीत एकमेकांजवळ येऊ नये असे शास्त्र आहे. एकत्र राहूनही जुळत नाही हे सिद्ध करण्यासाठी या बेडवर झोपतो.''

...लक्ष्मी हे सर्व आपले हितचिंतक प्रा. शास्त्री यांना सांगते. सल्ला विचारते. प्रा. शास्त्री यांनीच तिला आमिरशी निकाह करण्यासाठी पाठबळ दिले होते. त्यावेळी ते तिला म्हणाले होते, ''लक्ष्मी, तू क्रांतीच्या मार्गावर टाकलेलं पाऊल मागं घेऊ नकोस. आंतरजातीय लग्नापेक्षा आंतरधर्मीय लग्न अधिक क्रांतिकारक आहे. मुस्लीम समाजातील पारंपरिकता तोडायला हवी. तुझ्यासारखी तरुणी मुस्लीम होऊन त्यात शिरली तर वाळवीनं पोखरलेल्या वृक्षाला भुईसपाट करावं तसं होईल. क्रांती सगळीकडून पसरली पाहिजे.'' (२२) प्रा. शास्त्री धर्मबदलाच्या दृष्टीने तिची मानसिकता दृढ करीत राहतात.

इस्लाम धर्माचीही प्रा. शास्त्री प्रशंसा करतात.

''इतर कितीही दोष असले तरी इस्लाममध्ये साम्यवाद आहे. धार्मिक पातळीवर साम्यवादाची क्रांती व्हायची असेल तर ती इस्लामच्या रंगमंचावरच होईल. बुरसटलेल्या हिंदू धर्मात नाही.''

प्रा. शास्त्री यांनी आमिरलाही समजावत राहतात. ''अरे, ती मुस्लीम होत आहे ती आजच्या सामाजिक संदर्भात. तिच्या कुठल्याही स्वातंत्र्यावर आक्षेप घेऊ नकोस. तुम्ही दोघेही कलावंत. चित्रपट क्षेत्रात करीयर करणारे. पारंपरिक जनानामध्ये ती राहिली तर ते कसे जमेल?''

हे सर्व आमिरलाही आठवत असते. दोघेही स्वतंत्रपणे पुन्हा प्रा. शास्त्री यांना भेटतात.

आमिरला ते सांगतात, ''लग्नानंतर आईवडिलांजवळ राहणं ही बूर्ज्वा पद्धत आहे. आपल्या जबाबदारीवर आपला संसार करणं ही आधुनिकता आहे. सिनेमाशी संबंधित एखाद्या मुस्लीम मुलीशी तू लग्न केले असतेस तरी तुझ्या आईवडिलांशी तेढ आलीच असती... आमच्या मुलीला तू तलाक दिलास तर प्रसारमाध्यमे तुझ्यावर झोड उठवतील. हिंदू मुलीला भुरळ पाडून लग्न केले आणि नंतर तिला गटारात फेकून दिले अशी बातमी आली तर लोक तुझ्या सिनेमावर बहिष्कार टाकतील.

प्रोड्युसर तुला दूर ठेवतील. पुरोगामी मंडळी मोर्चे काढतील. तुझ्यासारखी प्रसिद्ध व्यक्ती असे वागली तर आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या तरुणांचा उत्साह नष्ट होईल. अरे, थोडी सामाजिक जाणीव ठेव.''

त्यामुळे आमिर स्वतंत्र फ्लॅट घेऊन आपले बिऱ्हाड तेथे हलवतो. आपले घर आणि हा फ्लॅट यात सोयीनुसार त्याचा वावर असतो. दोघांचे जीवन स्वतंत्रपणे चालू राहते. आमिर एका मुस्लीम शिक्षिकेशी लग्न करून आणखी एक बिऱ्हाड थाटतो.

हंपी, विजयनगर वगैरे स्थळांवर लघुपट बनवण्याचे काम इंडियन हेरिटेजच्या वतीने आमिरला मिळते. त्यासाठी पटकथा लिहिण्याचे काम रझिया स्वत:कडे घेते. पण त्याबद्दल ती जेव्हा वाचन करू लागते तेव्हा मुस्लीम राजांनी तेथील मूर्तींची मोडतोड केली आहे, देवळे पाडून मशिदी बांधल्या, मोठ्या प्रमाणावर सक्तीने हिंदूंना धर्मांतर करणे भाग पाडले वगैरे तपशील तिला कळतात. त्यामुळे पटकथा लिहिणे तिला अवघड वाटते. ते काम मग दुसऱ्या लेखकाकडे जाते.

राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यासाठी पुढे 'राष्ट्रनायक टिपू सुलतान' आणि 'महान सर्वधर्मवादी अकबर' अशी दोन नाटके लिहून सादर करण्याचे काम आमिरला मिळते. कर्नाटक कॉलेजमधील कलावंत मुलामुलींकडून ती नाटके बसवून घेण्याचे ठरते. निधीचा तोटा नसतो.

या नाटकांची संहिता तयार करण्यासाठी रझिया संदर्भांची जमवाजमव करू लागते.

तिला तिच्या वडिलांच्या, अप्पाजींच्या संग्रहातल्या पुस्तकांतून, अप्पाजींनी लिहिलेल्या टिपणांतून टिपू सुलतान, सम्राट अकबर यांच्या धर्मांधतेची अनेक उदाहरणे आढळून येतात. टिपूला राष्ट्रनायक ठरवणे, ब्रिटिशांविरुद्ध त्याने दिलेल्या लढ्याचे गुणगान करताना त्याला कर्नाटक कुंवर म्हणणे, आधुनिकीकरणाचे त्याला श्रेय देणे, त्याला धर्मसहिष्णू म्हणणे या सर्व गोष्टी अज्ञानमूलक आणि अकारण उदात्तीकरण करणाऱ्या आहेत, सत्याचा विपर्यास करणाऱ्या आहेत असे तिला वाटते.

टिपूने मलबार आणि कोडगू येथील हिंदूंचे जबरदस्तीने धर्मांतर घडवून आणले. येथील गावांची नावे बदलली. देवळांच्या मिशिदी केल्या. अफगाणचा राजा जमानशाह आणि तुर्कस्थानचा खलिफा यांना हिंदुस्थानावर आक्रमण करा आणि संपूर्ण देश इस्लाममय करा असे पत्र टिपूने लिहिले होते, म्हैसूरचा राजवाडा लुटून (१७९६) तेथील अमूल्य ग्रंथ आणि ताडपत्रावरील हस्तलिखिते जळण म्हणून वापरण्याची त्याने आज्ञा केली. म्हैसूरमध्ये उर्दूला राजभाषा बनवून तिचा प्रसार केला. मलबारचे मुलसमान मल्याळम भाषा बोलतात. तामिळनाडूचे मुसलमान तमीळ बोलतात पण म्हैसूरचे मुसलमान आजही कन्नडऐवजी उर्दूच बोलण्याचा आग्रह धरतात. हिंदू

सेनाधिकाऱ्यांना पकडून त्यांचे धर्मांतर करा अशा सूचना देणारे फतवे टिपूने काढले. हिंदूंचा उल्लेख तो काफीर म्हणूनच करतो. त्याच्या हस्ताक्षरातील दैनंदिनी लंडनमधील इंडिया ऑफिसमध्ये आहे. तिच्यातील नोंदींवरून तो किती धर्मांध होता हे लक्षात येते. (५०-५४) अशा माणसाचे राष्ट्रवीर म्हणून चित्रण करणे आपल्याला शक्य नाही असे ती आमिरला कळवते.

तिने आमिरशी लग्न करून मुस्लीमधर्म स्वीकारला ही गोष्ट अप्पाजींना जिव्हारी लागली होती. त्यांनी समाजकार्य थांबवून इस्लामधर्मविषयक व इतिहासविषयक पुस्तकांच्या अभ्यासाला वाहून घेतले. त्या ग्रंथांवरची टिपणे काढली. त्यांच्या मृत्यूनंतर ही सर्व पुस्तके आणि टिपणे रझियाला बघायला मिळाली आणि इतिहासातल्या सत्याचा साक्षात्कार झाला. अप्पाजींच्या संग्रहातल्या पुस्तकांच्या अभ्यासासाठी ती त्यांच्याच घरात जास्त काळ राहू लागली... अप्पाजींच्या मृत्यूनंतरचे विधी करण्यासाठीही तिने पुढाकार घेतला. इस्लामधर्माचा स्वीकार करूनही मूळ आपल्या हिंदू संस्कारांना तिने अव्हेरले नाही. त्याबद्दलचा आदर ढळू दिला नाही. अप्पाजींच्या संग्रहातील पुस्तके आणि टिपणे वाचून, इतिहासाचा बारकाईने मागोवा घेत हिंदुस्थानातील मुस्लीमधर्मीय राजांच्या धर्मांधतेचे अनेकविध संदर्भ तिला गवसतात. धर्म निरपेक्षतेचा मागमूसही तिला मुसलमानांच्या वृत्तीत वा मानसिकतेत आढळला नाही. ब्रिटिश काळात लिहिल्या गेलेल्या इतिहासात मुस्लीमांच्या इतिहासाचे सादरीकरण करताना त्यांच्या धर्मांधतेचे स्वरूप बरेचसे सौम्य दाखवले गेले. असत्य, अविद्या यांचा या इतिहासात भडीमार दिसतो. स्वार्थी, आपमतलबी पण प्रभावी शक्तींनी खरा इतिहास दडपून ठेवून खोट्या इतिहासाचा प्रचार करण्याचा, इस्लाम धर्माबद्दलचे वास्तव दडवून इस्लामचे तुष्टीकरण करण्याचा मार्ग आजवर चोखाळला आहे. सत्यावर असत्याचा हा मुलामा चढवण्याचे, काम पिढ्यानपिढ्या चालू आहे. इस्लामचे तुष्टीकरण करून भूतकाळातील त्याच्या जुलूम अत्याचाराकडे डोळेझाक करणे हे राजकीयदृष्ट्याही सोयीस्कर ठरत असावे, या अर्थाने 'आवरण' (पांघरूण घालणे) हे शीर्षक भैरप्पांनी या कादंबरीला दिले असावे.

बाबरी मशीद जमीनदोस्त केल्यानंतरच्या काळात भैरप्पांना हिंदु-मुस्लीम संबंधांच्या पूर्वकाळाचा शोध घ्यावासा वाटला. मुस्लीम मानसिकतेचा त्यांना जो अंदाज आला त्यामुळे ते अस्वस्थ झाले. राजपुतांच्या इतिहासाचे, विजयनगरच्या इतिहासाचे त्यांनी अध्ययन केले. मोगलांच्या राजवटीचा वेध घेतला.

याच कादंबरीतील काही प्रकरणांमध्ये राजपूत-मोगल यांच्यातील संघर्षाची झलक दाखवणारी एक छोटी कादंबरी भैरप्पांनी सामावून घेतली आहे. ती कादंबरी नायिका लक्ष्मी (रझिया) हिच्याच लेखणीतून उतरते आहे असे दाखवले आहे. तिचा निवेदक हा राजपूत देवगढ संस्थानचा युवराज आहे, आणि जीव वाचवण्यासाठी तो

इस्लाम धर्माचा स्वीकार करतो. त्याला गुलाम म्हणून विकण्यात येते. त्याला हिजडा करून जनानखान्यावर नेमण्यात येते. औरंगजेबाच्या क्रौर्याचे पाशवी नमुने त्याला दिसतात. काशी विश्वेश्वराच्या मंदिराचे त्याने केलेले भ्रष्टीकरण त्याला अस्वस्थ करते. (प्रकरण ६, ८, १३, १४ यात ही छोटी कादंबरी येते.)

आमिर-लक्ष्मी यांचा मुलगा नझीर अमेरिकेत जाऊन पेट्रोकेमिकलमधील एम.ई. पदवी घेतो. सौदी अरेबियात नोकरीला लागतो. चांगला पगार मिळवतो. त्याला सौदी अरेबियात इस्लामी राजवट असूनही त्याला तेथे विषमतेचा अनुभव येतो. ''तुला एखादी मुलगी भेटली नाही का? लग्न करावेसे वाटले का?'' असा प्रश्न लक्ष्मी नझीरला विचारते. तो उत्तर देतो. ''तेथील मुस्लीम स्वत:ला श्रेष्ठ मानतात. आपल्या मुली भारतीयांना देत नाहीत. तशी एखादी मुलगी तयार झाली तर तिला ठार मारतील. तेथे मेहेरही लाखात असतो. तो देण्याची ऐपत नसलेले सौदी पुरुष सीरिया - इजिप्तमधून बायका आणतात. इंडिया, पाकिस्तान, बांगलादेश यातील मुलींना घरकामासाठी आणून त्यांच्यावर बलात्कार करतात. त्यांना तिसऱ्या-चौथ्या बायकोचे स्थान देतात.''

''मग तू सौदीतच का राहतोस?''

''तेथे पगार खूप आहे. टॅक्स नाही.''

लक्ष्मी त्याला प्रा. शास्त्री यांच्या मुलीचे, अरुणाचे स्थळ सुचवते. ती एम.ए. असते. ती स्मार्ट, हुशार नव्हती पण 'ढ'ही नव्हती. तिला नोकरी मिळत नव्हती. ''तू तुझा नवरा शोध'' अशी मोकळीक तिला देऊनही तिला कोणी मुलगा सापडत नव्हता. कारण तिचे वडील प्रा. शास्त्री मार्क्सिस्ट हिंदू. आई कट्टर कॅथॅलिक. चर्चमध्ये जाणारी. धार्मिक. तिचे वाढते वय २८. नझीर तिला पाहतो. ती पसंत पडते. ''तिनं मुस्लीम धर्म स्वीकारावा. मुस्लीम रिवाजाप्रमाणे लग्न करायचं.'' असे तो म्हणतो. अरुणाची आई म्हणते, ''येशूची साथ सोडली तर नरकात जाशील.'' पण अरुणा म्हणते, ''तुझ्या येशूपेक्षा प्रेषित महंमद पैगंबर जास्त बलाढ्य आहेत. त्यांनी कितीतरी युद्धं जिंकली आहेत. एक गालावर मारले तर दुसरा गाल पुढे करण्याएवढे ते येशूसारखे नेभळट नाहीत.''

सौदीत नोकरी करणारा नझीर म्हणतो, ''मी मुस्लीम मुलीशी लग्न केलेले नाही असे कळले तर मला व्हिसा मिळणार नाही. सौदीतून माझी हकालपट्टी होईल.'' सिव्हिल मॅरेजचा आग्रह धरणारे अरुणाचे वडील प्रा. शास्त्री शेवटी हो म्हणतात. अरुणाचे धर्मांतर होते. सलमा हे नवे नाव ती धारण करते. लग्न करून हे नवदांपत्य सौदीला रवाना होते.

प्रा. शास्त्री यांचा मोठा मुलगा दिगन्त; कॉम्प्युटर तज्ज्ञ, स्टॅनफोर्डचा एम.बी.ए. त्याचे लग्न एका पंजाबी मुलीशी होते. शास्त्रींच्या आईचे निधन होते तेव्हा साम्यवादी

शास्त्री तिच्या तेराव्याला जात नाहीत. पण दिगन्त सर्व विधी यथासांग पार पाडतो.


प्रा. शास्त्री हे कर्नाटकातले विचारवंत, क्रांतिकारक. वादग्रस्त वक्ते. पद्मभूषण. ऑक्सफर्डची डॉक्टरेट. ब्रिटिश एलिझाबेथ त्यांची बायको. सत्ताधीशांना सोयीची भूमिका घेणारे चलाख युक्तिवाद करण्यात ते तरबेज. राष्ट्रीय एकात्मतेची दिल्लीत एक परिषद ते घेतात. लक्ष्मीलाही आमंत्रण देतात. खऱ्या इतिहासाचे पुरावे देत लक्ष्मी तथाकथित एकात्मतेचा ढोंगीपणा चव्हाट्यावर मांडते... त्यासाठी अनेक ग्रंथांचे पुरावे देते.

तिची मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न होतो.

... या कादंबरीत डॉ. भैरप्पा यांनी अनेक विषय आणण्याचा अट्टहास बाळगला आहे. मुस्लीम राज्यकर्त्यांचा धर्मांधपणा, मुस्लीमांची एककल्ली मानसिकता, हिंदु-मुस्लीम जीवनशैलीतील अंतर, सत्य इतिहासाचे जाणूनबुजून केले जाणारे विकृतीकरण, सर्वधर्मसमभावाच्या आणि धर्मनिरपेक्षतेच्या नावावर भारतीय बुद्धिवंतांनी चालवलेला बुद्धिभेद. धर्मांतराने निर्माण होणारे प्रश्न या सर्वांचा वेध घेण्यासाठी कादंबरीच्या मुख्य सूत्राला जोडलेली उपकथानके, (छोटेखानी कादंबरीसह) या कादंबरीला आशयघन बनवतात. तिला कर्नाटकात जी लोकप्रियता मिळाली तिचे मुख्य कारण मुस्लीम मानसिकता आणि धर्मांधपणा यांचा पर्दाफाश करण्याचा तिचा आक्रमक आवेश, अभिनिवेश हे आहे.


**किंमत : २५०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : ३०रु.**

## **सोमाली माम** द रोड ऑफ लॉस्ट इनोसन्स




**सोमाली माम** अनु. भारती पांडे

स्वत:वर झालेल्या अन्यायामुळे, अत्याचारामुळे पेटून उठलेली निर्भर, निराधार सोमाली.
फक्त स्वत:ची सुटका करून ती थांबली नाही तर भ्रष्टाचारी समाजाच्या विरोधात उभं राहून तिनं अनेक जणींची सुटका करते.
तिचं आयुष्य चटका लावणारं, त्याहून अधिक थक्क करणारं आणि मनात आशेचा स्फुल्लिंग जागवणारं आहे.




**आगामी**

# रुसी मोदी

## द मॅन हू ऑल्सो मेड स्टील

मूळ इंग्रजी लेखक

**पार्थ मुखर्जी । ज्योती सबरवाल**
अनु. **अंजनी नरवणे**

- एक अत्यंत संपन्न, अत्यंत सुसंस्कृत कुटुंब.
- मुलांचे लाड खूप व्हायचे, पण शिस्तही तितकीच कडक असायची, कपडे साधे असायचे, गरीब मुलांबरोबर खेळायला, खायलाप्यायला सूट असायची.
- असं ठासून मनावर बिंबवलं जायचं, की गरिबी, मळके कपडे यात लाजिरवाणं काहीही नाही; खोटं बोलणं, वाईट वागणं हे लाजिरवाणं आहे.
- शिक्षण इंग्लंडमध्ये हॅरो आणि ऑक्सफर्डला. बुद्धी तल्लख, पण अभ्यासाची आवड नाही. लक्ष पार्ट्या, डान्सेस, मौजमजा यांमधे इतिहास विषयात स्नातक.
- इतिहास राहिला बाजूला, नोकरीला लागले एका मोठ्या कारखान्यात रोजावर मजूर म्हणून! कष्ट करण्याची तयारी, माणसांना समजून घेणं, माणसं जोडता येणं, सर्वांशी मिळतं घेणं हे खास विशेष गुण. शिस्तीचे आग्रही. वेळ पडली तर वज्रादपि कठोराणि– एरवी मृदूनि कुसुमादपि!
- उत्तम कलांची आवड, उत्तम खाण्याची, पिण्याची, संगीताची, पाश्चिमात्त्य नृत्याची जाण व आवड. उत्तम वक्ते, भरपूर वाचन, कारकिर्दीत प्रचंड प्रगती.


........सगळंच छान? दुःख कशाचंच नाही? आहे ना! पण त्याचं प्रदर्शन नाही.

- सुंदर, गुणी मुलीशी प्रेमविवाह केला, पण चौदा वर्षांनंतर घटस्फोट झाला– तरीही तिच्याशी संबंध अजून छान!
- मुलांची खूप आवड, पण मूलबाळ नाही! '...सगळ्यांनाच सगळं कसं मिळेल?'
- नोकरीत अन्याय झाला– दुसरी कंपनी काढली!
- इतकी बहुरंगी, बहुढंगी अशी आहे तरी कोण ही विलक्षण व्यक्ती?
- ज्यांनी जमशेटपूरच्या टिस्कोमध्ये एकूण त्रेपन्न वर्षं सलग काम केलं, कंपनीची विक्री व नफा प्रचंड प्रमाणात वाढवला, ते आता नव्वदी पार केलेले, तरीही कामात व्यग्र असलेले, — **रुसी मोदी!**

# पुस्तक परिचय

**गुन्हेगारांचा तपास लावण्यामध्ये**
**विज्ञानाचा वाढता वापर**

# विज्ञान पोलीसकथा




**वृ. क. जोशी**

पोलीस कथांचे मराठीतले दालन व. कृ. जोशी यांनी तीस-पस्तीस वर्षे सातत्याने कथालेखन करून समृद्ध केले. स्वत: पोलीस खात्यात अधिकारी म्हणून ते कार्यरत होते. कोलकत्याच्या डिटेक्टिव्ह ट्रेनिंग स्कूलमध्ये प्राध्यापक होते. गुन्ह्यांची शेकडो प्रकरणे त्यांनी हाताळली. त्यामुळे त्यांच्या कथा या वास्तवाधिष्ठित असत. प्रत्यक्ष घडलेल्या घटनांतील गुंतागुंती, पेचप्रसंग यांचे नेमके संदर्भ या कथांच्या नाट्यात्मकतेला अनपेक्षिताची झणझणीत फोडणी देत असतात. कल्पनेपेक्षाही सत्य हे अधिक अद्‌भुत असते, ह्या विधानाची सत्यता त्यांच्या अनेकविध कथांमध्ये मनावर ठसते. पोलीसांचा संबंध केवळ चोर, लुटारू, दरोडेखोर, गुंड, खुनी शा गुन्हेगारांशीच येतो असे नाही; उच्चपदस्थ राजकीय नेते, राजेमहाराजे, उद्योगपती, कारखानदार, अभिनेते-अभिनेत्री, कलावंत, शास्त्रज्ञ, सरदार-जमीनदार, कामगार नेते, काळाबाजारवाले, जमिनीचे व्यवहार करणारे माफिया आणि खंडणीबहाद्दर, पांढरपेशे, वकील-डॉक्टर वगैरे विविध व्यावसायिकांशीही येत असतो. सद्य:काळात आर्थिक व्यवहार, करचुकवेगिरी, लैंगिक शोषण, कौटुंबिक अत्याचार, घटस्फोट, बलात्कार, अॅट्रॉसिटी, अपघात, दंगली, संप, आंदोलने, निदर्शने या संदर्भातील गुन्ह्यांचे प्रमाणही वाढते आहे. कायदा-सुव्यवस्थेच्या बरोबरच अशा वेगवेगळ्या समस्यांना पोलीस यंत्रणेला तोंड द्यावे लागते.

व.कृ.जोशी यांनी प्रत्यक्ष घडलेल्या घटनांचेच आधार घेऊन कथा लिहिल्या. त्या कथांतील व्यक्तींची नावे, स्थळांची नावे वगैरे बदलली असतील, परंतु मुख्य घटनांबद्दलचे तपशील बहुतांशी कायमच ठेवलेले आहेत असे त्या कथा वाचताना वाटते. या कथांमधील अनपेक्षित घटना किंवा कलाटण्या यांचा उलगडा या घटना वास्तवात घडलेल्या आहेत याच निकषावर होऊ शकतो. सकृत दर्शनी दिसणाऱ्या पुराव्यामुळे ज्याच्यावर संशय असतो त्या व्यक्तीऐवजी दुसरीच कोणी व्यक्ती प्रत्यक्षात गुन्हेगार किंवा आरोपी म्हणून पुढे येते, हा बहुसंख्य डिटेक्टिव्ह कादंबऱ्यांचा फॉर्म्युला असतो. त्यामुळे रहस्यकथेची उत्कंठावर्धनाची क्षमता वाचकांना अखेरच्या पृष्ठापर्यंत पुस्तकात गुंतवून ठेवते. व. कृ. जोशी हे आपल्या कथा थोडक्यात सांगतात. फार लांबण लावत बसत नाहीत. वाचकांना चकविण्यात ते आनंद मानत नाहीत असे नाही; पण वाचकाला चकविण्यासाठी ते घोळ घालत बसत नाहीत. ते घटनेच्या गाभ्यालाच हात घालतात आणि नेमक्या कळीच्या मुद्द्याशी वाचकाला घेऊन जातात. घटना-प्रसंग खूप असले तरी ते सूत्ररूपाने सांगून कथनाचा वेग टिकवून धरतात. रेंगाळत राहत नाहीत. वर्णने करून वातावरण निर्मितीसाठी तपशीलाचा पसारा मांडत नाहीत.

पोलीस इन्स्पेक्टर प्रधान हे व्यक्तिमत्त्व त्यांच्या बहुसंख्य कथांच्या केंद्रस्थानी

असते. प्रधान आपल्या उपजत शहाणपणाच्या, बुद्धिचातुर्याच्या आणि पोलीस खात्यातील चौफेर अनुभवाच्या बळावर तसेच मानवी स्वभावाच्या आकलनावर भर देऊन कुठल्याही गुन्ह्याचा, समस्येचा उलगडा करतात. गुन्ह्याला शिक्षा हवीच; परंतु गुन्ह्यामागची मानवी असहायता व अगतिकता ते नजरेआड करीत नाहीत. सहानुभूती, सहृदयता यांना अधिकाराच्या गुर्मीखाली दडपून ठेवत नाहीत. आपल्या कनिष्ठ सहकाऱ्यांनाही ते सन्मानाने वागवतात. त्यांना शोधाची दिशा दाखवतात पण त्यांच्या आत्मप्रेरणेलाही वाव देतात. यशाचे श्रेयही मोकळ्या मनाने देण्यात कधी कसूर करीत नाहीत.

गुन्ह्याचा उलगडा करताना पोलीसांना वेगवेगळ्या मार्गांचा अवलंब करावा लागतो. त्यांचे खबरे सगळीकडे वावरत असतात. त्यांच्याकडून माहिती मिळते. पोलीसांचेही गुप्तहेर खाते असते. गुन्हेगाराने मागे ठेवलेला पुरावा त्याचा माग काढण्यासाठी उपयुक्त ठरतो. हाताचे ठसे, रक्त, केस, मोबाईल, चिठ्ठी, कागद, कपडे, शस्त्रे... प्रत्येक गोष्ट गुन्हेगाराची ओळख पटवण्यास उपयुक्त ठरते. हस्ताक्षर तज्ज्ञ, अंगुलीमुद्रातज्ज्ञ, विषाचा प्रकार ठरवणारे तज्ज्ञ, दस्तऐवजाचे अस्सलपण ठरवणारे तज्ज्ञ, प्रयोगशाळेत (रसायन, विष, औषधे, रक्त वगैरे) विश्लेषण करणारे तज्ज्ञ, सध्या विज्ञानाचा वापरही गुन्हेगारीमध्ये मोठ्या प्रमाणावर होतो. पोलीसांना त्यासाठी विज्ञानक्षेत्रातील जाणकारांचीही मदत घ्यावी लागते.

'विज्ञान पोलीसकथा' या संग्रहातील काही कथांमध्ये विज्ञानाचा वापर करून गुन्हेगारापर्यंत पोचवण्याचे काही नमुने बघायला मिळतात.

इन्स्पेक्टर प्रधान विज्ञानविषयक काही बाब तपासात समोर आली तर न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेची आणि तिचे विभागीय संचालक डॉ. भाटिया यांची मदत घेतात.

डॉ. भाटिया उंचीने साडेपाच फूट, किरकोळ शरीरयष्टी, अस्ताव्यस्त केशसंभार, छोटीशी दाढी, फटकळ तोंडाचे पण हुशार, अठरा अठरा तास लॅबमध्ये काम करणारे... कोणाचीही तमा न बाळगणारे... त्यांचा दरारा विलक्षण! ''विज्ञान फक्त सत्यशोधन जाणते. ते अपराधी व्यक्तीच्या अपराधाचा शास्त्रीय पुरावा देतेच, निरपराध व्यक्तीचा निरपराधीपणाही सिद्ध करते... विज्ञान केवळ नकारात्मक अभिप्राय देत नाही...'' खऱ्या गुन्हेगाराचा शोध घेण्यास विज्ञान मदत करते अशी त्यांची ठाम श्रद्धा आहे. विज्ञानाचा आधार घेऊन ते अनेक गुंतागुंतीच्या बाबींचा उलगडा करून सत्याचा छडा लावण्यास मदत करतात. इन्स्पेक्टर प्रधान डॉ. भाटियांच्या बुद्धिमत्तेवर आणि शास्त्रीय ज्ञानावर फिदा आहेत. केव्हाही एखादी समस्या भेडसावू लागली तर वेळीअवेळी इन्स्पेक्टर प्रधान सरळ डॉ. भाटियांकडे जातात आणि ''डॉक्टर, एक

विलक्षण पेच प्रसंग माझ्यापुढे आहे. साध्या शब्दांत सांगायच तर फजितीची वेळ आहे,'' असे मोकळेपणाने बोलू शकतात. डॉ. भाटियांच्या चंद्रप्रकाशित अभ्यासिकेला ते 'गुहा' असे म्हणतात आणि त्या गुहेत बसून आपल्या पुढील पेचप्रसंगातून सुटण्याचा मार्ग शोधत राहतात. डॉ. भाटिया आणि इन्स्पेक्टर प्रधान यांच्यातील गाढ मैत्री हा पोलीस खात्यात एक नवलाईचा विषय मानला जाई. डॉ. भाटिया अबोल, एकलकोंडे, अभ्यास-मनन-चिंतन आणि प्रयोगशाळेतले प्रयोग यात रंगलेले. प्रधान हे बोलके, कुणाशीही संवाद साधू शकणारे, कनिष्ठांचाही आदर करणारे, सहज संवादातून माहिती काढून घेणारे अनुभवी पोलीस अधिकारी. या दोघांचे स्वभाव भिन्न असले तरी मैत्र जिव्हाळ्याचे होते.

डॉ. भाटिया यांच्या प्रयोगनिष्ठ विश्लेषणामुळे इन्स्पेक्टर प्रधान यांना वरवर सरळ दिसणाऱ्या गुन्हेगारी प्रकरणाच्या संशयित आरोपीचे निरपराधपण जाणवून खऱ्या सूत्रधारापर्यंत पोचणे शक्य होत असे. सत्याचा शोध घेता येत असे.

कँपमधील रोझी डिसुझा आपला चाळिशीतला एकुलता एक मुलगा जॉन याच्या आकस्मिक मृत्यूनंतर दोन दिवसांनी इन्स्पेक्टर प्रधानांना भेटायला येते आणि जॉनच्या कोटाच्या खिशात सापडलेली एक चिठ्ठी त्यांना दाखवते. ''जॉन, मार्गरिटवर माझं प्रेम आहे. तिने घटस्फोट मागितला पण तू दुष्टपणाने त्याला नकार दिलास. याद राख. त्याच्या परिणामाला तयार राहा - सुधाकर कदम.'' त्यानंतर जॉनचा रविवारी रात्रीच्या जेवणानंतर मृत्यू होतो. त्याने एकट्यानेच एक केक खाल्लेला असतो. तो मार्गरिटने आणलेला असतो. त्यानंतर जॉनची प्रकृती बिघडते. विषप्रयोगाची लक्षणे आढळतात. उपचारापूर्वीच त्याचे निधन होते. पोलिसांना सुधाकर कदमच्या घरात केक विकत घेतल्याचे बिल आणि आर्सेनिक विषाची अर्धी भरलेली बाटली कचरापेटीत सापडते. बाटलीवर मार्गरिट आणि सुधाकर यांचे ठसे आढळतात. जॉनच्या मृतदेहाची उत्तरीय तपासणी केली जाते. पोटाचा व्हिसेरा प्रयोगशाळेत पाठवला जातो. तपासणीचा निष्कर्ष येताच मार्गरिटला अटक करायचे ठरते. परंतु व्हिसेराच्या तपासणीचा निष्कर्ष येतो - जॉनच्या पोटात कुठल्याही विषाचा मागमूस नाही. त्यामुळे प्रधान बुचकळ्यात पडतात. तपासाचा प्रत्येक टप्पा पुन्हा तपासतात. त्यावेळी सुधाकर कदम हा पाताळयंत्री गुन्हेगार असल्याचे त्यांच्या लक्षात येते. त्याने जॉनचा खरा व्हिसेरा बाजूला ठेवून दुसराच व्हिसेरा -बिनविषाचा - तपासणीसाठी पाठवलेला असतो. पण या तपासाचा हा निष्कर्ष सिद्ध करणारा कसलाही पुरावा प्रधानांजवळ नव्हता. म्हणून ते अस्वस्थ होते. जॉनची हत्या करणारे मार्गरिट आणि सुधाकर हे गुन्हेगार समाजात प्रतिष्ठितपणाने वावरणार, जॉनच्या आईची व्यथा दूर करण्यात कायदा असमर्थ ठरणार. हा पोलिसांचा पराभवच होय असे इन्स्पेक्टर प्रधान यांना वाटते आणि हीच

व्यथा ते डॉ. भाटिया यांच्याजवळ बोलून दाखवतात.

डॉ. भाटिया प्रधानांना या पेचप्रसंगातून कसा मार्ग काढायचा ते सुचवतात. हा मार्ग पूर्णतया विज्ञानाधिष्ठितच असतो.

डॉ. भाटिया सांगतात, ''आर्सेनिक विष हे संपूर्ण शरीरभर पसरणारे विष आहे. ते शरीराच्या इतर भागातून नष्ट होऊ शकते पण डोक्याच्या केसांच्या मुळांशी ते दीर्घकाळ राहते. जॉनच्या मृतदेहाच्या डोक्याचे काही केस मुळासह ताब्यात घ्या. प्रयोगशाळेत तपासणी करा. तुमचा नष्ट झालेला पुरावा मिळेल.'' तपासणीत केसांच्या मुळाशी आर्सेनिक सापडते. प्रधान मार्गारेट आणि सुधाकर यांना अटक करतात. डॉ. भाटिया प्रधानांना म्हणतात, ''हा विजय माझा नाही. हा विजय विज्ञानाचा आहे.''

शेती विकून आलेले चाळीस हजार रुपये हिरवे वकीलांकडे देऊन सोलापूरला आपल्या मुलीकडे राहण्यासाठी जायचे शंकरराव ठरवतात. तसे मुलीला कळवतात पण त्यांचा नंतर पत्ताच लागत नाही. सहा महिने जातात. फौजदार सोनवणे या प्रकरणी लक्ष घालतात. शंकरराव आणि सुमित्रा (खानावळीची मालकीण) यांचे प्रेमसंबंध होते, असे त्यांना कळते. खानावळीतला नोकर वामन त्याला दुजोरा देतो. शंकरराव आले असताना मालकिणीने सांगितल्यावरून शेवचिवडा आणि उंदीर मारायचे विषय घेऊन आल्याचे तो कबूल करतो. नंतर शंकरराव मृत होतात. मालकीण वामनला त्यांचे प्रेत पुरायला सांगते. त्यासाठी त्याला हजार रुपये देते. फौजदार सोनवणे त्या घरात खोदकाम करतात. मानवी हाडांचा सापळा मिळतो. तेव्हा वामन आणि मालकीण यांना अटक करतात. बाईंचे वकील कागदोपत्री पुरावा देतात की हे घर मुस्लीम वस्तीत आहे. पूर्वी ही जागा मुसलमान मयत पुरण्याची जागा म्हणून वापरत. हा सापळा त्यामुळे येथे पूर्वीपासून असावा.

प्रश्न एवढाच उरतो की हा सापळा शंकररावांचा हे कसे सिद्ध करायचे?

डॉ. भाटिया हा प्रश्न सोडवतात. विज्ञानाचाच आधार घेतात शंकररावांचे फोटो आणि पूर्वी काही शस्त्रक्रिया झाल्या असल्यास त्याची माहिती आणून देण्यास ते सांगतात. त्या माहिताच्या आधारे तपासणी करून डॉ. भाटिया सुचवतात, ''मयत माणसाचा नुसता सापळा मिळाला तर त्याच्या कवटीचे फोटो घेऊन त्याच आकाराच्या त्याच्या फोटोवर ठेवून तुलनात्मक अभ्यास करून तो चेहऱ्याचा फोटो आणि कवटीचा फोटो एकाच माणसाचा आहे की नाही हे निश्चित सांगता येते. फोजदार सोनवणे यांनी शंकररावांची जी वैद्यकीय हिस्टरी दिली आहे तिच्यात शंकररावांना मेंदूचा ट्युमर होता असे म्हटले आहे. या ट्युमरच्या दबावाने कवटीला आतल्या बाजूला त्याच आकाराचा खोलपटपणा येतो... या कवटीतला हा खोलगट भाग पहा.

ही कवटी निश्चित शंकररावांची आहे.'' (पेचप्रसंग)

प्रा. विश्वास सत्यपाल यांची पत्नी मालिनी पंख्याच्या हुकाला दोरीने गाठ मारून दुसऱ्या टोकाचा गळ्याला फास लावून आत्महत्या करते. तिची केस कलम १७४ खाली नोंदवली जाते. लग्नाला ८ वर्षे होऊनही अपत्यप्राप्ती न झाल्याने ती उदासीन, निराश असते; जगण्यात अर्थ नाही असे म्हणत असते असे नर्स पाटणकर सांगते. यावर विसंबून ही केस शिकाऊ फौजदाराकडे तपासणीसाठी देण्यात येते. परंतु पोस्टमार्टेममध्ये तिच्या गळ्यावर दाबल्याचे वळ दिसतात. ही आत्महत्त्या नाही, हा खून आहे. हे प्रधानांच्या लक्षात येते. फौजदारही बुचकळ्यात पडतो. अधिक चौकशीत मालिनी आणि बिल्डर रमेश सोहोनी यांचे लव्ह अफेअर असल्याचे उघड होते. त्यांच्या प्रणयाचे फोटो फोटोग्राफर सतीश नाईक हा काढून रमेशच्या सांगण्यावरून ते मालिनीला देण्यासाठी तिच्या घरी जातो. पण मालिनीऐवजी तो विश्रामला ते फोटो विकतो. संतापलेला विश्राम बिल्डर रमेशच्या ऑफिसात जाऊन तुम्हा दोघांचाही निकाल लावतो अशी धमकी देतो. त्यामुळे मालिनीची हत्या रमशने केली असावी असे सकृत दर्शनी दिसते. प्रधान या घटनाक्रमाचा आढावा घेतात. फोटोग्राफर नाईक म्हणतो, दुपारी एकदीड वाजता कॉलेजात जाऊन त्याने फोटो विश्रामला विकले. त्यानंतर दोन वाजता विश्राम रमेशच्या ऑफिसात गेला. साडेतीनला घरी गेला. मालिनीचा गळा दाबून जीव घेऊन आत्महत्येचा देखावा उभा केला. नंतर त्याने शेजारच्या शहांना खोटी खबर दिली...

परंतु पोस्टमार्टेमध्ये मालिनीचा मृतदेह कडक होण्याच्या प्रक्रियेवरून तिचा मृत्यू सकाळी अकरा-बाराच्या सुमारास झाल्याचे लक्षात येते. मालिनीच्या अंगावर पुरुषाचे काही ताठ करडे केसही मिळाले. तिने मारेकऱ्याशी प्रतिकार केल्याच्या खुणा दिसल्या.

करडे, ताठ केस आणि खुनाची अकराबाराची वेळ यावरून नेमका खुनी कोण हे प्रधान यांच्या लक्षात येते... ताठ करड्या केसांचा, तोंडावर ताज्या जखमांची खूण असलेला फोटोग्राफर सतीश.

आत्महत्येची केस असे म्हणून तपास थांबवणारा फौजदार एकीकडे राहतो आणि पोस्टमार्टेममधील शास्त्रीय तपशील यामुळे गुन्हेगाराच्या तपासाला लाभलेली वेगळी दिशा विज्ञानाचीच सत्यशोधनाची क्षमता सिद्ध करते. (मालिनीचा मृत्यू)

काचेचे तावदान हे बहिर्गोल भिंगासारखे काम करते, उन्हाने तडकते हे शास्त्रीय निरीक्षण.

नक्षलवादी चळवळीपासून दूर राहावे असे पत्रक काढणाऱ्या प्रा. मुखर्जींचा त्यांच्या अभ्यासिकेत दोन तरुण गोळ्या झाडून खून करतात. अभ्यासिकेच्या बाहेरून

काचेच्या तावदानाच्या खिडकीतून ते गोळ्या झाडतात. पहिली गोळी नक्षलवादी कार्यकर्ता नरेंद्र गांगुली झाडतो आणि आपले पिस्तूल सोबत आलेल्या उपेंद्र सरकार या नवख्या साथीदाराला देऊन चलाव गोळी असे सांगतो. उपेंद्र गोळी झाडतो.

एकाच पिस्तुलातून दोन गोळ्या एकामागून एक उडवल्या गेल्या. प्रा. मुखर्जींना त्यातील एकच गोळी लागली. दुसरी गोळी भिंतीत घुसली. दोन्ही गोळ्या काचेच्या तावदानाला भोक पाडून आत आल्या. मुखर्जींच्या छातीत घुसलेल्या गोळीने काचेच्या तावदानात खालच्या बाजूला भोक केलेले होते. भिंतीत घुसलेल्या गोळीने त्या काचेच्यावर नऊ इंचावर भोक केले होते.

आता प्रश्न असा होता की, प्रा. मुखर्जींचा प्राणघात करणारी गोळी कुणी झाडली? नरेंद्रने की उपेंद्रने?

नरेंद्रने म्हटले, ''मी प्रथम गोळी झाडली. पण माझा नेम चुकला. हाताला कळ आली म्हणून मी हत्यार उपेंद्रला देऊन लगाव गोळी असे म्हटले. त्याने गोळी झाडली ती मुखर्जींच्या छातीत घुसली.'' तेवढ्यात पोलीसांनी येऊन आम्हाला पकडले.''

उपेंद्र म्हणाला, ''नरेंद्रची पहिली गोळीच मुखर्जींना लागली. मी उडवलेली गोळी भिंतीत रुतली.''

फुटलेल्या काचा या विषयावरील तज्ज्ञाला पाचारण करण्यात आले.

पहिल्या गोळीने काचेवर फुटलेल्या काचांचे तयार होणारे पॅटर्न आणि त्याच काचेवर दुसरी गोळी मारल्यावर तयार होणारे पॅटर्न यात फरक असतो. त्या पॅटर्नचा तुलनात्मक अभ्यासक करून त्या तज्ज्ञाने भिंतीत रुतलेली गोळी नंतर उडवली गेली असा निष्कर्ष काढला.

नरेंद्रने पहिल्याच गोळीने मुखर्जींचा खून केला. केवळ उपेंद्रला अडकवण्यासाठी दुसरी गोळी झाडण्याचा आदेश त्याने दिला. ध्येयवादी तरुणांना गुन्ह्यात अडकवून आपल्या चळवळीत काम करण्यास भाग पाडण्याचे हे तंत्र दहशतवादी संघटना राबवतात. (फुटलेले तावदान)

मंजुळेचे प्रेत रेल्वे डब्यात सापडते. त्या डब्यात रक्ताचे ओ व ए असे नमुने आढळतात. मंजुळेचा रक्तगट ओ हा असतो. साहजिकच तिच्यावर बलात्कार करण्याचा रक्तगट ए असणार. मंजुळेच्या खुनाचा संशय असणारे दोन आरोपी सदानंद आणि सबनीस वकील यांचा रक्तगट बी असतो. आता या प्रकरणात पुढे काय करायचे असा प्रश्न प्रधानांना पडतो. आधीची तपासाची दिशा बदलणे त्यांना भाग पडते (अखेर फत्ते)

दोस्त राष्ट्राच्या वकिलातीत काम करणाऱ्या एका भारतीय स्त्रीकडून पुण्याच्या आसपास असलेल्या दारूगोळ्याच्या कारखान्यांबद्दलची गुप्त माहिती पाठवली जात

आहे असा संशय आल्याने त्या स्त्रीचे टपाल, फोन, पाहुणे यांच्यावर लक्ष ठेवण्यात येते. पुण्याहून येणाऱ्या पत्रात उषादेवीची पत्रे सांस्कृतिक व सामाजिक विषयाबद्दल असतात. त्यात कोडवर्ड व सांकेतिक भाषा दिसत नाही. त्यामुळे तिच्याबद्दल अधिक माहिती मिळवण्यासाठी दिल्लीहून गुप्तहेरखात्याचा अधिकारी येतो.

इन्स्पेक्टर प्रधान त्या स्त्रीला येणारी पत्रे डॉ. भाटियांना दाखवतात.

डॉ. भाटिया ती पत्रे इन्फ्रा रेड, अल्ट्राव्हायोलेट किरणांनी तपासतात. मायक्रोस्कोपखाली न्याहाळतात. 'आपली उषादेवी' या सहीशेजारचा पूर्ण विराम शाईत नाही तर चिकटवलेला आहे हे त्यांच्या लक्षात येते. त्या मायक्रोडॉटवर विस्तृत नकाशा दिसतो. हेरगिरीचे हे नवे साधन... हेरगिरीचा पुरावा डॉ. भाटिया देतात. (ससेमिरा)

पोलीसकथांमधले हे विज्ञान सर्वव्यापी आहे हे यावरून लक्षात येते.


**किंमत : १२०रु. सभासदांना : सवलतीत पोस्टेज : २५रु.**

## व. कृ. जोशी यांच्या रहस्यकथा

| | |
|---|---|
| रक्तदान | १३० |
| कुंकू पुसणारा हात | १४० |
| अंधारातील किंकाळी | १२० |
| याला पोलिस-जीवन ऐसे नाव | १२० |
| अमानुष संहार | १०० |
| अभूतपूर्व हत्या | ११० |
| "गुन्हा कबूल!" | ११० |
| पाठलाग | १४० |
| सतीचं वाण | १५० |
| विज्ञान पोलिसकथा | १२० |

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे. पोस्टेज २५रु. प्रत्येकी

# पुस्तक परिचय

**प्राणी, पक्षी, खेळणी आणि जादू यांच्या कल्पकतापूर्ण कथा**

# जादूचा अंगरखा




संस्मिता गुप्ते

एनिड ब्लायटनने सुमारे सातशे पुस्तके लिहिली आणि गेली साठसत्तर वर्षे ती पुस्तके जगभरच्या मुलामुलींच्या कल्पनाशक्तीला खाद्य पुरवत आहेत. दि फेमस फाइव्ह, दि सिक्रेट सेव्हन, नॉडी, बार्नीज मिस्टरी बुक्स, दि ॲडव्हेंचर सेरीज, मॅलोरी टॉवर्स वगैरे मालिका शालेय जीवन, वसतिगृहांतले जीवन, खेळण्यांचे जग, रहस्यकथा, साहस कथा यांच्यातून हुशारीचे, चातुर्याचे आदर्श मुलामुलींपुढे उभ्या करीत राहिल्या. त्याचबरोबर मुलांमधील अद्भुत गोष्टींबद्दलचे आकर्षणही एनिड ब्लायटनला अत्यंत महत्त्वपूर्ण वाटे.

मुलांमधील कल्पकतेला, कल्पनाशक्तीला, परकाया प्रवेश शक्तीला, 'सेन्स ऑफ वंडर'ला आवाहन करणाऱ्या कल्पनारम्य कथा त्यांच्या भावजीवनाचे परिपोषण करतात, त्यांच्यावर चांगल्या मूल्यांचे संस्कार करतात. एक शिक्षिका म्हणून एनिड ब्लायटनला मुलांना रंजनातून सद्‌गुणांचे आणि सेवाभावाचे संस्कार करण्याचे कार्यही फार महत्त्वाचे वाटे. तशा प्रकारच्या कथाकादंबऱ्यांचेही वैपुल्य तिच्या पुस्तकांमध्ये दिसते.

अद्भुत आणि वास्तव यांची सांगड एनिड ब्लायटन यांच्या अनेक कथांमध्ये आढळते. अशा काही कथांचे रूपांतर संस्मिता गुप्ते यांनी केले आहेत. त्यांचे जादूचा अंगरखा, चालणारे बूट, पतंगाची करामत, पिनूचिनूची चतुराई हे चार संग्रह मेहता पब्लिशिंग हाऊसने अत्यंत आकर्षक रंगीबेरंगी स्वरूपात प्रसिद्ध केले आहेत. चांगल्या कथा आणि उत्तम निर्मिती मूल्ये यामुळे बालवाचकांना ही पुस्तके खूप खूप आवडतील यात शंका नाही.

जादूचा अंगरखा ही कथा एका जादूगाराची, जादूची आहे. या जादूगाराचे नाव आहे युक्तिमान. या जादूगाराची एक खास जादू म्हणजे तो जादूचे प्रयोग करताना चक्क अदृश्य व्हायचा. सगळे प्रेक्षक त्यामुळे थक्क व्हायचे. हा जादूगार आपल्या डोळ्यांपुढे अदृश्य कसा होतो याचे सर्वांना कोडे पडायचे. युक्तिमान जादूगाराचा हात धरणारा दुसरा कोणीही जादूगार नव्हता. युक्तिमानला अदृश्य होता येई कारण त्याचजवळ एक जादूचा अंगरखा होता. हा अंगरखा (म्हणजे सदरा) अंगावर घातला की तो एकदम अदृश्य होई. साहजिकच तो आपल्या या अंगरख्याची खूप काळजी घेत असे. तो कडीकुलपात बंद ठेवत असे. गुलाबी रंगाचा हा अंगरखा म्हणजे जणू त्याचा जीव की प्राण होता.

एकदा या जादूगाराच्या मोलकरणीने, सखूने जादूगाराला म्हटले, ''मालक, हा अंगरखा खूप मळला आहे. तो धुवायला हवा. बरेच दिवस न धुतल्याने त्याला वासही येतो आहे. तुमचे प्रेक्षक कधीतरी नाराज होतील त्या वासामुळे.''

जादूगाराला सखूचे म्हणणे पटले.

त्याने तिच्याकडे तो अंगरखा देऊन म्हटले, ''तू हा अंगरखा धुवून स्वच्छ कर.



मात्र त्याची काळजी घे. कोणाच्या हाती देऊ नको. गेटला कुलूप लावून वाळत घाल.''

सखू म्हणाली, ''मालक, काळजी करू नका. मी तो सोन्याचाच आहे असे समजून त्याची काळजी घेईन.''

एक टब भरून उकळते पाणी घेऊन सखू तो अंगरखा त्यात बुडवते. भरपूर साबण लावून स्वच्छ धुते. अंगरख्याचा गुलाबी रंग पुन्हा खुलून येतो.

अंगरखा दगडी भिंतीजवळच्या दोरीवर वाळायला घालते.

तेवढ्यात जोराचा वारा सुटतो. आकाशात ढगांची गर्दी होते.

सखू मनाशी म्हणते, ''वाऱ्याने अंगरखा लवकर वाळेल. तोवर आपण स्वयंपाक उरकून घेऊ.''

सखू स्वयंपाकघरात जाते. खिडकीतून अंगरख्यावर लक्ष ठेवते. दुसरीकडे स्वयंपाक करत राहते. थोड्या वेळाने बघते तर दोरीवर अंगरखा नाही. ती एकदम घाबरते. परत भिंतीजवळ येऊन बघते.

''आता तर अंगरखा होता. अचानक कुठे गेला?'' ती स्वत:लाच विचारते.

ती बागेतल्या पक्ष्यांना, प्राण्यांना म्हणते, ''अरे, मला तो अंगरखा शोधून द्या. मी तुम्हाला बक्षीस देईन.''

बक्षीस म्हटल्याबरोबर सगळे पक्षी आणि प्राणी एकदम कामाला लागतात.

ससे सगळी बिळे बघतात. नदीतले मासे अवतीभवती नजर टाकतात. घुबड झाडाच्या ढोलीत शोध घेतात. पाखरे धान्याच्या गोदामात बघतात.

एक बुलबुल पक्षी उत्साहाने कलकलाट करत येतो. ''गुलाबी गुलाबी''

सखू त्याला जवळ घेऊन विचारते, ''कुठेय गुलाबी?''

बुलबुल तिच्यासमोर उंच झेपावतो. दोरीजवळच्या उंच झाडावर जातो. सखू त्याकडे बघते. तर तिथे झाडाच्या फांदीला अंगरखा लटकत असतो.

लगेच ती उंच शिडी आणते. सरसर चढून वर जाते. अंगरखा अलगद ओढून हातात पकडते.

शिडीवरून उतरताना हात मोकळे हवेत म्हणून अंगरखा अंगात घालते. तर ती चक्क अदृश्य होते. पण तिला ते काही कळत नाही. तिला सगळे दिसत असते. पण शिडीवरून ती उतरत आहे हे कोणाला दिसत नाही. बुलबुल एकदम दचकतो. सखू कुठे गेली? सखू उतरते. अंगरखा अंगावरून दूर करते. तेव्हा बुलबुलला हायसे



वाटते.

पण शेवटी युक्तिमान जादूगाराला त्याचा जादूचा अंगरखा मिळतो.

बुलबुललाही बक्षीस मिळते. वसंत ऋतू सुरू झाला की तो गुलाबी गुलाबी ओरडत उडत राहतो.

सशाच्या शेपटीची गोष्ट, किल्लीच्या उंदराची गोष्ट याही अशा कल्पनारम्य आहेत. निसर्गाशी मैत्री जुळवणाऱ्या आहेत.

सशाच्या शेपटीची गोष्टही मजेदार आहे.

या गोष्टीला ससा आपल्याला सापडलेली खेळण्यातल्या मांजराची लांबुडकी पांढरीशुभ्र शेपटी आपल्या स्वत:च्या आखुड शेपटीभोवती गुंडाळतो. त्याची लांब शेपटी बघून सगळे प्राणी चकित होतात, ''तू तुझी शेपटी कशी वाढवलीस?'' असे विचारू लागतात. सशाला त्यामुळे मोठा भाव चढतो. ''सात दिवस एका जागी बसून शेपटी वाढवायचे ध्यान करा'' असा सल्ला तो देतो आणि म्हणतो, ''मी तुमच्या सर्वांपेक्षा हुशार आहे. तुम्ही मला तुमचा राजा का करीत नाही? तुमचा राजा हा लांब शेपटीवालाच हवा.''

आणि त्याची राजा म्हणून निवड करण्यासाठी चक्क प्राण्यांची बैठक होते.

त्या बैठकीत आलेला एक कोल्हा त्या सशामागे लागतो. तेव्हा ससा पळू लागतो. आणि कोल्हा त्याच्या शेपटीचा चावा घेतो,

बिचारा बंटी ससा, प्राण्यांचा राजा होण्याचे त्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरतच नाही.

टिंकूच्या खेळण्यातला किल्लीचा उंदीर त्याचा फारच आवडता. पण एकदा त्याची किल्लीच हरवते. त्यामुळे उंदीर खूपच दु:खी होतो. टिंकू एका घड्याळाच्या दुकानातून उंदराच्या किल्लीसारखी किल्ली आणतो तेव्हा उंदीर खूष होतो. तो टिंकूच्या उपयोगी पडायचे ठरवतो आणि तसे करतोही. टिंकू त्या किल्लीवाल्या उंदराला एक रिबन बांधून म्हणतो, ''या रिबिनमुळे तू जगातला सर्वांत चांगला उंदीर आहेस हे सगळ्यांना समजेल.'' तेव्हा तर उंदीर अगदी खूष होऊन जातो.

काहीतरी भन्नाट कल्पना लढवून उंदीर, ससा अशा प्राण्यांच्या स्वभाववैशिष्ट्यावर मानव सुलभ घटनांची मालिका गुंफत जाणे हा या लेखिकेचा हातखंडा आहे. बालवाचकांना त्यातील घटना गमतीदार वाटतील.

**किंमत : ५० रु.   सभासदांना : सवलतीत   पोस्टेज : २० रु.**

# पुरस्कार



### * डॉ. संजय ढोले यांना साहित्य साधना पुरस्कार

पुणे विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील सहयोगी प्रपाठक डॉ. संजय ढोले यांना 'प्रेमाचा रेणू' या संपूर्ण शास्त्रीय दृष्टिकोनातून लिहिलेल्या कथासंग्रहासाठी साहित्य साधना पुरस्कार देण्यात आला.

महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड संचालित न. चिं. केळकर ग्रंथालयाच्या वतीने हा पुरस्कार दिला जातो. मानचिन्ह व ५ हजार रुपये असे त्याचे स्वरूप आहे. प्रा. ढोले हे भौतिकशास्त्र या विषयात काम करीत असल्याने वैज्ञानिक दृष्टिकोनातून व त्याच अंगाने साहित्याचे लेखन हे त्यांचे वैशिष्ट्य ठरले आहे. वेगळ्या वाटेने जाणाऱ्या विषयांना प्रोत्साहन मिळावे यासाठी पुरस्कार सुरू केल्याचे ग्रंथालयाच्या कार्यवाह नंदिनी हंबर्डे म्हणाल्या.

### * डॉ.रा.चिं. ढेरे यांना पुण्यभूषण पुरस्कार

त्रिदल संस्थेच्या वतीने डॉ. रा. चिं. ढेरे यांना पुण्यभूषण पुरस्कार पुरस्कार प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ साहित्यिक डॉ.एस.एल.भैरप्पा, प्रसिद्ध नाटककार महेश एलकुंचवार, महापौर मोहनसिंग राजपाल, 'वनराई'चे अध्यक्ष मोहन धारिया, गजेंद्र पवार हे उपस्थित होते.

यावेळी विजया चितळे, छगन बागेवाडीकर, डॉ. शांता कोटेचा, बिमलेन्दु सेनगुप्ता आणि लीलाताई मर्चंट या ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिकांचाही सत्कार करण्या आला.

सत्काराला उत्तर देताना डॉ.ढेरे म्हणाले, ''केवळ माहितीचे भारे जमविणे म्हणजे संशोधन नव्हे. या संदर्भाचे दुवे जुळवत त्यातून विषय, व्यक्ती आणि काळ यांच्या आकलनापर्यंत पोहोचणे, ही प्रतिभाबळानेच घडणारी गोष्ट आहे. सर्वसामान्य माणसांविषयीचे प्रेम हा येथील लोकपरंपरेचाच नव्हे, तर संतपरंपरेचाही गाभा आहे. त्या गाभ्याशी जाण्याची वाट मी सिद्ध करू शकलो आणि तेथे पोहोचल्यानंतर सार्वजनिक जीवनात न वावरताही माणसांचे अलोट प्रेम मला मिळाले. परंपरा आणि परिवर्तन यांची सहृदय पण निर्भय चिकित्सा करण्यास मी कधी कचरलो नाही. एखाद्या धर्मकार्याइतका निष्ठेने मी लेखन करीत राहिलो. किंबहुना लेखन-संशोधन हाच माझा स्वधर्म राहिला आहे.''

ते म्हणाले, ''आज धर्म किंवा जात हा शब्द उच्चारणेही अवघड झाले आहे. धर्मद्वेष आणि जातीद्वेषाचा आज उठलेला गदारोळ कमालीचा क्लेशकारक आहे. जाती मिटविण्याची भाषा बोलत आपण जातीयवादच धगधगत ठेवत आहोत. निधर्मी राष्ट्रवादाची भाषा बोलत धार्मिक अहंता व स्वतंत्र प्रादेशिक अस्मितांना खतपाणी घालत आहोत. नवसमाजरचनेचा प्रयत्न करताना धर्माबरोबरच नीतीही दूर सारण्याची अक्षम्य चूक आपण केली आहे. नैतिकतेचा सर्व क्षेत्रांतील पाडाव आज कोणाही संवेदनशील माणसाला अस्वस्थ करणारा आहे. ज्ञानाचे क्षेत्रही आज कमालीचे गढूळ आणि अशुद्ध झाले आहे. प्रबोधन परंपरेत उदयास आलेल्या प्रखर विवेकवादाकडे स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्राने पाठ फिरवली आहे, हे पाहताना मी कमालीचा व्यथित झालो आहे.''

कोणत्याही 'रॉयल्टी'ची किंवा पुरस्काराची अपेक्षा न ठेवता अथकपणे सत्याचा शोध घेणाऱ्या डॉ. ढेरे यांनी निष्काम कर्मयोगाचेच आचरण केले, असे गौरवोद्गार डॉ. भैरप्पा यांनी काढले. ते म्हणाले, ''डॉ. ढेरे यांच्या आठ पुस्तकांचा कानडीत अनुवाद झाला असून तेथील संशोधक डॉ. ढेरे यांच्या संशोधनाचा आधार घेतात. महाराष्ट्र, कर्नाटक, आणि आंध्र प्रदेश यांच्या मध्ये काही भेद असले, तरी येथे एक सांस्कृतिक एकात्मता होती, हे संशोधनाने सिद्ध झाले आहे. संशोधनाने सिद्ध झालेले मत स्वीकारण्याची प्रगल्भता आवश्यक आहे. विशेषत: इतिहासासारख्या शास्त्रांमध्ये संशोधन करणाऱ्या अभ्यासकांना अनेक बाबींना तोंड द्यावे लागते. ढेरे यांच्या संशोधनामुळे समाज प्रगल्भ होण्यास मदत होईल.'' एखादे संशोधन पटले नाही, तरी त्याबद्दल आदर ठेवण्याची प्रगल्भता समाजात कधी येणार, असा प्रश्न एलकुंचवार यांनी विचारला. सतीश देसाई यांनी प्रास्ताविक आणि सुधीर गाडगीळ यांनी सूत्रसंचालन केले. प्रकाश देवळे यांनी आभार मानले.

*** लतादीदींना 'दि जेनिसिस' पुरस्कार प्रदान**

'दि इंटरनॅशनल क्रिएटिव्ह क्लब'तर्फे 'वूमन पॉवर' या विशेष कार्यक्रमात केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांच्या हस्ते लतादीदींना 'दि जेनिसिस' पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. श्री. बालाजी तांबे, प्रतिभा पवार, सहकार मंत्री हर्षवर्धन पाटील, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, अॅड. रावसाहेब शिंदे, अनुराधा देसाई, मीलन खोत आदी यावेळी उपस्थित होते.

लतादीदी म्हणाल्या, ''मला घडविणारी माझी आई म्हणजेच माई होती. बाबा (मा. दीनानाथ) १९४२ मध्ये गेले तेव्हा माई ३५ वर्षांची, मी तेरा वर्षांची, तर हृदयनाथ ४ वर्षांचा होता. माईचा आधार असल्यामुळे वाईट परिस्थितीत देखील आम्ही घाबरलो नाही. 'बाबांनी जे शिकवले तेच कर. विटी मारण्यापेक्षा तान मार,'

असे सांगणाऱ्या माईने मला आज या ठिकाणी आणून उभे केले आहे. माझ्यावर असेच प्रेम राहू द्या.''

पवार म्हणाले, ''लतादीदींनी आपले आयुष्य संगीत सेवेसाठी अर्पित केले. सुरांना योग्य वळण देण्याचे काम कष्टाने, चिकाटीने केले. स्वरांशी समरस होण्याची दृष्टी असल्यामुळे लता आणि सुस्वर यांचा समन्वय या विश्वात झाला आहे. चंद्र-सूर्य आहेत तोपर्यंत लतादीदींचे सूर कायम राहतील.''

डॉ. तांबे म्हणाले, ''सुमधुर दैवी शक्ती असलेला लतादीदींचा स्वर सर्व जगात पसरला आहे. स्त्री ही पुरुषाची केवळ प्रेरणा नाही, तर ती पुरुषापेक्षा श्रेष्ठ आहे. 'एचआयव्ही' बाधितांवर नादप्रक्रिया आणि स्वास्थ्य संगीतातूनच उपचार सापडेल.''

पुरंदरे यांनी मानपत्राचे वाचन केले. खोत यांनी प्रास्तविक केले. अभिनेते मोहन जोशी यांनी सूत्रसंचालन केले. पूर्वार्धात कौशल इनामदार यांनी स्वरबद्ध केलेल्या 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी' या अभिमान गीतावर प्रसिद्ध नृत्यदिग्दर्शिका सोनिया परचुरे आणि सहकाऱ्यांनी नृत्य सादर केले. उत्तरार्धात प्रसिद्ध अभिनेत्री हेमा मालिनी आणि सहकाऱ्यांनी 'द्रौपदी बॅले' सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले.

### * वैद्यकशास्त्रावरील पुस्तकांना पारितोषिके

मराठी विज्ञान परिषदेतर्फे डॉ. रा. वि. साठे आणि डॉ. टी. एच. तुळपुळे ही दोन पारितोषिके दर तीन वर्षातून एकदा 'वैद्यकशास्त्र' या विषयावरील दोन पुस्तकांना देण्यात येणार आहेत. ही पारितोषिके अनुक्रमे रु. २,५०० आणि ७,५०० रकमेची आहेत.

२०१० च्या पारितोषिकांकरिता १ जानेवारी २००७ ते ३१डिसेंबर २००९ या तीन वर्षांच्या कालावधीतील वैद्यकशास्त्रावरील स्वतंत्र पुस्तकांचा विचार करण्यात येईल. अनुवाद पुस्तके, पाठ्यपुस्तके, प्रसिद्धीपूर्व हस्तलिखिते इत्यादींचा विचार केला जाणार नाही. इच्छुक लेखक, प्रकाशकांनी आपल्या पुस्तकाच्या दोन प्रती मराठी विज्ञान परिषद, विज्ञान भवन, वि. ना. पुरव मार्ग, शीव-चुनाभट्टी, मुंबई ४०० ०२२ या पत्त्यावर पाठवाव्यात.

### * जयंत कैकिणी यांना पहिला कुसुमाग्रज साहित्य पुरस्कार

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कुसुमाग्रज अध्यासनातर्फे यंदाचा पहिलाच कुसुमाग्रज राष्ट्रीय साहित्य पुरस्कार कन्नड साहित्यिक जयंत कैकिणी यांना जाहीर झाला.

भारतीय भाषेतील उत्कृष्ट साहित्यिकांना दर वर्षी हा पुरस्कार दिला जाणार आहे. एक लाख रुपये, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. श्री. कैकिणी यांनी कन्नड भाषेत पाच काव्यसंग्रह, चार नाटके लिहिली आहेत. याशिवाय

जवळपास वीस चित्रपटांसाठी गीते आणि चार चित्रपटांसाठी पटकथा-संवादलेखन केले आहे. दूरचित्रवाणीद्वारेही 'नमस्कार' नामक मालिकेचे त्यांचे दोनशे भाग प्रदर्शित झाले आहेत. 'भावना' या कन्नड वाङ्मयीन मासिकाचे ते संपादक आहेत. त्यांना वयाच्या एकोणिसाव्या वर्षी कन्नड साहित्य अकादमीचा राज्य पुरस्कार प्राप्त झाला असून, सलग चार वेळा राज्य पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. याखेरीज १९९६ चा राष्ट्रीय पुरस्कारही त्यांना मिळाला आहे.

या राष्ट्रीय पुरस्कारासाठी शिफारस करण्याची कामगिरी माजी कुलगुरू, ज्येष्ठ समीक्षक व इंग्रजी वाङ्मयाचे निवृत्त प्राध्यापक जी. एस. अमूर यांच्यावर सोपविण्यात आली होती. १३ एप्रिल रोजी महाराष्ट्र राज्य सुवर्णमहोत्सव सिंहावलोकन परिषदेत श्री. कैकिणी यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

*** 'मराठी माध्यम रत्न' पुरस्कार**

'मराठी भाषा संवर्धन प्रतिष्ठान' आणि 'लोकमान्य टिळक प्रतिष्ठान' यांच्या वतीने देण्यात येणाऱ्या 'मराठी माध्यम रत्न' पुरस्कारासाठी 'लोकसत्ता'चे मुख्य वार्ताहर सुनील माळी, 'सकाळ'चे वृत्तसंपादक श्रीधर लोणी, 'आयबीएन लोकमत'चे ब्यूरो चिफ अद्वैत मेहता, वृत्तनिवेदक प्रकाश पायगुडे आणि ज्येष्ठ पत्रकार व पुणे शेअर बाजाराचे संचालक नंदकुमार काकिर्डे यांची निवड करण्यात आली आहे. मराठी पत्रकारितेद्वारे मराठी भाषेच्या संवर्धनाला हातभार लावणाऱ्या मराठी क्षेत्रातील पाच व्यक्तींना प्रतिष्ठानच्या वतीने हा पुरस्कार देऊन गौरविले जाते. पाच हजार रुपये, स्मृतिचिन्ह, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. एप्रिल महिन्यात समारंभपूर्वक हे पुरस्कार देण्यात येतील, अशी माहिती मराठी भाषा संवर्धन प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण वाळिंबे व लोकमान्य टिळक प्रतिष्ठानचे अध्यक्ष रोहित टिळक यांनी पत्रकार परिषदेत दिली.

*** रावसाहेब शिंदे यांना सामाजिक न्याय पुरस्कार**

क्षेत्रमाहुली (ता. सातारा) येथील न्यायमूर्ती रामशास्त्री प्रभुणे प्रतिष्ठानच्या वतीने रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड. रावसाहेब शिंदे यांना केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांच्या हस्ते 'सामाजिक न्याय पुरस्कार' प्रदान करण्यात आला. श्री पवार म्हणाले, ''विज्ञानयुग असताना सुशिक्षित लोक मात्र विज्ञानापासून दूर होत चालल्याचे दिसत आहे. सत्यावर आधारित विचारधारेला प्रतिष्ठा दिली पाहिजे.''

ॲड. शिंदे म्हणाले, ''रामशास्त्री खूपच मोठे होते. त्यांच्या नावाने पुरस्कार मिळाल्याचा आनंद आहे. फार थोर लोकांना हा पुरस्कार मिळाला आहे. श्री पवार यांच्या हस्ते पुरस्कार मिळावा अशी इच्छा होती. ती पूर्ण झाली.''

## * भारत अस्मिता राष्ट्रीय पुरस्कार

पुणे शहराला माझ्या आयुष्यात मोठे स्थान आहे. नारायण मूर्तींशी पुण्यातच भेट झाली. 'इन्फोसिस'ची सुरवातही पुण्यात झाली. या शहराने आम्हाला एकप्रकारे विश्वास दिला, ते मला माहेरासारखे वाटते, अशी भावना इन्फोसिस फाउंडेशनच्या विश्वस्त व लेखिका सुधा मूर्ती यांनी 'एमआयटी' शिक्षण समूहातर्फे देण्यात येणाऱ्या भारत अस्मिता राष्ट्रीय पुरस्काराच्या वितरणप्रसंगी व्यक्त केली. एन. नारायण मूर्ती व सुधा मूर्ती यांना जाहीर झालेला विशेष पुरस्कार सुधा मूर्ती यांनी स्वीकारला.

'द हिंदू' या इंग्रजी दैनिकाच्या ग्रामीण आवृत्तीचे संपादक पी. साईनाथ, हैदराबाद येथील इंडियन स्कूल ऑफ बिझनेसचे (आयएसबी) अधिष्ठाता प्रा. अजित रांगणेकर, खासदार दीपेंदरसिंग हुडा, डॉ. जब्बार पटेल, डॉ. अशोक झुनझुनवाला यांना या पुरस्काराने गौरविण्यात आले. प्रत्येकी सव्वा लाख रुपये, स्मृतिचिन्ह व ताम्रपट असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

या पुरस्काराची रक्कम मूर्ती यांनी संस्थेला परत केली. या रकमेतून संगणक क्षेत्रातील विद्यार्थ्यांना मूर्ती यांच्या नावाने गुणवत्ता पुरस्कार देण्यात यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. 'वनराई'चे अध्यक्ष मोहन धारिया, विद्यापीठ अनुदान आयोगाचे (यूजीसी) माजी अध्यक्ष व ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रा. यशपाल, डॉ. रघुनाथ माशेलकर, डॉ. विजय भटकर यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. महापौर मोहनसिंग राजपाल, 'एमआयटी'चे संस्थापक डॉ. विश्वनाथ कराड या वेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

विदर्भातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या अप्रकाशित कवितांचा संग्रह प्रकाशित करण्यात येईल, असे साईनाथ यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले.

कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या जवळपास सर्वच पाहुण्यांनी पुण्याशी असलेल्या नात्याचा उल्लेख केला. भाषणाची सुरवात कोणत्या भाषेत करू, असा प्रश्न करीत पुण्याशी माझे नाते आहे, कारण ५७ वर्षांपूर्वी याच शहरात माझा विवाह झाला आहे, अशी आठवण प्रा. यशपाल यांनी सांगितली. हे शहर माझ्यासाठी माहेर असल्याचे सुधा मूर्ती यांनी सांगितले, तर पुण्यातील वास्तव्याची व इन्फोसिसमधील पहिल्या नोकरीची आठवण खासदार हुडा यांनी सांगितली. प्रा. अजित रांगणेकर यांनीही आपण पुणेकर असल्याचे सांगितले.

## * साहित्य रंगभूमी प्रतिष्ठानच्या अभ्यासवृत्ती

रंगभूमीसाठी सकारात्मक पद्धतीने कार्यरत असणाऱ्या नवोदित कलाकारांसाठी 'साहित्य रंगभूमी प्रतिष्ठान' या न्यासातर्फे या वर्षी निपुण धर्माधिकारी, धर्मकीर्ती सुमंत, शशांक शेंडे, अनिता दाते आणि पूजा स्वरूप यांना प्रत्येकी एक लाख

रुपयांची अभ्यासवृत्ती २८ फेब्रुवारीला 'पृथ्वी थिएटर ग्रुप' च्या संचालक संजना कपूर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

सर्जनशील, प्रतिभावंत नव्या कलाकारांशी केवळ आर्थिक अडचणींपोटी कलानिर्मितीकडे पाठ फिरवू नये, यासाठी 'प्रीमिअर ऑटोमोबाइल्स'चे माजी अध्यक्ष विनोद दोशी यांच्या नावाने देण्यात येणाऱ्या या अभ्यासवृत्तीचा विनियोग कलाकाराला मनाप्रमाणे करता येतो. त्यासाठी 'साहित्य रंगभूमी प्रतिष्ठान' या न्यासातर्फे कोणत्याही अटींचे बंधन नसते.

अभ्यासवृत्ती मिळविणारा निपुण धर्माधिकारी 'नाटक कंपनी' या प्रायोगिक उपक्रमाद्वारे रंगभूमीवर सातत्याने वेगळे प्रयोग करत आहे.

पूजा स्वरूपची नाटके आकाश खुराणा, अनुराग कश्यप, सुनील शानभाग, चैतन्य ताम्हाणे, रजत कपूर, मृण्मयी लागे यांनी दिग्दर्शित केली आहेत.

अनिता दाते रंगभूमी आणि चित्रपट दोन्ही माध्यमांत कार्यरत आहे. 'गंध', 'अडगुलं मडगुलं', 'जोगवा', 'सनई चौघडे' अशा चित्रपटांतून तिने अभिनय केला आहे.

शशांक शेंडे अभिनेता, लेखक आणि दिग्दर्शक म्हणून परिचित आहे.

धर्मकीर्ती सुमंत नव्या पिढीचा गुणवंत लेखक आहे.

*** पन्नालाल सुराणा यांना प्रबोधनकार पुरस्कार**

''जात, पैसा आणि मनगटाच्या जोरावर राजकारणात वर्चस्व मिळविण्याचा प्रयत्न केला जात आहे. सर्व पातळ्यांवर बिघाड झालाय. या पार्श्वभूमीवर समाजवादी विचारवंत पन्नालाल सुराणा यांचे काम स्वत: जळून इतरांना प्रकाश देणाऱ्या पणतीसारखे आहे. आपल्या राजकीय जीवनात सुराणा यांनी घालून दिलेले आदर्श आजच्या तरुण पिढीसाठी मार्गदर्शक आहेत,'' असे मत गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी व्यक्त केले.

मारवाडी फाउंडेशनच्या वतीने दिला जाणारा 'प्रबोधनकार ठाकरे' पुरस्कार सुराणा यांना प्रदान करण्यात आला. एक लाख रुपये, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नितीन गडकरी, ज्येष्ठ समाजवादी विचारवंत भाई वैद्य, फाउंडेशनचे प्रमुख गिरीश गांधी यावेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

पाटील म्हणाले, ''सुराणा यांनी संपूर्ण जीवन समाजासाठी वाहिलेले आहे. त्यांचा सत्कार हा राजकारणात व समाजकारणात नि:स्पृहपणे काम केलेल्या जीवनाचा सत्कार आहे. या पार्श्वभूमीवर सध्याच्या राजकारणात अनेक गोष्टी बिघडल्या आहेत. सर्वच पातळ्यांवर सुधारणांची गरज आहे. मात्र, सुरवात कुठून करायची हा

प्रश्न आहे. माध्यमांनीही काही मूल्ये पाळण्याची गरज निर्माण झाली आहे. संपूर्ण व्यवस्थेत समाजाला काही मूल्ये जपण्याची गरज आहे. हे सर्व बदलण्यासाठी सर्व राजकीय पक्षांनी स्वत:चा किमान समान कार्यक्रम तयार करण्याची गरज आहे. कोणत्याही अनिष्ट गोष्टींना थारा द्यायचा नाही, हे या कार्यक्रमाचे सूत्र असले पाहिजे.''

राजकारणात कमी होत असलेली ध्येय निष्ठा हा चिंतेचा विषय आहे, असे मत गडकरी यांनी व्यक्त केले. ते म्हणाले, ''सुराणा यांनी आयुष्यभर विचारांवर निष्ठा ठेवून काम केले. आणीबाणीच्या विरोधात लढणाऱ्यांमध्ये सुराणा अग्रभागी होते. त्या काळात लोकशाही वाचविण्याचे मोठे काम त्यांनी केले. आज मात्र राजकारणात जात वापरली जात आहे. विचारांशी निष्ठा दुय्यम मानली जात आहे. जातीच्या आधारे निवडणुका लढविल्या जात आहेत. हे बदलण्यासाठी विचारांशी बांधिलकी मानणारी नवी पिढी निर्माण होण्याची गरज आहे, या परिस्थितीत सुराणा यांचे काम प्रेरणादायी आहे.''

सत्काराला उत्तर देताना सुराणा म्हणाले, ''ज्यांच्याकडे पैसे आहेत अशा मारवाडी समाजाच्या संस्थांनी अल्पसंख्य असल्याचा फायदा घेऊन अल्पसंख्य संस्थांसाठीच्या सवलती मिळवू नयेत. या सवलतींचा फायदा वंचित घटकाला मिळाला पाहिजे.'' मोहन धारिया यांनी अध्यक्षीय भाषण केले. भाई वैद्य यांनी सुराणा यांच्याविषयी माहिती दिली. युवराज शहा यांनी पुरस्काराविषयी माहिती दिली. गिरीश गांधी यांनी प्रास्ताविक भाषण केले. अभय छाजेड यांनी स्वागतपर भाषण केले. बाळ कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. मंगेश कश्यप यांनी आभार मानले.

*** ठाणेदार शिष्यवृत्ती**

अमेरिकास्थित भारतीय उद्योगपती डॉ. श्रीनिवास ठाणेदार यांनी स्थापन केलेल्या फाउंडेशनच्या वतीने मराठी भाषेतील संशोधनासाठी ५ लाख रुपयांच्या पहिल्या शिष्यवृत्तीची घोषणा नुकतीच करण्यात आली. त्यामध्ये 'लोकसत्ता'चे चंद्रपूर प्रतिनिधी देवेंद्र गावंडे व वरुड येथील वार्ताहर प्रकाश विंचूरकर यांच्यासह एकूण ९ पत्रकार संशोधकांचा समावेश आहे. या सर्वांना शिष्यवृत्ती विभागून देण्यात आली आहे.

'नक्षलग्रस्त प्रदेशांचा प्रवास, अभ्यास आणि विश्लेषण' यावर विषयावर गावंडे अभ्यास करणार असून 'मेळघाटाचे बिकट वास्तव' हा विंचूरकर यांचा अभ्यासविषय आहे. याशिवाय शिष्यवृत्ती लाभार्थींमध्ये अन्य सात जणांचा समावेश आहे. त्यामध्ये कोल्हापूर येथील ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर (महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीचे आर्थिक-सामाजिक-राजकीय योगदान, परिणाम आणि वाटचाल), ठाणे येथील प्रा. डॉ. नीता साने (महाराष्ट्रातील प्रायोगिक शिक्षणाचे नवे प्रयोग), मुंबई येथील विजय चोरमारे (ग्रामीण विकासात स्त्रियांचे योगदान), पुणे येथील प्रा. डॉ.

अलका वाडकर (उच्चशिक्षित गृहिणींचा मनोसामाजिक अभ्यास), व नीलिमा बोरवणकर (अनिवासी मुला-मुलींचे भारतातील एकाकी पालक), नाशिक येथील स्वानंद बेदरकर (धर्मकृत्यांची गावे आणि तेथील बदलते वास्तव), फलटण येथील प्रा. डॉ. माधुरी वाणी (महाविद्यालयीन तरुणी आणि 'विवाह संस्था') यांचा समावेश आहे.

संशोधन शिष्यवृत्तीसाठी फाउंडेशनकडे एकूण ६३ प्रस्ताव आले होते. त्यातून नऊ जणांची निवड करण्यात आली आहे.

बदलत्या महाराष्ट्राचे समकालीन चित्र मांडणाऱ्या सामाजिक संशोधनाला चालना मिळावी, यासाठी वार्षिक शिष्यवृत्ती योजना आखण्यात आल्याचे डॉ. ठाणेदार यांनी सांगितले. केलेल्या कामाला पुरस्कार देण्याऐवजी काम करू इच्छिणाऱ्या संशोधकांना आर्थिक पाठबळ देण्याची ही योजना आहे. 'ही श्रीची इच्छा' या आत्मकथनामुळे अवघ्या महाराष्ट्राला परिचित झालेले डॉ. ठाणेदार मूळ बेळगावचे असून अमेरिकेतील महाराष्ट्र मंडळाच्या कार्यात त्यांचा सहभाग असतो.

### * राज्य नाट्यस्पर्धेत 'द डेथ ऑफ अ कॉन्करर' सर्वप्रथम

४९व्या राज्य प्रादेशिक नाट्यस्पर्धेत मुंबईच्या पोलीस कल्याण केंद्र कला विभागाचे 'द डेथ ऑफ अ कॉन्करर' हे नाटक सर्वप्रथम आले. तर पुण्याच्या समन्वय संस्थेचे 'टेंगशेच्या स्वप्नात ट्रेन' द्वितीय आणि जय मल्हार शैक्षणिक-सामाजिक संस्थेचे 'कलहरेषादग्ध पौर्णिमेचा चंद्रव्यूह' तृतीय विजेते ठरले. संपूर्ण राज्यभरातून १८ केंद्रांतून २८५ प्रवेशिका प्रादेशिक नाट्यस्पर्धेसाठी आल्या होत्या. परीक्षक म्हणून मंगेश कदम, बाबा पार्सेकर, विजय मोंडकर, शिवदास घोडके आणि नीना राऊत यांनी काम पाहिले.

स्पर्धेचा निकाल :

**सर्वोत्कृष्ट नाटके**

प्रथम - 'द डेथ ऑफ अ कॉन्करर' - पोलीस कल्याण केंद्र कला विभाग, मुंबई
द्वितीय - 'टेंगशेच्या स्वप्नात ट्रेन' - समन्वय, पुणे
तृतीय - 'कलहरेषादग्ध पौर्णिमेचा चंद्रव्यूह' - जय मल्हार शैक्षणिक सामाजिक संस्था, मुंबई
चतुर्थ - 'पुरात भविष्य' - सृजन सामाजिक संस्था, पणजी, गोवा.
पाचवे - 'आला रे राजा' - मिती चार, कल्याण.

**दिग्दर्शन -** प्रथम - शशांक शेंडे - 'टेंगशेच्या स्वप्नात ट्रेन'
द्वितीय - सुनी कदम - 'द डेथ ऑफ अ कॉन्करर'
तृतीय - नील सुखटणकर - 'कलरेषादग्ध पौर्णिमेचा चंद्रव्यूह'
चतुर्थ - अभिजीत दळवी व संजय लोळगे - 'द डेथ ऑफ अ कॉन्करर'
पाचवे - संजय काशीकर - 'माझिया मना'

**प्रकाशयोजना -** प्रथम - सुनील देवळेकर - 'कलहरेषादग्ध पौर्णिमेचा चंद्रव्यूह'
द्वितीय - अरुण मडकईकर - 'द डेथ ऑफ अ कॉन्करर'
तृतीय - किशोर बत्तासे - 'उजळल्या साऱ्या नव्या दिशा.'
**नेपथ्यरचना :** प्रथम - प्रदीप पाटील - 'द डेथ ऑफ अ कॉन्करर'
द्वितीय - शाम भुतकर - 'टेंगशेच्या स्वप्नात ट्रेन'
तृतीय - सुरेश गोसावी - 'कलहरेषादग्ध पौर्णिमेचा चंद्रव्यूह'
**संगीत/पार्श्वसंगीत :** प्रथम - महेश वेंगुर्लेकर आणि धिरेश ठाकूर - 'द डेथ ऑफ अ कॉन्करर'
द्वितीय - प्रदीप वैद्य - 'टेंगशेच्या स्वप्नात ट्रेन'
तृतीय - मयुरेश केळकर - 'आला रे राजा'
**अभिनय रौप्यपदके**
प्राची पंडित - 'कलहरेषादग्ध पौर्णिमेचा चंद्रव्यूह'
श्वेता पेंडसे - 'माझिया मना'
स्नेहल नाईक - 'पुरातन भविष्य'
शोभा दांडगे - 'फाटकं आभाळ'
सुशील इनामदार - 'द डेथ ऑफ अ कॉन्करर'
अमोल देशमुख - 'यस माय डिअर'
हेमंत पाटील - 'आहे मदन तरीही'
ललित भदाणे - 'आला रे राजा'
**अभिनय प्रमाणपत्र :** रुपाली देशमुख - 'द डेथ ऑफ अ कॉन्करर'
भुवनी शहा - 'टेंगशेच्या स्वप्नात ट्रेन'
नुपूर चितळे - 'चिऊचं घर मेणाचं'
नंदू सावंत - 'द डेथ ऑफ कॉन्करर'
**कलाकार -** रानडे 'माझिया मना'
चंद्रशेखर जोशी - 'अतर्क्य'
रोहित तांबोळी - 'द डेथ ऑफ अ कॉन्करर'
आर्यन दाभोळकर - 'माझिया मना'
नरेश पाटील - 'आहे मदन तरीही.'

### * 'वेगे वेगे धावू' आणि 'हाफ पॅन्ट'ला पारंगत सन्मान

'हाफ पॅन्ट' (मिथक, मुंबई) या एकांकिकेने खुल्या गटात तर डी. जी. रुपारेल महाविद्यालयाच्या 'वेगे वेगे धावू' या एकांकिकेने आंतरमहाविद्यालयीन गटात 'अस्तित्व' आयोजित 'पारंगत सन्मान २०१०' वर मोहोर उमटविली. तसेच अभिनय कल्याणच्या

'तात्कालिक सत्याचे वारकरी' या एकांकिकेला विशेष परीक्षक सन्मानाने गौरविण्यात आले. अद्वैत दादरकरने दोन्ही गटांत पारंगत दिग्दर्शकाचा मान पटकावण्याची किमया साधली. वर्षभरात एकांकिकांमधील सर्वोत्तम 'पारंगत सन्मान २०१०' पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम पु. ल. देशपांडे कला अकादमीत झाला. यंदाच्या वर्षी आंतरमहाविद्यालयीन गटात वर्षभर तीन-चार एकांकिकांनीच वर्चस्व गाजविले. खुल्या गटात यंदा मुंबई, पुणे, कल्याणच्या एकांकिकांमध्ये विशेष चुरस दिसून आली. खुल्या गटात अ. भा. मराठी नाट्य परिषदेच्या पुणे शाखेच्या 'दृष्टी' या एकांकिकेमधील भूमिकांसाठी दिग्पाल लांजेकर आणि रश्मी देव यांना अनुक्रमे पारंगत अभिनेता आणि अभिनेत्री सन्मानाने गौरविण्यात आले. महाविद्यालयीन गटात रुपारेलच्या 'वेगे वेगे धावू'मधील भूमिकेसाठी आरती मोरे पारंगत अभिनेत्री ठरली. तर भवन्सचा समीर खांडेकर 'पार्टनर्स' एकांकिकेसाठी पारंगत अभिनेता ठरला. राजन ताम्हणे, प्रतिमा कुलकर्णी, नंदलाल रेळे, जयवंत देसाई, जयंत पवार, अशोक पाटोळे, संतोष पवार आणि विद्याधर पाठारे यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

**पारंगत सन्मान २०१० चा निकाल**

खुला गट - पारंगत एकांकिका : 'हाफ पॅन्ट' (मिथक, मुंबई); पारंगत दिग्दर्शक : अद्वैत दादरकर (हाफ पॅन्ट); पारंगत लेखक : प्रशांत शेंबेकर (तात्कालिक सत्याचे वारकरी); पारंगत अभिनेता : दिग्पाल लांजेकर; पारंगत अभिनेत्री : रश्मी देव (दृष्टी)

आंतरमहाविद्यालयीन गट : पारंगत एकांकिका : 'वेगे वेगे धावू' (डी.जी. रुपारेल महाविद्यालय); पारंगत दिग्दर्शक : अद्वैत दादरकर (वेगे वेगे धावू); पारंगत लेखक : सुखदा आयरे (पार्टनर्स); पारंगत अभिनेता : समीर खांडेकर (पार्टनर्स); पारंगत अभिनेत्री : आरती मोरे (वेगे वेगे धावू)

तांत्रिक विभाग : पारंगत प्रकाशयोजनाकार : संजय तोडणकर (सायलेंट स्क्रीम); पारंगत नेपथ्यकार : इरावती कर्णिक (हाफ पॅन्ट); पारंगत संगीतकार : नेहा परांजपे (दृष्टी); विशेष परीक्षक पारंगत सन्मान : संदीप रेडकर (उजवा अंगठा असता तर); तात्कालिक सत्याचे वारकरी (अभिनय कल्याण)

## * 'सावरकर विचार साहित्य प्रसारक' म्हणून कौतुक व्हावे

स्वातंत्र्यवीर सावरकर मराठी साहित्य संमेलनात 'साहित्यरत्न' पुरस्कार देण्याऐवजी 'सावरकर विचार साहित्य प्रसारक' म्हणून आपले कौतुक व्हावे, अशी इच्छा १८५७ स्वातंत्र्यसमर शतकोत्तर सुवर्णमहोत्सव समितीचे सचिव सूर्यकांत पाठक यांनी व्यक्त केली.

संमेलनाचे स्वागताध्यक्ष नीलेश गायकवाड यांनी पाठक यांना 'साहित्यरत्न' पुरस्काराने सन्मानित करण्याचे ठरविले होते. तथापि पाठक ''मी साहित्यिक नाही. एकही पुस्तक मी आजवर लिहिलेले नाही. चांगले पुस्तक वाचणे इतकाच माझा व साहित्याचा संबंध आहे.''

सावरकरांचे विचारसाहित्य सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी स्वातंत्र्यवीर सावरकरांचे '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' हा ग्रंथ ग्राहकहित प्रकाशनाने एक लाख घरांपर्यंत अल्प मूल्यात पोहोचविण्याचा संकल्प केला. त्याला उत्स्फूर्त प्रतिसादही मिळाला. त्यामुळे 'साहित्यरत्न' पुरस्कार न देता 'सावरकर विचार साहित्य प्रसारक' म्हणून पाठीवर थाप द्यावी, अशी विनंती पाठक यांनी केली.

*** कुसुमाग्रज प्रतिष्ठानचे 'गोदावरी गौरव' पुरस्कार**

कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या वतीने 'गोदावरी गौरव' पुरस्कार यंदा अब्दूल जब्बार खान, डॉ. राम ताकवले, प्रभाकर कोलते, अब्दूल हलीम जाफर खान, शाहीर साबळे व विष्णू झेंडे यांना १० एप्रिल रोजी डॉ. जब्बार पटेल यांच्या अध्यक्षतेखाली प्रदान करण्यात आले. समाजाचे सांस्कृतिक जीवन संपन्न करणाऱ्या व्यक्तींना प्रतिष्ठानतर्फे दोन वर्षातून एकदा हा पुरस्कार दिला जातो. ११ हजार रुपये, सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

२६/११च्या मुंबई हल्ल्यात छत्रपती शिवाजी टर्मिनसवर अतिरेक्यांकडून झालेल्या गोळीबारप्रसंगी प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी प्रसंगावधान रोखून उद्घोषणा करणारे विष्णू झेंडे यांना 'साहस' गटातील पुरस्कार दिला गेला. संगीत गटात इंदूरच्या बंदे अलीखान घराण्याचे उस्ताद अब्दूल हलीम जाफरखान यांची निवड करण्यात आली. रंगाची जादू कॅन्व्हासच्या माध्यमातून साकारणारे प्रभाकर कोलते यांना चित्र गटासाठी पुरस्कार देण्यात आला. पेंटिंगच्या पारंपरिक चौकटीत स्वत:ला अडकवून न घेता विविध वस्तूंची रचना करून कलाकृती तयार करण्याच्या कलेत ते निष्णात आहेत.

महाराष्ट्राच्या शाहिरी परंपरेतील नामवंत व्यक्तिमत्त्व म्हणून शाहीर साबळे यांना गौरविण्यात आले. त्यांनी मुक्तनाट्य या आगळ्या संकल्पनेची निर्मिती करून लोकनाट्य या लोककलेच्या प्रकाराला समाजाच्या सर्व स्तरात प्रतिष्ठा मिळवून दिली. पुणे व यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ यांचे कुलगुरुपद भूषविणाऱ्या डॉ. राम ताकवले यांना ज्ञान क्षेत्रासाठी पुरस्कार दिला गेला. भोपाळ येथील युनियन कार्बाइड कंपनीत १९८४मध्ये झालेल्या वायु गळतीमुळे निराधार झालेल्या व्यक्तींच्या मदतीसाठी भोपास गॅस पीडित महिला उद्योग संघटनेची स्थापना करणाऱ्या अब्दुल जब्बार खान यांना लोकसेवा गटातून पुरस्कारासाठी निवडण्यात आले.

### * श्रमजीवी मंडळाला माणूस प्रतिष्ठान पुरस्कार

माणूस प्रतिष्ठातर्फे देण्यात येणारा 'श्रीगमा विधायक कृतिशीलता पुरस्कार' सातारा येथील श्रमजीवी जनता सहाय्यक मंडळ या संस्थेला 'माणूस' साप्ताहिकाचे संस्थापक-संपादक श्री. ग. माजगावकर यांच्या तेराव्या स्मृतिदिनी देण्यात येणार आहे. सन्मानपत्र, अकरा हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे. कोयना धरणामुळे विस्थापित झालेल्या कुटुंबात जन्मलेल्या बाळासाहेब कोळेकर यांनी श्रमजीवी जनता सहायक मंडळाच्या माध्यमातून तीस वर्षे सातारा आणि कोकणातील विस्थापित, गरीब आणि उपेक्षित लोकांसाठी भरीव कार्य केले. कार्यकर्त्यांची फळी उभी करून आणि सहकारी संस्थांचे जाळे विणून त्यांनी शिक्षण-शेती आणि रोजगारनिर्मितीचे काम केले आहे.

याशिवाय पत्रकारितेचे प्रशिक्षण घेणाऱ्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शलाका सोमण यांच्या देणगीतून देण्यात येणाऱ्या पंधराशे रुपयांच्या शिष्यवृत्तीसाठी प्रतिष्ठानतर्फे पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या विभागातील विद्यार्थी रामकिशन भंडारे यांची निवड झाली.

### * दाभोलकर यांना शेवडे हिंदी सेवा पुरस्कार

हिंदी अध्ययन मंडळाचे पाठ्यपुस्तक सदस्य आणि महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेचे प्रचार शिक्षणप्रमुख गोविंद दाभोलकर यांना महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीचा 'अनंत गोपाळ शेवडे हिंदी सेवा पुरस्कार' जाहीर झाला. राज्यात हिंदी प्रचार कार्यात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल त्यांची निवड झाली असून, पुरस्कार एक्कावन्न हजार रुपयांचा आहे. दाभोलकर हे १९५६ पासून हिंदीच्या प्रसारासाठी कार्यरत असून, महाराष्ट्र हिंदी शिक्षण महामंडळाच्या जडणघडणीत त्यांचा मोलाचा सहभाग आहे. 'हिंदी अध्यापक मित्र'चे कार्यकारी संपादक म्हणून ही त्यांनी काम केले आहे.

### * राज्यस्तरीय उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार

सिल्लोड येथील लीलादेवी सिताराम अग्रवाल ट्रस्टतर्फे दरवर्षी क आणि ड वर्गातील ग्रंथालयांना दिल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय पुरस्कारासाठी बोरी (जि. परभणी) येथील कै.जयकुमार जैन सार्वजनिक वाचनालयाची निवड करण्यात आली आहे. रोख ५०००/- रुपये, स्मृतीचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. या पुरस्काराप्रमाणेच ग्रंथालय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यास राज्यस्तरावर उत्कृष्ट ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कार देण्यात येतो. रोख ५०००/- रुपये, स्मृतिचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. यावर्षी या पुरस्कारासाठी मुंबई येथील महाराष्ट्र मित्र मंडळ ग्रंथसंग्रहालय आणि मोफत वाचनालयाचे मधुसूदन रामचंद्र बागवे यांची निवड करण्यात आली आहे. ❐

# वाचकांचा प्रतिसाद



श्री. सारडा

सस्नेह नमस्कार

मेहता मराठी ग्रंथजगत दिपावली विशेषांक ०९ संपूर्ण वाचला. एकदम झकास, वाचनीय. वेगवेगळी शहरे आणि वेगवेगळे लेखक यामुळे मजकूर रंगतदार आहे. जगाच्या कानाकोपऱ्यात भ्रमण केल्याचा आनंद मिळाला. पर्यटनाच्या संदर्भात अंक संग्रहणीय आहे.

अनिल दांडेकर
८२०/७ भांडारकर रोड, श्रीकृष्ण कुंज, पुणे ४११ ००४.

प्रिय सुनंदा मॅडम,

'मी सायूरी' हे अनुवादित पुस्तक माझ्या वाचनात आले. त्याद्वारे जपानमधील गेशांच्या जीवनाची ओळख झाली. एका गेशेच्या जगण्याची, अंतिम उद्दिष्टापर्यंत जाण्याची धडपड लक्षात आली. त्यांच्या जगण्याला सुद्धा एक प्रकारचा वेगळाच दर्जा होता, असे दिसून आले.

मला हे पुस्तक खूप आवडले. भाषाशैलीसुद्धा खूप सुरेख आहे. कोठेही अश्लील, बीभत्स असे वाटत नाही. त्या सायूरीचा एकतरी फोटो पुस्तकात हवा, असे वाटते. जर तुमच्याकडे असेल तर पहायची इच्छा आहे.

तुमच्या अनुवादामुळे एवढे मोहक चरित्र वाचायला मिळाले म्हणून तुमची मन:पूर्वक आभारी आहे.

सौ. मानसी मितेश घट्टे
इस्लामपूर ४१५ ४०९.

प्रिय प्रा. दिपा महानवर,

सप्रेम नमस्कार

आपली आत्मकहाणी वाचून पूर्ण होताच, संवाद साधण्याची उर्मी आली.

खेडुत धनगर शेतकऱ्याची गरिबी. खायची भ्रांत, जातीय अवहेलना. तशा घरातला धोंडीराम कर्मवीरांच्या रयत शाळेत बुद्धीची चमक दाखवतो. प्रतिकूल परिस्थितीच्या टाकीचे घाव अशा कोनात झेलतो की त्यातून प्रकाशमान दीप 'दिपा' तयार होतो.

प्रापंचिक कुतरओढ चालू असतानाही त्याने समाजकार्य केले. श्रमदानाने गावचा रस्ता केला, गावात एस.टी. आणली, वीज आणली, चेअरमन होऊन सहकारी सोसायटी गाळातून वर काढली. धनगरवाडीत शाळा सुरू केली. या कर्तृत्वाने त्याचे कुटुंब पंचक्रोशीत नामांकित झाले.

विशेष म्हणजे त्याच त्या क्षेत्रात केंद्रीभूत न होता, प्रश्न मार्गी लागताच तेथून दूर व्हावे ही समाजकार्यातील, राजकारणातील भूमिका उचित, उठावदार व उल्लेखनीय वाटते.

पुणे विद्यापीठ पातळीवरील व राज्यस्तरावरील प्राध्यापक संघटनेचा नेता म्हणून कारकीर्द चळवळींनी गजबजलेली आहे. प्रत्येक चळवळीत यश मिळेपर्यंत पिच्छा पुरवला.

प्राचार्य झाल्यावर विद्यार्थ्यांचा मनातील महत्त्वाकांक्षा फुलवली, हुशारीला प्रोत्साहन दिलं. बीएस्सीच्या पहिल्या बॅचची विद्यार्थिनी विद्यापीठात सर्वप्रथम आली. आश्चर्य! त्या यशाचे भावपूर्ण वर्णन केले आहे. ''यश मिळवलं वंदनानं, छाती मात्र फुगली आमची! या धवल यशाचं मातृत्व आम्हाला प्राप्त करून देणाऱ्या वंदनाचे आम्ही ऋणी आहोत!''

प्राध्यापक असताना काहीवेळा गैरसोईने बदल्या झाल्या. परंतु आकांडतांडव न करता, कटुता न बाळगता संकटाचे रूपांतर संधीत केले.

लेखनाला विशेषत: 'पेर' या पहिल्या भागाला ग्रामीण वळण आहे. मराठी बोली भाषेतील लोभस शब्द भेटतात. आनंद देतात. ग्रामीण शब्द शहरी वाचकाला परके वाटतील म्हणून टाळले नाहीत, ते 'ब्येस' झालं. त्यामुळं लेखनाचा देखणा बाज सुरक्षित राहिला.

लढ्यांची चित्रणे मात्र त्रोटक वाटली. उग्र संघर्ष विस्ताराने चित्रित केले असते तर त्यातले नाट्य वाचकाच्या काळजावर कोरले गेले असते.

संयम हा एकूण लेखनाचा स्थायीभाव आहे. स्वत:च्या सुखदु:खात तुम्ही मौन बाळगता. संस्था व संसार या दोन डगरीवरून जाताना अनेकदा घुसमट झाली असेल. तिचं विस्तृत चित्रण निदान काही प्रसंगांतून यायला हवं होतं. तुमची शैली

ओघवती, प्रासादिक आहे. संगीतावर प्रेम करणाऱ्या, गोड गाणाऱ्या जिद्दी दिपाने आपले जीवनगीत मधुर केले त्याचा आनंद आहे.

तुमचे मनस्वी आत्मकथन, प्रांजळ लेखन माझ्या रुचीस आले. 'विमुक्ती'ने मराठी वाङ्मयात मोलाची भर घातली आहे असे मला वाटते.

मनस्वी अभिनंदन!

प्रा. डॉ. सुधाकर के. भोसले.
पुणे

---

आदरणीय श्री सुनीलजी मेहता,

सा.न.वि.वि.

उत्तम लेखन कृती जनसामान्यांपर्यंत पोहोचवणे, पुस्तकांची गोडी लावणे, लेखकाविषयी आदर निर्माण करणे आणि ही समृद्ध साहित्यपरंपरा जपणे यासाठी आम्ही एक व्यासपीठ निर्माण केलंय. 'वेचू अक्षरे' नावाचं! आम्ही अभिव्यक्तीचे एक अनोखे माध्यम निवडले आहे 'अभिवाचन'. केवळ वाचिक अभिनयावर बेतलेले.

'वेचू अक्षरे'च्या व्यासपीठावरून रणजित देसाई यांच्या कथाकादंबऱ्यांचे अभिवाचन करण्याची इच्छा आहे. आम्ही कोवाडला जाऊन आलो. भव्यदिव्य 'प्रभूछाया', समृद्ध 'रणजित देसाई सार्वजनिक ग्रंथालय', आदरणीय पारूताई, निष्ठावान लेखनिक श्री. पांडुरंग कुंभार, हिरवेगार कोवाड आणि साहित्य 'स्वामी' रणजित देसाईंची भन्नाट लेखणी या साऱ्यांची भुरळ पडली. लेखक म्हणून रणजितदादा थोर आहेतच पण माणूस म्हणूनही ते तितकेच महान होते. हे त्यांचं वेगळेपण विशेष भावलं. म्हणून अभिवाचन प्रयोगाचा शुभारंभ 'स्वामी'कारांच्या कादंबरीने करावा अशी इच्छा आहे.


'स्वामी', 'श्रीमानयोगी' च्या पलीकडेही रणजित देसाई आहेत. शेकरा, अभोगी, प्रतीक्षा, समिधा, रूपमहाल ते बाबुलमोरा या सगळ्या सगळ्यातून ते विविध अंगांनी वेगळेच उलगडत जातात. हे अभिवाचनातून सादर करण्याची इच्छा आहे. यासाठी आपले सहकार्य, मार्गदर्शन आवश्यक आहे. आपली संमती मिळावी.

कळावे.

कु. प्राजक्ता गव्हाणे, कु. स्नेहा कुलकर्णी
चिंचवड, पुणे.

# श्रद्धांजली


*** ज्येष्ठ विनोदी साहित्यिक बाळ गाडगीळ**



आपल्या खुमासदार शैलीने वाचकांना खळखळून हसायला लावणारे ज्येष्ठ विनोदी लेखक, सिंबायोसिस संस्थेचे उपाध्यक्ष, फर्ग्युसन कॉलेजचे माजी प्राचार्य पांडुरंग लक्ष्मण उर्फ बाळ गाडगीळ यांचे दि. २१ मार्च रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते. त्यांच्या मागे पत्नी आणि मुलगा असा परिवार आहे. श्वासोच्छ्वासास त्रास होऊ लागल्याने त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. मूळ कोकणातील गाडगीळ यांचे शालेय शिक्षण पुण्यात तर, पुढील शिक्षण मुंबई येथे झाले. अमेरिकेतील विस्कॉन्सिन विद्यापिठातून त्यांनी अर्थशास्त्रात एम.एस. केले होते. त्यांनी प्राप्तिकर खात्यात काही काळ नोकरी केली, मात्र त्यांचा खरा ओढा अध्यापनाकडे होता. फर्ग्युसन कॉलेजमध्ये ते प्राध्यापक म्हणून काम करत होते. डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या सांगली येथील चिंतामणराव कॉलेज ऑफ कॉमर्स मध्ये एक वर्ष प्राचार्य म्हणून काम केल्यावर ते फर्ग्युसन कॉलेजमध्ये सुरवातीला उपप्राचार्य तर नंतर ११ वर्ष प्राचार्य होते. पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू म्हणूनही त्यांनी एक वर्ष काम पाहिले. त्यानंतर ते सिंबायोसिस संस्थेशी जोडले गेले. सुरवातीला सल्लागार म्हणून, तर नंतर संस्थेचे उपाध्यक्ष म्हणून ते कार्यरत होते.

गाडगीळ यांनी साठहून अधिक पुस्तके लिहिली. त्यांच्या 'लोटांगण' या पहिल्याच विनोदी कथासंग्रहाला पु.ल. देशपांडे यांच्या 'अपूर्वाई' या पुस्तकाबरोबर राज्यसरकारचा पुरस्कार विभागून मिळाला होता. बडोदे येथे झालेल्या मराठी वाङ्मय परिषदेचे, मुंबईत झालेल्या विनोदी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले होते. 'एकच प्याला, पण कोण?', 'अखेर पडदा पडला', 'फिरकी', 'वशिल्याचा तट्टू' अशा अनेक पुस्तकांनाही लोकप्रियता मिळाली होती. वळचणीचं पाणी हे आत्मचरित्रही त्यांनी लिहिले होते. विनोदी साहित्याबरोबरच त्यांनी अर्थशास्त्रीय लिखाण, तसेच अनुवादही केले होते.

*** साहित्य प्रसार केंद्राचे राजाभाऊ कुळकर्णी**



विदर्भाच्या वाचनसंस्कृतीचा आधारस्तंभच राजाभाऊ कुळकर्णी यांच्या निधनाने निखळून पडला आहे. राजाभाऊंचे निधन ७६ व्या वर्षी झाले आणि त्यापैकी ५५ वर्षे ते विदर्भात होते. या साडेपाच दशकांच्या काळात राजाभाऊंची भूमिका विदर्भाच्या वाचनसंस्कृतीला वेगवेगळ्या वेगवेगळ्या मार्गांने विकसित करणारी आणि दिशा देणारी ठरली. ते केवळ पुस्तक विक्रेते नव्हते तर, अक्षरांच्या पाऊलवाटांवर अनेक नामवंतांसोबत नवोदितांनाही चालायला लावणारे मार्गदर्शक होते. पुस्तकविक्रीसोबत ते प्रकाशन व्यवसायात शिरले पण, रुढार्थाने ते केवळ साहित्य प्रकाशकच नव्हते तर, साहित्याच्या वाटा उजळून टाकणारा एक दीप म्हणून या काळात राजाभाऊ वावरले. त्यांनी प्रकाशित केलेल्या पुस्तकांच्या यादीवर आणि ते लिहिणाऱ्या लेखकांच्या नावावर नुसती नजर जरी टाकली तरी राजाभाऊंचा साहित्यिक संपर्क आणि आवाका केवढा थक्क करणारा होता, हे सहज लक्षात येते. प्रकाशक म्हणून त्यांचा व्यवहारही वाचनसंस्कृतीला उत्तेजन देणारा, लेखकाचा सन्मान राखणारा आणि प्रकाशित झालेले अक्षरधन वाचकांपर्यंत पोहोचवण्याचा ध्यास घेणारा राहिला.

राजाभाऊंचे साहित्य प्रसार केंद्र केवळ पुस्तक विक्रीचे दुकान म्हणून नागपूर विदर्भात परिचित नव्हते तर, साहित्यिक आणि वाचकांचा तो एक अड्डा आहे. ग्रेस, सुरेश भट, भास्कर लक्ष्मण भोळे, प्रा. वसंत वऱ्हाडपांडे, महेश एलकुंचवार, प्रा. राम शेवाळकर, बाबासाहेब पुरंदरे, अरविंद इनामदार अशी परस्पर विरोधी विचारशैली आणि लेखनाची प्रतिके आहेत, मात्र असे सर्व भिन्न विचार-संस्कृतीचे लेखक, कवी समीक्षक साहित्य प्रसार केंद्रात आपापल्या विचारांच्या झुली बाजूला ठेवून केवळ साहित्य या एका रंगात न्हाऊन निघाले असल्याचे अनेकांनी पाहिले आहे.

❐



# बालनगरी

प्रॅंकलिनचा नवा मित्र १०४

# फ्रँकलिनचा नवा मित्र

मूळ लेखिका - पोलेत बूर्ज्वा  चित्रकार - ब्रेन्डा क्लार्क
अनुवाद - मंजूषा आमडेकर

फ्रँकलिन कायम एकाच शहरात आणि एकाच घरात राहत आला होता. तो त्याच्या मित्रांसोबतच लहानाचा मोठा झाला होता आणि त्याचा प्रत्येकच मित्र त्याच्यासाठी अगदी खास होता.

लपाछपी खेळावीशी वाटायची तेव्हा तो कोल्ह्याला हाक मारायचा. आपला खासम्खास दोस्त जवळ असावा असं वाटायचं, तेव्हा तो अस्वलाला बोलवायचा.

पण त्याच्या गल्लीत एक नवं कुटुंब राहायला आलं. नव्यानं कुणाशी मैत्री करायची संधी त्याला मिळाली

नवीनच राहायला आलेल्या लोकांबद्दल फ्रँकलिनला खूप कुतूहल वाटत होतं.

त्या लोकांनी आपलं सामान गाडीतून खाली काढून घ्यायला सुरुवात केल्यावर तो डोळे मोठे करून पाहतच राहिला. त्या सामानातले पलंग राक्षसांकरता असावेत असं वाटत होतं आणि दिवे तर झाडांइतके उंच होते.



शेवटी फ्रँकलिनला तिथं राहायला येणारं सगळं कुटुंब समोर दिसलं, तेव्हा तर त्याला काय बोलावं तेच सुचेना.

फ्रँकलिननं याआधी कधीच हरीण पाहिलेलं नव्हतं. त्यानं हरणाबद्दल नुसतं ऐकलेलं होतं. हरणाची चित्रंही पाहिलेली होती. पण अगदी ओळखीचं असं एकही हरीण त्याला माहीत नव्हतं. ती हरणं खूपच मोठी होती. फार काय, सर्वात लहान हरीणही चांगलं मोठ्ठंच होतं.


फ्रँकलिन खूप घाबरला, आणि थेट घराकडे पळत सुटला.

''तिकडे एक हरणांचं कुटुंब राहायला आलंय!''

''अरे व्वा, छानच की!'' फ्रँकलिनची आई म्हणाली. ''कदाचित तुला एखादा नवा मित्र मिळेल असं वाटतंय.''

फ्रँकलिननं मान हलवली. ''छे, मला नाही तसं वाटत.''

''तू त्यांना भेटशील तेव्हा त्यांच्याशी प्रेमानं वाग बरं का'' आईनं



त्याला बजावून सांगितलं.

फ्रँकलिन वैतागलाच.

दुसऱ्या दिवशी सकाळी फ्रँकलिनला आपल्या वर्गात एक हरीणं दिसलं.

''तुमच्या नव्या मित्राचं आनंदानं स्वागत करा बरं!'' घुबडसर म्हणाले.

''हॅलो हरीण,'' सगळा वर्ग एका सुरात म्हणाला.

हरणानं पण पुटपुटत हॅलो म्हटलं आणि ते आपल्या पायांकडे पाहायला लागलं.



''हे काही फारसं बोलकं वाटत नाहीये,'' बिव्हर कुजबुजली.

घुबडसरांनी सगळ्यांना सांगितलं की, ते हरीण खूप खूप लांबच्या गावाहून इथं राहायला आलेलं आहे.

''फ्रँकलिन,'' घुबडसर म्हणाले, ''तू या हरणाशी दोस्ती करावीस असं मला वाटतंय.''

फ्रँकलिननं हसण्याचा प्रयत्न केला खरा, पण तो चांगलाच घाबरलेला होता. ते हरीण किती मोठ्ठं होतं!

ते हरीण दिवसभरात एकही शब्द बोललं नाही.

मधल्या सुट्टीत फ्रँकलिन मित्रांबरोबर बाहेर खेळायला गेला.

घुबडसरांनी त्याला आठवण करून दिली की, त्यालाच हरणाशी मैत्री करायची आहे.

''तुला खेळायला यायचंय का?'' फ्रँकलिननं हरणाला विचारलं.



हरणानं त्यावर 'नाही' म्हणून नुसती मान हलवली.


फ्रँकलिनला अगदी हुश्श वाटलं.

मग मधल्या सुट्टीत फ्रँकलिन मित्रांबरोबर फुटबॉल खेळत राहिला. हरीण बिचारं एकटंच उभं होतं.

कोल्ह्यानं बॉल इतक्या जोरात हाणला की तो एका झाडात जाऊन अडकला.

''आता आपल्याला घुबडसरांना बोलावून आणावं लागणार,'' अस्वल कुरकुरलं.

''मला बॉल दिसला,'' हरीण ओरडलं. त्यानं झाडातला बॉल काढला आणि फ्रँकलिनकडे उडवला.



''झकास...'' कोल्हा म्हणाला.

''हां,'' फ्रँकलिन खांदे उडवत म्हणाला.

वर्गात परत आल्यावर घुबडसरांनी फ्रँकलिनला आणि हरणाला बेकरीच्या पदार्थांच्या विक्रीसाठी एक पोस्टर तयार करायला सांगितलं.

''मला कुणाच्या मदतीची गरज नाहीये,'' फ्रँकलिन म्हणाला.

घुबडसर फ्रँकलिनला बाजूला घेऊन म्हणाले. ''त्या बिचाऱ्या हरणाला कसं वाटत असेल याचा विचार तरी करून बघ. ते इथं नवीन आलंय आणि त्याला एकही मित्र नाहीये. ते बहुधा घाबरून गेलं असेल.''

''छे, हरणं कधी घाबरत नसतात,'' फ्रँकलिन म्हणाला. ''किती ढब्बू आहे ते.''

घुबडसरांनी फ्रँकलिनकडे पाहिलं. ''छोटं काय आणि मोठं काय, भीती सर्वांनाच वाटते.''

फ्रँकलिन त्यावर विचार करायला लागला.

फ्रँकलिननं रंग आणि कागद घेतले.

''हरणा, मला जरा मदत करणार का?''

''हो, करीन की,'' हरीण म्हणालं. ''मला चित्रं काढायला खूप आवडतं.''

ते दोघं शेजारी शेजारी बसले आणि चित्र कसं काढावं ते ठरवायला लागले.



बसलेलं असताना ते हरीण फार मोठ्ठं दिसत नसल्याचं फ्रँकलिनच्या लक्षात आलं.

बराच वेळ काम केल्यानंतर पोस्टर खूपच मस्त झालं. त्या दोघांनाही ते आवडलं.

लायब्ररीच्या तासाला फ्रँकलिननं हरणाला पुस्तकं कशी मागून घ्यायची ते शिकवलं.

गोलाकार बरोब्बर वाटोळा कसा कापायचा ते हरणानं फ्रँकलिनला शिकवलं.

त्या दोघांनाही इमारती तयार करायला खूप आवडायचं.

फ्रँकलिनच्या आणि हरणाच्या बऱ्याचशा आवडीनिवडी एकसारख्याच होत्या.

दुपारच्या जेवणाच्या वेळी फ्रँकलिननं अस्वलाबरोबर आणि इतर मित्रांबरोबर हरणाची ओळख करून दिली.

त्यांनाही हरीण आवडलं. शिवाय ते फुटबॉल खूपच छान खेळायचं.

शाळेतून घरी आला तेव्हा फ्रँकलिन खूपच आनंदात होता.

''तुला माहीतीये का आई?'' तो त्याच्या आईला सांगायला लागला. ''अगं, मला एक नवा मित्र मिळालाय.''



''अच्छा, तू त्या हरणाला भेटलास वाटतं?'' आईनं विचारलं. ''कसं आहे रे ते?''

''हरीण खूपच मोठ्ठं आहे,'' फ्रँकलिन म्हणाला. ''पण ते लबाड

किंवा दादागिरी करणारं नाहीये.''

''छान,'' आई म्हणाली. ''मग त्याला यातली काही बिस्किटं नेऊन देणार का?''

फ्रँकलिन हरणाच्या घरी गेला.

त्या दोघांनी मिळून ती बिस्किटं गट्टम करून टाकली.



''तू माझ्याशी मैत्री केलीस, म्हणून मला खूप बरं वाटलं रे...'' हरीण म्हणालं. ''मला आपली भीती वाटत होती की माझ्याशी कुणीच खेळणार नाही.''

''हो का?'' फ्रँकलिन म्हणाला. आपल्याला हरणाची भीती वाटत होती, ही गोष्ट तो आता साफ विसरूनच गेला होता.

मग तेव्हापासून फ्रँकलिन आणि हरीण बघावं तेव्हा एकत्र खेळताना दिसायला लागले. आता फ्रँकलिनचा हा नवा मित्रही त्याच्यासाठी अगदी खास झाला होता.

बिव्हर : घुशीसारखा प्राणी

**तात्पर्य : सर्वांशी प्रेमानं वागावं**

The Secret Seven

# द सीक्रेट सेव्हन

धडाकेबाज छोट्या सात गुप्तहेरांची
१५ पुस्तकांची साहसपूर्ण मालिका...

- द सीक्रेट सेव्हन
- सीक्रेट सेव्हनची साहसी मोहीम
- शाब्बास, सीक्रेट सेव्हन
- रहस्याच्या मागावर सीक्रेट सेव्हन
- आगे बढो, सीक्रेट सेव्हन
- सीक्रेट सेव्हनची यशस्वी कामगिरी
- सीक्रेट सेव्हनची सरशी
- सीक्रेट सेव्हन झिंदाबाद
- सीक्रेट सेव्हन आणि रहस्य
- सीक्रेट सेव्हन समोर कोडं
- सीक्रेट सेव्हनची आतषबाजी
- 'गुणवान' सीक्रेट सेव्हन
- सीक्रेट सेव्हनला धक्का
- सावधान! सीक्रेट सेव्हन
- सीक्रेट सेव्हनची गम्मत जम्मत



**एनिड ब्लायटन | अनु. प्रियंका कुलकर्णी**

**किंमत प्रत्येकी ८०रु. | संपूर्ण सेटची किंमत ९९९रु.**
**एकत्रित पोस्टेज ४० रु.**

# चित्र रंगवा



# ओळखा पाहू



'खान्देशात उमललेले कवित्व'

विजेत्यास रु. १०१ चे रोख पारितोषिक दिले जाईल.

आपली उत्तरे दिनांक ५ मे २०१० पर्यंत आम्हाला मिळायला हवीत.
बरोबर उत्तरे देणाऱ्यांपैकी एकाची ड्रॉ पद्धतीने निवड करण्यात येईल.
निकाल जून २०१०च्या अंकात जाहीर होईल.

**उत्तरे पाठविण्याचा पत्ता :**

मेहता पब्लिशिंग हाऊस, माडीवाले कॉलनी, १९४१ सदाशिव पेठ, पुणे-४११ ०३०.

फेब्रुवारी अंकातील 'ओळखा पाहू'चे उत्तर

मराठीतील एक नामवंत समीक्षक 'द. भि. कुलकर्णी'

स्पर्धेचे विजेते - **शंतनु रामचंद्र पाटील - इचलकरंजी**

भाग्यश्री इंगळे, अर्चित असनारे - अकोला, मोहिते प्रमोदिनी, वासीम पिंजारी - सातारा, सुशिला पाटील, मनोहर गव्हाणे, शिवमंगल चव्हाण, वैशाली कुऱ्हेकर - अमरावती, अरविंद बोकील - सांगली, श्रीकांत खंजकर, मधुकर जांभळे - कोल्हापूर, भीमराव गुंडे - सोलापूर, द.तु.नन्दापुरे - यवतमाळ, सुनील जोशी - ठाणे, शि.वा. आठवले, उज्वला देशपांडे, अशोक सूर्यवंशी, शिवतेज पाटील, श्रीधर ढुमणे, रमेश थेटे, माधवी काळे - पुणे, हेमलता जोहरापूरकर, मिलिंद चोपकर - नागपूर, विकास पवार, केशव मराठे - अहमदनगर, आण्णाभाऊ साठे रेडिओ श्रोता संघ - जालना, धाकलू डवरी - सिंधुदूर्ग

**प्रायोजक**

श्री.राजू जगदीशचंद्र मेहता, मे. हिराचंद नानचंद अँड कंपनी,
**साडी आडतीचे व लुंगीचे होलसेल व्यापारी**
टिळक चौक, मालेगाव, **जि.नाशिक.**

**सूचना -** प्रायोजकांच्या पत्त्यावर उत्तरे पाठवू नका.

# मेहता मराठी ग्रंथजगत

**एप्रिल २००९ पासून वर्गणीदारांसाठी पुस्तक खरेदीवर सवलत**

**एक वर्षाला २०% तीन वर्षांना २५% पाच वर्षांना ३०%**

**एक वर्षाची वर्गणी १५०रु.**

**तीन वर्षांची वर्गणी ३५०रु.**

**पाच वर्षांची वर्गणी ५००रु.**

**तीन किंवा पाच वर्षांसाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट**

३ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'चतुर बोकोबा आणि नशीबवान शेखर'**
लेखिका : वृषाली पटवर्धन
प्रत्येकी ३० रु. ची
पुस्तके भेट!

पोस्टेज २० रू.

५ वर्षांची वर्गणी पाठवल्यास
**'धुमारे'**
लेखिका : माधवी देसाई
हे ७० रु.चे
पुस्तक भेट!

पोस्टेज २० रू.








**भेट पुस्तके प्रती शिल्लक असेपर्यंतच**

**मेहता मराठी ग्रंथजगत,** द्वारा मेहता पब्लिशिंग हाऊस,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे ४११ ०३०. फोन - (०२०) २४४७६९२४


**वर्गणी मनीऑर्डर अथवा डिमांड ड्राफ्टने वरील पत्त्यावर पाठवावी.**

RNI NO-MAHMAR/2000/2739 Licence to post WITHOUT PREPAYMENT/
Regd.No.:L2/RNP/PNW/M/184/09-2011/ L.NO.LWP-50/Posted at Marketyard Pso, Pune
Posting Date 11 April 2010

न वी न

# विज्ञानातील सरस आणि सुरस

विज्ञानइतिहासाची पाने ही शास्त्रज्ञांच्या जीवनकथांनी आणि शोधांच्या रंजक कथांनी नटली आहेत. साध्या सेफ्टी पिनपासून अणुबाँबपर्यंत जे अनेकविध शोध लागले, ते संशोधकांच्या– शास्त्रज्ञांच्या परिश्रमांची, चिकाटीची आणि मुख्यत: त्यांच्या प्रतिमेची साक्ष पुरवितात. विज्ञानइतिहासातील अशीच काही पाने उलगडून दाखविण्याचा हा प्रयत्न.




या पुस्तकात लिओनार्दो द विंची या प्रख्यात चित्रकारातील संशोधक भेटेल, नोबेल, पॉलिंग, साखारॉव्ह, भटनागर हे संशोधक-शास्त्रज्ञ भेटतील, तसेच ॲस्पिरीनपासून विजेच्या दिव्यांपर्यंत अनेक शोधांच्या रंजक कथा वाचायला मिळतील.
विज्ञानातील हे सारे 'सरस' तितकेच 'सुरस'ही आहेत.
ते तितक्याच रंजक पद्धतीने या पुस्तकात मांडलेले आहे.

**डॉ. राहुल गोखले**

**किंमत– १८० रू.  पोस्टेज –२५ रू.**

**मेहता पब्लिशिंग हाऊस**
**१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,**
**टेलिफोन भवन समोर, पुणे - ३०. फोन - (०२०) २४४७६९२४**

प्रति, ______________________

______________________

______________________

______________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.